सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३

(दिनांक १८ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

**MAHARASHTRA ACT No. XX OF 1964**

# THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (REGULATION) ACT, 1963

**(As modified upto 18th November, 2006)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित
२००६

[किंमत : ३०.४० रुपये]

# महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे


प्रकरण एक — पृष्ठ

**प्रारंभिक**

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. | ५ |
| २. | व्याख्या .. | ५ |
| ३. | विनिर्दिष्ट क्षेत्रात कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन करण्याच्या उद्देशाची अधिसूचना. | १० |
| ४. | विनिर्दिष्ट कृषि उत्पन्नाच्या पणनाचे बाजारक्षेत्रात विनियमन करण्याची घोषणा. | १० |
| ५. | बाजाराची स्थापना .. | ११ |

प्रकरण १-क

**राष्ट्रीय एकात्मीकृत बाजाराची स्थापना**

| | | |
|---|---|---|
| ५-क | राष्ट्रीय एकात्मीकृत बाजाराची स्थापना .. | ११ |
| ५-ख | विनियम करण्याचे अधिकार .. | १२ |
| ५-ग | अधिनियमाच्या इतर तरतुदी राष्ट्रीय एकात्मीकृत बाजारास लागू नसणे. | १२ |

प्रकरण १-ख

**थेट पणन, खाजगी बाजार आणि शेतकरी ग्राहक बाजार यांची स्थापना**

| | | |
|---|---|---|
| ५-घ | थेट पणन, खाजगी बाजार आणि शेतकरी ग्राहक बाजार यांची स्थापना आणि विवादांचे निवारण. | १३ |

प्रकरण १-ग

**कंत्राटी शेती करार**

| | | |
|---|---|---|
| ५-ङ | कंत्राटी शेती कराराची कार्यपद्धती आणि नमुना .. | १४ |

प्रकरण दोन

**कृषि उत्पन्नाचे पणन**

| | | |
|---|---|---|
| ६. | कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन .. | १५ |
| ७. | लायसन देणे .. | १६ |
| ८. | लायसन रद्द करण्याचा किंवा निलंबित करण्याचा अधिकार .. | १७ |
| ९. | अपील .. | १८ |

# अनुक्रमणिका—चालू

कलमे


१०. विवादांच्या मिटवणुकीबाबत तरतूद .. १८


## प्रकरण तीन

## बाजार समित्यांची रचना


११. बाजार समित्यांची स्थापना .. २०

१२. बाजार समित्यांचे कायद्याने संस्थापन .. २०

१३. बाजार समित्यांची रचना .. २१

१४. सदस्यांची निवडणूक व त्यांचा पदावधी .. २५

१४-क. निवडणूक निधी .. २७

१५. सदस्यांच्या पदावधीचा प्रारंभ .. २८

१५-क. सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर प्रशासक नेमण्याची तरतूद. २९

१६. विवक्षित परिस्थितीत सदस्यांचा राजीनामा व नामनिर्देशन .. ३१

१७. गैरवर्तणुकीबद्दल सदस्याला काढून टाकणे .. ३१

१८. नैमित्तिक रिक्त पदे .. ३१

१९. सभापती व उपसभापती यांची निवडणूक .. ३२

२०. सभापती व उपसभापती यांचा पदावधी .. ३२

२१. सभापती व उपसभापती यांनी त्यांचा उत्तराधिकारी अधिकारपदावर येईपर्यंत अधिकारपद धारण करणे. ३३

२१-क. सभापती व उपसभापती यांना मानधन .. ३३

२२. सभापती व उपसभापती यांच्या निवडणुकीची कार्यपद्धती .. ३३

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| २३. | सभापतीचा व उपसभापतीचा राजीनामा .. | ३४ |
| २३-क. | सभापतीविरुद्ध किंवा उपसभापतीविरुद्ध अविश्वासाचा ठराव .. | ३४ |
| २४. | परवानगीखेरीज सभापती, उपसभापती किंवा सदस्य अनुपस्थित राहिल्याचे परिणाम. | ३५ |
| २५. | सभापती व उपसभापती यांची रिकामी झालेली अधिकारपदे भरणे. | ३६ |
| २६. | नवीन सभापतीकडे किंवा उपसभापतीकडे कार्यभार सोपवण्यास नकार देणे. | ३६ |
| २७. | बाजार समितीची सभा वगैरे .. | ३७ |
| २७-क. | बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा .. | ३७ |
| २८. | जागा रिकामी असेल तेव्हा सदस्यांनी कृती करणे, उपचारदोषामुळे समिती वगैरेच्या कृती विधिअग्राह्य न ठरणे. | ३८ |

प्रकरण चार

**बाजार समित्या : अधिकार व कर्तव्ये**

| | | |
|---|---|---|
| २९. | बाजार समितीचे अधिकार व कर्तव्ये .. | ३८ |
| ३०. | उप-समित्यांची नेमणूक, अधिकारांचे प्रत्यायोजन ... | ४१ |
| ३०-क. | अधिसूचित उत्पन्नाच्या पणनासाठी संचयन केंद्रे उघडण्याचा बाजार समितीचा अधिकार; पावतीसंबंधी व खरेदीदाराने रक्कम देण्यासंबंधी तरतुदी. | ४१ |
| ३१. | फी बसविण्याचा व अडतीचे दर निश्चित करण्याचा बाजार समितीचा अधिकार. | ४३ |
| ३२. | कर्ज काढण्याचा अधिकार .. | ४४ |
| ३२-क. | हजर करण्याचा, आदेश देण्याचा अधिकार व प्रवेश करण्याचा, तपासणी करण्याचा, झडती घेण्याचा व जप्त करण्याचा अधिकार. | ४५ |
| ३२-ख. | वसूल न होण्याजोगा तोटा, तूट किंवा फी इत्यादी निर्लेखित करण्याचा अधिकार. | ४८ |



वि (एच) १२५३--i अ

## अनुक्रमणिका—चालू


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ३२-ग. | संपामध्ये पर्यायी व्यवस्था करण्याचे अधिकार .. | ४९ |
| ३२-घ. | आधार किमतीच्या खाली कृषि उत्पन्नाच्या खरेदीस प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याचा अधिकार. | ४९ |
| ३२-ङ. | दुकान, गाळा, छपरी, भूखंड किंवा इतर कोणतीही परिवास्तू यांमधून निष्कासित करण्याचा आणि अतिक्रमण दूर करण्याचा बाजार समितीचा अधिकार. | ४९ |
| ३३. | संविदा निष्पादित करणे .. | ५० |
| ३४. | बाजार समितीने वजने व मापे यासंबंधीचा नियम वगैरेचा अन्वय लावण्याबाबतच्या विवक्षित विवादांचा निर्णय करणे. | ५० |


प्रकरण चार-क

### पर्यवेक्षणाचा परिव्यय


| | | |
|---|---|---|
| ३४-क. | कोणत्याही बाजारातील किंवा बाजारक्षेत्रातील कृषि उत्पन्नाच्या खरेदीवरील पर्यवेक्षण व पर्यवेक्षणाचा परिव्यय खरेदीदारांनी देणे. | ५० |
| ३४-ख. | पर्यवेक्षण .. | ५१ |
| ३४-ग. | बाजार समितीने पर्यवेक्षणाचा परिव्यय गोळा करण्यात किंवा देण्यात कसूर करणे. | ५१ |


प्रकरण पाच

### बाजार समित्यांचे अधिकारी व कर्मचारी


| | | |
|---|---|---|
| ३५. | कर्मचारीवर्ग नोकरीला ठेवण्याचा बाजार समितीचा अधिकार .. | ५१ |


प्रकरण सहा

### बाजार निधि


| | | |
|---|---|---|
| ३६. | बाजार निधी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक .. | ५२ |
| ३७. | ज्या प्रयोजनासाठी बाजार निधी खर्च करता येईल ती प्रयोजने .. | ५२ |
| ३८. | अर्थसंकल्प वगैरे तयार करण्याची रीत .. | ५४ |

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ३८-क. | अधिकाऱ्यांनी किंवा अधिकाऱ्यांविरुद्ध व्यक्तिगत नात्याने दाखल केलेल्या किंवा केलेल्या विवक्षित कार्यवाह्यांकरिता निधीचा वापर करता येणार नाही | ५५ |

प्रकरण सात

**व्यापारी कसर देण्यास मनाई**

| | | |
|---|---|---|
| ३९. | व्यापारी कसर देण्यास किंवा वसूल करण्यास मनाई .. | ५६ |

प्रकरण सात-क

**राज्य कृषि पणन मंडळ**

| | | |
|---|---|---|
| ३९-क. | राज्य कृषि पणन मंडळाची स्थापना .. | ५६ |
| ३९-ख. | राज्य पणन मंडळाची रचना .. | ५७ |
| ३९-ग. | राज्य पणन मंडळाचे अधिकारी व कर्मचारी .. | ५७ |
| ३९-घ. | सदस्य हा निवडणुका लढविण्यास किंवा राज्य विधानमंडळाचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य होण्यास निरर्ह नसणे. | ५८ |
| ३९-ङ. | सदस्यांचा पदावधी .. | ५८ |
| ३९-च. | नैमित्तिक रिकाम्या जागा .. | ५८ |
| ३९-छ. | जागा रिकामी असेल तेव्हा सदस्यांनी काम करणे, राज्य पणन मंडळ इत्यादींच्या कृती वगैरे उपचार-बाह्यतेमुळे विधिअग्राह्य न ठरणे. | ५९ |
| ३९-ज. | सदस्यांचा राजीनामा .. | ५९ |
| ३९-झ. | सदस्यांचे भत्ते .. | ५९ |
| ३९-ञ. | राज्य पणन मंडळाची कार्ये व अधिकार .. | ५९ |
| ३९-ट. | विनियम .. | ६० |
| ३९-ठ. | कृषि उत्पन्न पणन विकास निधीची स्थापना व त्याचे प्रशासन .. | ६१ |
| ३९-ड. | राज्य पणन मंडळाचा कर्ज घेण्याचा अधिकार .. | ६१ |
| ३९-ढ. | विकास निधीचा वापर .. | ६१ |
| ३९-ण. | लेखापरीक्षा .. | ६२ |

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रकरण आठ | |
| | **नियंत्रण** | |
| ४०. | निरीक्षण, चौकशी, विवरणे सादर करणे, इत्यादी .. | ६२ |
| ४१. | संचालकाला, प्राधिकृत अधिकाऱ्यांना आणि राज्य शासनाला माहिती पुरविणे हे अधिकाऱ्यांचे व सदस्यांचे कर्तव्य असणे. | ६३ |
| ४१-क. | समिती इत्यादींने संमत केलेला ठराव किंवा काढलेला आदेश यांच्या अंमलबजावणीस मनाई करण्याचे संचालकांचे अधिकार. | ६३ |
| ४२. | लेखापुस्तके आणि इतर दस्तऐवज यांचे अभिग्रहण करणे ... | ६४ |
| ४३. | बाजार समिती इत्यादींचे कामकाज अभिलेख मागविण्याचा व त्यावर आदेश देण्याचा राज्य शासनाचा किंवा संचालकाचा अधिकार. | ६४ |
| ४४. | बाजार समित्यांचे एकत्रीकरण किंवा विभागणी .. | ६५ |
| ४५. | बाजार समिती इत्यादींचे अधिक्रमण .. | ६६ |
| | प्रकरण नऊ | |
| | **शास्ती** | |
| ४६. | कलम ६ च्या उल्लंघनाबद्दल शास्ती .. | ६७ |
| ४७. | कलम २६ (२) अन्वये दिलेल्या निदेशांचे अनुपालन न केल्याबद्दल शास्ती. | ६७ |
| ४८. | व्यापारी कसर दिल्याबद्दल किंवा घेतल्याबद्दल शास्ती .. | ६८ |
| ४९. | कलम ४० अन्वये दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. | ६८ |
| ५०. | कलम ४० किंवा ४३ यांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती | ६८ |
| ५१. | कलम ४२ चे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती .. | ६८ |
| ५२. | अपराधाबद्दल शिक्षा देण्यासंबंधी सर्वसाधारण तरतुदी .. | ६८ |
| ५२-क. | अपराध आपसात मिटविणे .. | ६९ |
| ५२-ख. | अपील .. | ६९ |

## प्रकरण दहा
### संकीर्ण


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ५३. | निधीच्या दुरुपयोजनाबद्दल सदस्यांना जबाबदार धरणे .. | ७० |
| ५४. | बाजार समितीचा सभापती, उपसभापती, सदस्य, सचिव व कर्मचारी हे लोकसेवक असणे. .. | ७० |
| ५५. | नोटिशीच्या अभावी दावा लावण्यास रोध .. | ७० |
| ५६. | अपराधांची न्यायचौकशी .. | ७१ |
| ५७. | शासनाला किंवा बाजार समितीला येणे असलेल्या रकमांची वसुली | ७१ |
| ५८. | अधिकार प्रत्यायोजित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. | ७३ |
| ५९. | अधिनियमाच्या तरतुदींतून बाजार समित्या वगैरेंना माफी देण्याचा अधिकार. .. | ७३ |
| ५९-क. | बाजार समितीला माहिती देणे व साहाय्य करणे हे स्थानिक प्राधिकरणाचे कर्तव्य असणे. | ७३ |
| ५९-ख. | पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य .. | ७३ |
| ६०. | नियम .. | ७३ |
| ६१. | उपविधी .. | ७७ |
| ६१-क. | उपविधी करणे किंवा त्यांमध्ये सुधारणा करणे याबाबत निदेश देण्याचे संचालकाचे अधिकार. | ७७ |
| ६२. | अनुसूचीत सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. | ७८ |
| ६३. | व्यावृत्ती .. | ७८ |
| ६४. | निरसन व व्यावृत्ती .. | ७८ |
| ६५. | सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ अन्वये वगळण्यात आलेल्या क्षेत्रांसाठी रचना करण्यात आलेल्या बाजार समित्यांच्या बाबतीत मत्ता वगैरे हस्तांतरित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | ७९ |
| ६६. | अडचणी दूर करणे .. | ८० |
| | अनुसूची | |

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०[1]

# [महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३]

[या अधिनियमास, दिनांक ३० एप्रिल, १९६४ रोजी मा. राज्यपाल यांची अनुमती मिळाली. ही अनुमती, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चारमध्ये दिनांक ५ मे, १९६४ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आली.]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९. (२४-९-१९७३) †

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०. (३१-८-१९७४) †

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७३. (३०-१२-१९७५) †

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८. ‡ (२५-११-१९७६) †

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी सन १९६३ चे "महाराष्ट्र शासन राजपत्र", भाग पाच, पृष्ठे २८३-८४ (इंग्रजी) पहा; संयुक्त समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्राच्या भाग पाच, पृष्ठे ५९-९१ (इंग्रजी) पहा.

* सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ३ अन्वये सन १९७१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा, निरसित करण्यात आला.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

‡ सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम ५ अन्वये सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० हा, निरसित करण्यात आला.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१**

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५० ‡ (२७-९-१९७७) †

---

**सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याचे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे:—

६ सप्टेंबर, १९७५ रोजी अधिकार-पदावर असलेल्या आणि त्या नंतर निवडून देण्यात किंवा नेमण्यात आलेल्या पणन समित्यांच्या सदस्यांना पाच वर्षाचा सुधारित पदावधी लागू असणे.

"३. (१) ६ सप्टेंबर, १९७५ रोजी जे अधिकारपदावर होते अशा, पणन विनियमन अधिनियमाअन्वये रचना करण्यात आलेल्या कोणत्याही बाजार समित्यांच्या (प्रथम रचना करण्यात आलेल्या बाजार समित्या वगळून) सदस्यांना (मग त्यांचा तीन वर्षाचा मूळ पदावधी किंवा पणन विनियमन अधिनियमाच्या कलम १४ अन्वयेचा वाढविलेला पदावधी ६ सप्टेंबर १९७५ पूर्वी समाप्त झालेला असो किंवा महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (आणीबाणीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५— यात यापुढे ज्यांचा "निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत अधिनियम" असा निर्देश केला आहे— हा अंमलात असतानाच्या कालावधीमध्ये समाप्त होणाऱ्या तीन वर्षाऐवजी पाच वर्षाच्या सुधारित पदावधीसाठी अधिकारपद धारण करण्याचा हक्क देखील असेल :—

परंतु पाच वर्षाच्या या पदावधीची संगणना करताना, पणन विनियमन अधिनियमाच्या कलम १४, पोट-कलम (३) च्या परंतुकाअन्वये किंवा निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत अधिनियमाच्या कलम ३ अन्वये देण्यात आलेली कोणतीही मुदतवाढ विचारता घेण्यात येईल.

या सदस्यांना [नैमित्तिक रिकाम्या जागांवर नेमलेले किंवा नामनिर्देशित करण्यात आलेले त्यांचे उत्तराधिकारी (तसे असल्यास) धरून] त्यांचा पदावधी संपल्यानंतरदेखील नवीन बाजार समित्यांच्या ज्या पहिल्या सभेमध्ये कामकाज चालविण्यात येईल त्या सभेच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या तारखेपर्यंत आपल्या अधिकारपदावर राहण्याचा हक्क असेल.

(२) निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये किंवा पोट-कलम (२) अन्वये ज्यांच्या निवडणुका घेण्यात आल्या असतील अशा, कोणत्याही बाजार समित्यांच्या सदस्यांनादेखील तीन वर्षाऐवजी पाच वर्षाच्या सुधारित पदावधीसाठी अधिकार पद धारण करण्याचा हक्क असेल आणि अशा कोणत्याही समित्यांच्या सदस्यांच्या अधिकारपदाचा अवधी राज्य शासनास पणन विनियमन अधिनियमाच्या कलम १४, पोट-कलम (३) च्या परंतुकाअन्वये वाढविता येईल.

(३) या कलमाद्वारे अन्यथा तरतूद केलेली असेल ते खेरीजकरून इतर बाबतीत संबंधित बाजार समित्यांना पणन विनियमन अधिनियम व निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत अधिनियम हे लागू होतील."

---

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

‡ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ अन्वये सन १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ हा, निरसित करण्यात आला.

| | |
|---|---|
| सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० @ | (६-१-१९८४) † |
| सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ $ | (२२-१०-१९८४) † |
| सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५** | |
| सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ | |
| सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ | (१७ जानेवारी, १९८९) |
| सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ | (२० जानेवारी, १९९४) |
| सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ | (२२ जानेवारी, १९९६) |
| सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ | (३० डिसेंबर, १९९७) |
| सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ | (१६ जानेवारी, १९९९) |
| सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ | (२७ जानेवारी, १९९९) |
| सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ | (१० मे, २०००) |
| सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ | (८ एप्रिल, २००३) |
| सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ | (९ एप्रिल, २००३) |
| सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ | (२७ डिसेंबर, २००५) |
| सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ | (१९ जुलै, २००६) |

---

@ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ११ अन्वये सन १९८४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ हा, निरसित करण्यात आला.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शवते.

$ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ३ अन्वये सन १९८४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० हा, निरसित करण्यात आला.

** प्रशासकाने केलेल्या कृती आणि अन्य गोष्टी यांच्या विधिअग्राह्यतेसाठी सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ चे कलम ३ पहा.

बाजार क्षेत्रात शेतीच्या व इतर विवक्षित उत्पन्नाच्या पणनाचे आणि त्यासाठी [1][राज्यात स्थापन करावयाच्या बाजाराचा] [2][तसेच खाजगी बाजारांचा व शेतकरी ग्राहक बाजारांचा] विकास व विनियमन करणे, अशा बाजाराच्या संबंधात रचना करावयाच्या किंवा अशा बाजाराशी संबंधित असलेल्या प्रयोजनासाठी कार्य करणाऱ्या बाजार समित्यांना अधिकार प्रदान करणे; बाजार समितीच्या प्रयोजनासाठी निधी स्थापन करणे आणि पूर्वोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करणे, याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** बाजार क्षेत्रात शेतीच्या व इतर विवक्षित उत्पन्नाच्या पणनाचे व त्यासाठी राज्यात स्थापन करावयाच्या [3][बाजाराचा [4][तसेच खाजगी बाजारांचा व शेतकरी ग्राहक बाजारांचा] विकास व] विनियमन करणे, अशा बाजाराच्या संबंधात स्थापन करावयाच्या किंवा बाजाराशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी कार्य करणाऱ्या बाजार समित्यांना अधिकार प्रदान करणे; बाजार समित्यांच्या प्रयोजनासाठी बाजार निधी स्थापन करणे आणि पूर्वोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याचा चौदाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम २ (१) अन्वये "राज्यात स्थापना करावयाच्या बाजाराचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमांच्या कलम ८ (२) अन्वये "स्थापन करावयाच्या बाजाराचा" या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वये "राज्यात स्थापन करावयाचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) अन्वये "स्थापना करावयाच्या बाजाराचा" या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## प्रकरण एक

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन [1][(विकास व विनियमन)] अधिनियम, १९६३ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू आहे.

(३) राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल [2]अशा दिनांकास तो अंमलात येईल.

२. (१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(क) "कृषि उत्पन्न" याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले शेती, फलोत्पादन, पशुसंवर्धन, मधुमक्षिकापालन, मत्स्यसंवर्धन [3][मत्स्यव्यवसाय] व वन यापासून मिळणारे सर्व उत्पन्न असा आहे. (मग ते प्रक्रिया केलेले असो वा नसो);

(ख) "शेतकरी" याचा अर्थ, जी व्यक्ती सामान्यपणे आपण स्वत: किंवा मजुरीने लावलेल्या मजुरांकरवी किंवा अन्यथा, ज्यावर प्रक्रिया करण्यात आलेली नसेल अशा कृषि उत्पन्नाची पैदास किंवा वाढ करण्यात गुंतलेली असेल अशी व्यक्ती, असा आहे; परंतु त्यात [4][कृषि उत्पन्नाचा किंवा त्याच्या संबंधातील] व्यापारी, अडत्या, प्रक्रियाकार किंवा [4][दलाल, शासनाचा किंवा कोणत्याही सहकारी संस्थेचा किंवा कोणत्याही बाजार समितीचा कर्मचारी अथवा व्यापारी भागीदारी संस्थेतील किंवा औद्योगिक प्रसंस्थेतील भागीदार यांचा मग असा व्यापारी, अडत्या, प्रक्रियाकार, दलाल, शासनाचा किंवा कोणत्याही सहकारी संस्थेचा किंवा कोणत्याही बाजार समितीचा कर्मचारी किंवा व्यापारी भागीदारी संस्थेतील अथवा औद्योगिक प्रसंस्थेतील भागीदार] हा कृषि उत्पन्नाची पैदास किंवा वाढ करण्यात गुंतलेला असला तरीही त्याचा समावेश होणार नाही;

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ कलम ४ अन्वये "(विनियमन)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. २५ मे १९६७ (शासकीय अधिसूचना, कृषि व सहकार विभाग, क्रमांक एपीएम्-११६७-८८०२-सी-१, दिनांक १९ मे १९६७, पहा).

३. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ द्वारे "मत्स्यसंवर्धन" या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (अ) अन्वये, कलम २, पोट-कलम (१) मध्ये "कृषि उत्पन्नाचा व्यापारी" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "किंवा दलाल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ग) "दलाल" याचा अर्थ, जो कृषि उत्पन्नाच्या खरेदीसाठी किंवा विक्रीसाठी आपल्या प्रकर्त्याच्यावतीने सौदा ठरवितो, करतो व तो पूर्ण करतो किंवा संविदा करतो व त्याबद्दल ज्याला फी किंवा पारिश्रमिक मिळते, परंतु जो कृषि उत्पन्न घेत नाही किंवा सुपूर्द करीत नाही किंवा त्याची वाहतूक करीत नाही अथवा अशा कृषि उत्पन्नाच्या खरेदीबद्दल पैसे देत नाही किंवा त्याच्या विक्रीबद्दल पैसे गोळा करीत नाही असा अभिकर्ता असा आहे;

[१][(गक) "खरेदीदार" याचा अर्थ, जी स्वत: किंवा जे स्वत: किंवा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा अभिकर्त्याच्या वतीने, बाजार क्षेत्रामध्ये कृषि उत्पन्न खरेदी करते किंवा खरेदी करण्याचे मान्य करते अशी व्यक्ती, केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य शासन, असा आहे];

(घ)"उपविधी" याचा अर्थ, कलम ६१ अन्वये केलेले उपविधी असा आहे;

(ङ) "अडत्या" याचा अर्थ, जी दुसऱ्या व्यक्तीकरिता स्वत:हून किंवा आपल्या नोकरांमार्फत कृषि उत्पन्नाची खरेदी व विक्री करते, असे उत्पन्न आपल्या अभिरक्षेत ठेवते आणि त्याची विक्री किंवा खरेदी होत असताना त्यावर नियंत्रण ठेवते आणि त्याबद्दल खरेदीदारांकडून रक्कम गोळा करून ती विक्रेत्यास देते आणि त्याबद्दल पारिश्रमिक म्हणून जिला अशा प्रत्येक संव्यवहारात अंतर्भूत असलेल्या रकमेवर अडत किंवा टक्केवारी मिळते अशी व्यक्ती असा आहे;

[२][(ङ-१) "कंत्राटी शेती" याचा अर्थ, कंत्राटी शेती उत्पादकाने कंत्राटी शेती पुरस्कर्त्याबरोबर केलेल्या लेखी कराराअन्वये केलेली शेती, असा आहे व अशा शेतीचे उत्पन्न, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याकडून खरेदी केले जाईल असा त्या कराराचा आशय असेल व तसे त्या करारात विनिर्दिष्ट केलेले असेल;

(ङ-२) "कंत्राटी शेती करार" याचा अर्थ, कंत्राटी शेतीसाठी केलेला लेखी करार, असा आहे;

(ङ-३) "कंत्राटी शेती उत्पादक" याचा अर्थ, ज्याने कंत्राटी शेती करारानुसार कृषि उत्पन्न काढून त्याचा पुरवठा करण्याचे मान्य केले असेल, असा शेतकरी किंवा शेतकऱ्यांचा संघ, असा आहे;

(ङ-४) "कंत्राटी शेती पुरस्कर्ता" याचा अर्थ, जिने कंत्राटी शेती करार केला असेल अशी व्यक्ती, असा आहे;]

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ब) अन्वये खंड (ग) नंतर '(गअ)' हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अन्वये खंड (ङ) नंतर हे खंड दाखल करण्यात आले.

[१][(ङक) "थेट पणन" याचा अर्थ, कलम ५ (घ) च्या पोट-कलम (१) अन्वये प्रत्यक्ष पणन लायसनधारकाने, शेतकऱ्यांकडून, कृषि उत्पन्नाची केलेली थेट खरेदी, असा आहे.]

(च) "संचालक" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्यासाठी संचालक, कृषि पणन, [२][* * * *] म्हणून नेमलेली व्यक्ती असा आहे; [३][आणि त्यामध्ये, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या किंवा उपविधींच्या तरतुदींखाली संचालकास असलेल्या अधिकारांपैकी, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करण्याचा व अशी कार्ये पार पाडण्याचा अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा किंवा अधिकाऱ्यांचा समावेश होतो.]

[४](च-१) "शेतकरी-ग्राहक बाजार" याचा अर्थ, कलम ५ (घ) च्या पोट-कलम (२) अन्वये, लायसनधारकाने, शेतकऱ्यांकडून, कृषि उत्पन्नाची केलेली थेट खरेदी, असा आहे.]

[५][(चक) "हमाल" याचा अर्थ, बाजार क्षेत्रात कोणतेही कृषि उत्पन्न चढवण्याकरिता, उतरवण्याकरिता, भरण्याकरिता, काढून घेण्याकरिता, रास लावण्याकरिता, गोणी शिवण्याकरिता, विल्हेवारी करण्याकरिता, साफ करण्याकरिता किंवा वाहून नेण्याकरिता किंवा त्यासंबंधातील कोणतेही पूर्वतयारीचे किंवा आनुषंगिक काम करण्याकरिता कामावर लावण्यात आलेला आणि ज्याने बाजार समितीकडून त्या प्रयोजनाकरिता देण्यात आलेले विधिग्राह्य लायसन धारण केले आहे असा हमाल, कुली किंवा मजूर, असा आहे];

(छ) "स्थानिक प्राधिकरण" यात पंचायत समितीचा समावेश होतो;

(ज) "बाजार" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी स्थापन केलेला कोणताही मुख्य बाजार व तसेच दुय्यम बाजार, असा आहे;

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ५ (१) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ (१) (अ) अन्वये "ग्रामीण वित्त व्यवस्था" हा मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ (क) अन्वये खंड (च) च्या शेवटी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ५ (२) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २ (ड) अन्वये खंड (च) नंतर खंड (चक) हा समाविष्ट करण्यात आला.

(झ) "बाजार क्षेत्र" याचा अर्थ, कलम ४ अन्वये केलेल्या घोषणेत विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र, असा आहे; [१][आणि त्यामध्ये कलम १३ चे पोट-कलम (१-क) च्या खंड (क) अन्वये बाजार क्षेत्र मानण्यात आलेल्या क्षेत्राचा समावेश होतो;]

(ञ) "बाजार समिती" किंवा "समिती" याचा अर्थ, बाजार क्षेत्रासाठी कलम ११ अन्वये रचना केलेली समिती, असा आहे;

[२][आणि तीमध्ये [३][कलम १३ चे पोट-कलम (१-क) च्या खंड (क) अन्वये स्थापन केलेली मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती [४][आणि पोट-कलम (१-ख) च्या खंड (क) अन्वये घोषित करण्यात आलेली विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती] आणि] कलम ४४ अन्वये बाजार समित्यांचे एकत्रीकरण झाल्यामुळे किंवा एखाद्या बाजार समितीचे विभाजन झाल्यामुळे रचना झालेल्या एक किंवा अनेक समित्यांचा समावेश होतो;]

(ट) "सदस्य" याचा अर्थ, बाजार समितीचा सदस्य, असा आहे;

१९६२ चा महा ५. (ठ) "पंचायत समिती" याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन केलेली पंचायत समिती, असा आहे;

(ड) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले असा आहे;

[५][(डक) "खाजगी बाजार" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ५ (घ) च्या पोट-कलम (१) अन्वये घोषित करण्यात आलेली विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती असा आहे.];

(ढ) "प्रक्रियाकार" याचा अर्थ, जी व्यक्ती [६][एकतर स्वत:हून किंवा] आकार घेऊन कोणत्याही कृषि उत्पन्नावर प्रक्रिया करते अशी व्यक्ती, असा आहे;

(ण) "फुटकळ विक्री" याचा अर्थ, कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या संबंधात बाजार समिती उपविधीअनुसार फुटकळ विक्री म्हणून जे परिमाण ठरवील त्या परिमाणापेक्षा अधिक नसेल इतकी त्या कृषि उत्पन्नाची विक्री, असा आहे;

---

१. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ई) अन्वये, खंड (ञ) मध्ये "प्रस्थापित केलेला समिती" या मजकुरानंतर शेवटी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

३. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ५ (३) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ५ (४) द्वारे अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

६. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ (१) (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(त) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये केलेले नियम, असा आहे;

(थ) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे;

(द) "सचिव" याचा अर्थ, बाजार समितीचा सचिव असा आहे व त्यामध्ये सह-सचिव, उप-सचिव व सहायक सचिव यांचा समावेश होतो;

[१][(द१) "विशेष वस्तूंचा बाजार" याचा अर्थ, कलम ४ च्या पोट-कलम (४) अन्वये घोषित केलेला बाजार;]

[२][(दक) "राज्य पणन मंडळ" याचा अर्थ, कलम ३९-अ अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, असा आहे;]

(ध) "सर्वेक्षक" याचा अर्थ, कृषि उत्पन्नाचा माल विक्रीसाठी कोणत्याही बाजार क्षेत्रात किंवा बाजारात आल्यानंतर त्या मालाची प्रत, पृथःकरण, भेसळ व अन्य तत्सम बाबतीत खातरजमा करण्यासाठी जी व्यक्ती त्याचे सर्वेक्षण करते अशी व्यक्ती, असा आहे;

(न) "व्यापारी" याचा अर्थ, प्रकर्ता म्हणून किंवा एका किंवा अधिक व्यक्तींचा रीतसर प्राधिकृत केलेला अभिकर्ता म्हणून कृषि उत्पन्नाची खरेदी किंवा विक्री करणारी व्यक्ती, असा आहे;

(प) "जिल्हा परिषद" याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन केलेली जिल्हा परिषद, असा आहे; १९६२ चा महा ५.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी एखादी व्यक्ती ही शेतकरी आहे किंवा नाही असा प्रश्न उद्भवल्यास, ती बाब संचालकाकडे निर्देशित केली जाईल आणि त्यावरील संचालकाचा निर्णय अंतिम असेल.

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ५ (५) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (फ) अन्वये, खंड (द) नंतर हा खंड समाविष्ट करण्यात आला.

## बाजार क्षेत्रे व बाजार

विनिर्दिष्ट क्षेत्रात कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन करण्याच्या उद्देशाची अधिसूचना.

**३.** (१) राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा क्षेत्रात, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन करण्याचा आपला उद्देश जाहीर करता येईल, अशी अधिसूचना त्या क्षेत्रात खप असलेल्या कोणत्याही वृत्तपत्रात, त्या क्षेत्रातील भाषेतही प्रसिद्ध करता येईल, आणि तसेच पूर्वोक्त उद्देश त्या क्षेत्रातील व्यक्तींच्या निदर्शनास अधिक चांगल्या रीतीने यावा या हेतूने, राज्य शासनाच्या मते योग्य असेल अशा इतर कोणत्याही रीतीने अशी अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल.

(२) अशा [1][अधिसूचनेत विनिर्दिष्ट करावयाच्या तारखेपासून] एक महिन्याच्या आत राज्य शासनाकडे जे कोणतेही आक्षेप किंवा सूचना येतील त्यांचा राज्य शासन विचार करील, असे त्या अधिसूचनेत नमूद करण्यात येईल.

विनिर्दिष्ट कृषि उत्पन्नाच्या पणनाचे बाजार क्षेत्रात विनियमन करण्याची घोषणा.

**४.** (१) कलम ३ अन्वये काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर, राज्य शासन असा कालावधी समाप्त होण्यापूर्वी कोणतेही आक्षेप व सूचना आल्या असल्यास त्यांचा विचार करील आणि त्यास आवश्यक वाटल्यास विहित रीतीने चौकशी करील.

त्यानंतर राज्य शासनाला, **राजपत्रातील** दुसऱ्या अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या पणनाचे या अधिनियमाअन्वये विनियमन करण्यात येईल असे जाहीर करता येईल. याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे बाजार क्षेत्र असेल. या कलमाअन्वये काढलेली अधिसूचना, त्या क्षेत्रात खप असलेल्या [2][मराठी भाषेतील वृत्तपत्रात] प्रसिद्ध करता येईल, आणि तसेच पूर्वोक्त घोषणा त्या क्षेत्रातील व्यक्तींच्या निदर्शनास अधिक चांगल्या रीतीने यावी, या हेतूने राज्य शासनाच्या, मते योग्य असेल अशा इतर कोणत्याही रीतीने, अशी अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये एखादी घोषणा केल्यानंतर, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने [3][किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने] त्यानंतर, त्या कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी त्या क्षेत्रात कोणतीही जागा स्थापन करता कामा नये, स्थापन करण्यास प्राधिकृत करता कामा नये किंवा ती चालू ठेवता कामा नये, किंवा अशी जागा स्थापन करण्यास, ती प्राधिकृत करण्यास किंवा ती चालू ठेवण्यास परवानगी देता कामा नये. १९८७ चा ३७

१९५६ चा १

---

१. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ अन्वये "अधिसूचनेच्या तारखेपासून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ (अ) अन्वये "त्या क्षेत्रात खप असलेल्या वृत्तपत्रात, त्या क्षेत्रातील भाषेतही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये "कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने" या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने, राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणत्याही वेळी बाजार क्षेत्रातून, कोणतेही क्षेत्र वगळता येईल किंवा त्यात जादा क्षेत्र समाविष्ट करता येईल किंवा कोणत्याही बाजार क्षेत्रात कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन बंद करावे, किंवा कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या (आतापर्यंत विनियमन) न झालेल्या पणनाचे बाजार क्षेत्रात विनियमन करावे, असा निदेश देता येईल.

[1][(४) राज्य शासनास, विशिष्ट कृषि उत्पन्नाच्या उलाढालीचा आणि त्यासाठी लागणाऱ्या विशेष पायाभूत सुविधांचा विचार करून, कोणत्याही बाजार क्षेत्रासाठी, विद्यमान बाजाराशिवाय विशेष वस्तूंचा बाजार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घोषित करता येईल.]

**५.** (१) प्रत्येक बाजार क्षेत्रासाठी एक मुख्य बाजार स्थापन करण्यात येईल आणि एक किंवा अधिक दुय्यम बाजार स्थापन करता येतील. बाजाराची स्थापना.

(२) संचालक, कलम ४, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही बाजार क्षेत्रातील (कोणतीही संरचना, परिवेष्टित जागा, खुली जागा किंवा स्थान धरून) कोणतीही जागा त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी, मुख्य बाजार म्हणून स्थापन करील आणि त्यास, त्याच अधिसूचनेद्वारे, किंवा तशाच अधिसूचनेद्वारे, अशा कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी, त्या बाजार क्षेत्रातील त्यासारख्या इतर कोणत्याही जागांमध्ये, दुय्यम बाजार स्थापन करता येतील.

[2][प्रकरण एक - क

## राष्ट्रीय एकात्मीकृत बाजाराची स्थापना

**५-क.** (१) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ अधिनियम, १९८७ अन्वये (१९८७ चा ३७.) विधि संस्थापित असलेले राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ किंवा राज्य अधिनियमान्वये मान्यताप्राप्त असलेले अन्य कोणतेही निगम निकाय, शासकीय महामंडळ, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये (१९५६ चा १.) नोंदणीकृत असलेली कंपनी यांच्याद्वारे प्रत्यक्षपणे किंवा तिने स्थापन केलेल्या कोणत्याही संघटनेमार्फत किंवा शेतकरी संघाबरोबर स्वायत्त संस्था म्हणून मालकीचे असलेले व व्यवस्थापन पाहिले जात असलेले, मुंबई आणि तिच्या सभोवतालाच्या ७५ कि. मी. त्रिज्येच्या क्षेत्राच्या बाबतीत किंवा राज्यातील कोणत्याही क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी, फळे व भाजीपाला यांच्या पणनाकरिता एक राष्ट्रीय एकात्मीकृत बाजार स्थापन करण्यात येईल आणि त्यानंतर राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाला किंवा यथास्थिति, अन्य कोणत्याही संघटनेला,— राष्ट्रीय एकात्मीकृत बाजाराची स्थापना.

(क) अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही क्षेत्रामध्ये किंवा क्षेत्रांमध्ये फळांचा व भाजीपाल्याचा एक राष्ट्रीय एकात्मीकृत बाजार स्थापन करता येईल;

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ६ याद्वारे पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

२. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये हे प्रकरण समाविष्ट करण्यात आले.

(ख) फळे व भाजीपाला गोळा करणे, तो एकत्र करणे, त्याची विल्हेवारी लावणे, त्यांची प्रतवारी ठरवणे, त्यावर प्रक्रिया करणे, त्यांचे गट्ठे बांधणे, त्यांची साठवण करणे किंवा वाहतूक करणे यांसाठी, बाजाराची माहिती पुरविण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मीकृत बाजाराचा उपयोग करून त्यांना त्यांच्या उत्पादनाचे पणन ज्यामुळे करता येईल असे कार्यक्रम पार पाडण्यासाठी किंवा त्यांना सहाय्यभूत किंवा आनुषंगिक असेल असे इतर काहीही करण्यासाठी, उपरोक्त क्षेत्रात किंवा त्याच्या बाहेर असलेल्या, राज्यातील विविध ठिकाणी कोणत्याही नावाने ओळखली जात असोत, संचयन केंद्रे स्वत: स्थापन करता येतील किंवा ती स्थापन करण्यासाठी शेतकरी आणि शेतकरी संघ यांना वित्त पुरवठा करता येईल, सहाय्य करता येईल किंवा आधार देता येईल;

(ग) उपरोक्त क्षेत्राच्या आत किंवा क्षेत्राच्या बाहेर राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी वितरण मार्ग व शाखा स्थापन करून पणनाची व्यवस्था उभारता येईल किंवा अन्यथा आधार देता येईल;

(घ) राष्ट्रीय एकात्मीकृत बाजाराच्या उपयोगकर्त्यांची नोंदणी करता येईल आणि राष्ट्रीय एकात्मीकृत बाजाराकडे नोंदणी केलेले किंवा बाजाराचा वापर करीत असलेले शेतकरी, शेतकरी संघ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, खरेदीदार व अन्य सर्व कामगार यांच्यावर नोंदणी शुल्क, प्रतिभूती ठेव व आगाऊ रक्कम आकारता येईल आणि ती गोळा करता येईल, त्यांना दिलेल्या सेवा व पुरविलेल्या उपयोगिता यांकरिता इतर सेवा आकार आकारता येतील व गोळा करता येतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे निदेश देईल की त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून राष्ट्रीय एकात्मीकृत बाजारातील फुलांच्या पणनाचे या प्रकरणाच्या तरतुदींद्वारे नियमन करण्यात येईल आणि त्यानंतर या प्रकरणाच्या सर्व तरतुदी राष्ट्रीय एकात्मीकृत बाजारातील फुलांच्या पणनाला व अन्य संबंधित कार्यांना लागू असतील.

विनियम करण्याचे अधिकार.

**५-ख.** राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाला किंवा राज्य शासनाने यथोचितरीत्या मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही संघाला, राष्ट्रीय एकात्मीकृत बाजाराच्या संबंधातील मालकी, व्यवस्थापन, पणन, व्यापार व अन्य संबंधित कार्ये यांच्या प्रयोजनांसाठी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी या प्रकरणान्वये राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने नियमन करता येतील.

अधिनियमाच्या इतर तरतुदी राष्ट्रीय एकात्मीकृत बाजारास लागू नसणे.

**५-ग.** या प्रकरणाच्या तरतुदींव्यतिरिक्त, या अधिनियमातील किंवा त्याखाली केलेल्या नियमांतील, विनियमांतील किंवा उपविधींमधील कोणतीही गोष्ट,–

(एक) या प्रकरणान्वये, राष्ट्रीय एकात्मीकृत बाजाराच्या स्थापनेच्या आणि व्यवस्थापनाच्या संबंधात काहीही केल्यास किंवा कोणतीही कार्यवाही केल्यास किंवा त्यास अनुसरून काहीही केल्यास त्यास; किंवा

(दोन) धंद्याचे व्यवहार म्हणून किंवा अन्यथा, राष्ट्रीय एकात्मीकृत बाजारासाठी संबंधित व्यवहार करणारी कोणतीही व्यक्ती, अभिकरण किंवा संघटना यांना;

लागू होणार नाही.]

## [१]प्रकरण एक - ख

## थेट पणन, खाजगी बाजार आणि शेतकरी-ग्राहक बाजार यांची स्थापना

**५-घ.** (१) संचालकास, विहित करण्यात येतील अशा, अटी व शर्तींच्या अधीन राहून पुढील गोष्टींकरिता, थेट पणन करण्यासाठी आणि एका किंवा अधिक बाजार क्षेत्रांमध्ये खाजगी बाजार स्थापन करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीस लायसन देता येईल.— थेट पणन, खाजगी बाजार आणि शेतकरी-ग्राहक बाजार यांची स्थापना आणि विवादांचे निवारण.

(क) कृषि उत्पन्नावर प्रक्रिया करणे;

(ख) विशिष्ट विनिर्देशाच्या कृषि उत्पन्नाचा व्यापार करणे;

(ग) कृषि उत्पन्नाची निर्यात करणे;

(घ) कृषि उत्पन्नाची मूलवाढ करून प्रतवारी लावणे, आवेष्टन करणे आणि इतर कोणत्याही मार्गाने देवाणघेवाण करणे.

(२) (क) संचालकास, विहित करण्यात येतील अशा, अटी व शर्तींच्या अधीन राहून विहित पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे मान्य करणाऱ्या किंवा ते काम हाती घेणाऱ्या एखाद्या व्यक्तीस, शेतकरी-ग्राहक बाजार स्थापन करण्याकरिता लायसन देता येईल.

(ख) विक्रेत्याकडून कृषि उत्पन्नाच्या विक्रीवर बाजार सेवा आकार वसूल केला जाईल आणि तो शेतकरी-ग्राहक बाजाराच्या मालकाकडे पाठविला जाईल.

(ग) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, ग्राहक-शेतकरी बाजारातील कृषि उत्पन्नाच्या विक्री किंवा खरेदीवर कोणतीही बाजार फी वसुलीयोग्य नसेल.

(३) (क) थेट शेतकऱ्यांकडून कृषि उत्पन्न खरेदी करण्याची किंवा एका किंवा त्याहून अधिक बाजार क्षेत्रांमध्ये खाजगी बाजार किंवा ग्राहक-शेतकरी बाजार स्थापन करण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, विहित केले असेल अशा रीतीने आणि अशा कालावधीसाठी, लायसन मिळविण्यासाठी किंवा यथास्थिति, लायसनच्या नवीकरणासाठी, संचालकाकडे अर्ज करील.

(ख) अशा प्रत्येक अर्जासोबत, विहित करण्यात येईल अशी पर्याप्त सुरक्षा ठेव व फी जमा करण्यात येईल.

(ग) लायसन मिळविण्यासाठी किंवा त्याच्या नवीकरणासाठी खंड (क) अन्वये प्राप्त झालेला अर्ज, संचालकाकडून, पुढीलपैकी कोणत्याही कारणांसाठी नाकारला जाईल :—

(एक) अर्जदाराच्या नावे कोणत्याही बाजार समितीची किंवा राज्य पणन मंडळाची देणी देय असतील तर;

(दोन) अर्जदार अज्ञान असेल तर;

(तीन) अर्जदार नादार असेल तर;

(चार) लेखी विनिर्दिष्ट करावयाची अन्य कोणतीही पुरेशी कारणे असतील तर.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ७ अन्वये हे प्रकरण समाविष्ट करण्यात आले.

(४) (क) संचालकाला, पुढील कारणांसाठी लायसन निलंबित किंवा रद्द करता येईल आणि लायसनधारकाला, त्याचे लायसन निलंबित किंवा रद्द झाले असल्याचे लेखी कळविता येईल :—

(एक) लायसन हे बुद्धिपुरस्सर खोटे अभिवेदन करून किंवा लबाडीने मिळविले असेल तर;

(दोन) लायसनधारकाने लायसनच्या कोणत्याही अटी किंवा शर्तीचा भंग केला असेल तर;

(तीन) लायसनधारक नादार झाला असेल तर; किंवा

(चार) लायसनधारक, या अधिनियमाखाली कोणत्याही अपराधासाठी सिद्धापराध ठरला असेल तर.

(ख) असे कोणतेही लायसन निलंबित किंवा रद्द का करू नये याबाबत कारणे दाखवण्याची वाजवी संधी त्याच्या धारकास देण्यात आल्याशिवाय ते निलंबित किंवा रद्द करण्यात येणार नाही.

(५) (क) थेट पणन लायसनधारक, खाजगी बाजार, ग्राहक-शेतकरी बाजार किंवा बाजार समिती यांच्यामधील कोणताही विवाद, संचालकाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल. असा विवाद, दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, विहित रीतीने सोडविण्यात येईल.

(ख) वरील खंड (क) अन्वये संचालकाने दिलेल्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य शासनाकडे अपील दाखल करता येईल.

(ग) खंड (ख) अन्वये दाखल करावयाचे अपील हे, संचालकाच्या निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, करण्यात येईल.

(घ) राज्य शासनाने अपिलावर दिलेला आदेश अंतिम असेल.

(६) (क) कलम २९ चे पोट-कलम (२) याचे खंड (एक), (दोन), (चार), (पाच), (सहा), (सात), (आठ), (नऊ), (दहा), (अकरा), (बारा), (तेरा), (वीस), (एकवीस), (पंचवीस) व (सव्वीस), कलम ३१ ची पोट-कलमे (१), (३) व (४) आणि कलमे ३२-अ, ३४-अ, ३९, ४०, ४१, ४२, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५२-अ, ५६, ५७ व ५९-ब योग्य त्या फेरफारांसह, थेट पणन लायसनधारक, खाजगी बाजार व शेतकरी-ग्राहक बाजार यांना लागू होतील.

(ख) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, थेट पणन लायसनधारक, कलम ३१ नुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास बाजार फी देईल आणि ते मंडळ, विहित रीतीने संबंधित बाजार समितीला ती फी संवितरित करील.

(७) या कलमान्वये स्थापन केलेल्या बाजारांचे लायसन देणे, व्यवस्थापन, पणन, व्यापार व इतर संबंधित कार्ये, यांचे विहित केलेल्या रीतीने विनियमन करण्यात येईल."]

[१][प्रकरण एक-ग

**कंत्राटी शेती करार**

कंत्राटी शेती कराराची कार्यपद्धती आणि नमुना.

**५-ङ.** (१) कंत्राटी शेती पुरस्कर्ता, विहित करण्यात येईल अशा रीतीने, बाजार समितीकडे किंवा विहित अधिकाऱ्याकडे स्वत:ची नोंदणी करील.

(२) कंत्राटी शेती पुरस्कर्ता, कंत्राटी शेतीच्या कराराची, याबाबतीत विहित केलेल्या अधिकाऱ्याकडे अभिलिखित करील. कंत्राटी शेती करार, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, असा तपशील आणि अशा अटी व शर्ती अंतर्भूत असलेला असेल.

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ३ अन्वये कलम ५-घ नंतर हे प्रकरण समाविष्ट करण्यात आला.

१८७२ चा ९. (३) कंत्राटी शेती करार किंवा भारतीय संविदा अधिनियम, १८७२ किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कंत्राटी शेती उत्पादकाच्या शेतजमिनीचा कोणताही मालकी हक्क किंवा अधिकार किंवा तिची मालकी किंवा ताबा, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याकडे किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याकडे किंवा त्याच्या अभिकर्त्याकडे हस्तांतरित, अन्य संक्रामित अथवा निहित करण्यात येणार नाही.

(४) कोणत्याही कंत्राटी शेती करारातून उद्भवलेला विवाद मिटविण्यासाठी, तो विवाद याबाबतीत विहित केलेल्या समेट प्राधिकाऱ्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल. समेट प्राधिकारी, पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यावर, तो विवाद, तीस दिवसांच्या आत संक्षिप्त पद्धतीने मिटवील.

(५) पोट-कलम (४) खालील, समेट प्राधिकाऱ्याच्या निर्णयाने व्यथित झालेल्या पक्षकारास, त्या निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, याबाबतीत विहित करण्यात येईल अशा अपील प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल. अपील प्राधिकारी, पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यावर, तीस दिवसांच्या आत ते अपील निकालात काढील आणि अपील प्राधिकाऱ्याचा त्याबाबतचा निर्णय अंतिम असेल.

(६) पोट-कलम (४) खालील, समेट प्राधिकाऱ्याचा निर्णय आणि पोट-कलम (५) खालील अपील प्राधिकाऱ्याचा अपिलावरील निर्णय हे, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे प्रभावशाली असतील आणि त्याप्रमाणे ते बजावणीयोग्य असतील, आणि हुकूमनाम्याची रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(७) कंत्राटी शेती कराराशी संबंधित असणाऱ्या आणि त्यातून उद्भवणाऱ्या विवादाला कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

(८) कंत्राटी शेती कराराखालील कृषि उत्पन्नाची बाजारतळाबाहेर, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याला विक्री करता येईल आणि अशा प्रकरणी, कोणतीही बाजार फी आकारणीयोग्य असणार नाही.]

## प्रकरण दोन

## कृषि उत्पन्नाचे पणन

**६.** (१) या कलमाच्या तरतुदींस आणि बाजार क्षेत्रातील कोणत्याही जागी कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन करण्याची तरतूद करणाऱ्या नियमांच्या अधीनतेने, कलम ४, पोट-कलम (१) अन्वये ज्या तारखेला घोषणा केली असेल त्या तारखेला किंवा त्या तारखेनंतर, कोणत्याही व्यक्तीने लायसनशिवाय (बाजार समितीने अजून कार्य सुरू केले नसेल त्या बाबतीत संचालकाने आणि इतर कोणत्याही बाबतीत बाजार समितीने, याबाबतीत दिलेल्या) किंवा अशा लायसनमधील अटींना व शर्तींना अनुसरून नसेल अशा अन्य प्रकारे :— कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन.

(क) जाहीर केलेल्या कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी बाजार क्षेत्रातील कोणत्याही जागेचा उपयोग करता कामा नये, किंवा

(ख) जाहीर केलेल्या कृषि उत्पन्नाच्या पणनाच्या संबंधात, अशा बाजार क्षेत्रात किंवा त्यामधील कोणत्याही बाजारात व्यापारी, अडत्या, दलाल, प्रक्रियाकार, तोलारी, मापारी, सर्वेक्षक, वखारवाला म्हणून किंवा इतर कोणत्याही नात्याने काम करता कामा नये.

(२) पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट फुटकळ विक्रीस [१][किंवा जो आपल्या स्वत:च्या उत्पन्नाची विक्री करतो अशा एखाद्या शेतकऱ्याने केलेल्या विक्रीस] लागू होणार नाही, त्याचप्रमाणे स्वत:च्या वैयक्तिक, वापरासाठी किंवा आपल्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या वापरासाठी खरेदी करणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीला, एखाद्या व्यक्तीने विक्री केली असेल तर, अशा विक्रीला लागू होणार नाही.

[२][(३) प्रत्येक बाजार समिती त्यांच्या मुख्य आणि दुय्यम बाजारपेठांमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या स्वत:च्या कृषि उत्पन्नाची ग्राहकांना मध्यस्थांच्या मदतीशिवाय थेट विक्री करणे शक्य व्हावे म्हणून बाजार क्षेत्रात पुरेशी जागा राखून ठेवील आणि अशा जागेची देखभाल देखील करील.]

लायसन देणे. ७. (१) बाजार समितीस, तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी केलेल्या नियमांच्या अधीनतेने, कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी बाजार क्षेत्रातील कोणत्याही जागेचा उपयोग करण्याकरिता किंवा कृषि उत्पन्नाच्या पणनाच्या संबंधात, व्यापारी, अडत्या, दलाल, प्रक्रियाकार, तोलारी, मापारी, सर्वेक्षक, वखारवाला म्हणून किंवा इतर कोणत्याही नात्याने, त्या ठिकाणी काम करण्यासाठी लायसन देता येईल किंवा त्याचे नवीकरण करता येईल; किंवा त्याबाबतची आपली कारणे लेखी नमूद करून, असे कोणतेही लायसन देण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार देता येईल.

[३][परंतु, लायसनकरिता किंवा त्याच्या नवीकरणाकरिता केलेला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या अवधीत असे लायसन देण्यात किंवा त्याचे नवीकरण करण्यात किंवा त्यास नकार देण्यास बाजार समिती कसूर करील तर असे लायसन यथास्थिति, देण्यात आल्याचे किंवा त्याचे नवीकरण करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.]

(२) पोट-कलम (१) खालील लायसने ही, विहित करण्यात येतील अशा नमुन्यात, अशा कालावधीसाठी, अशा अटींवर व शर्तीवर व असे निर्बंध घालून (त्यामध्ये दलालांनी व अडत्यांनी कोणत्याही संव्यवहारात खरेदीदार किंवा विक्रेता या दोन्ही नात्यांनी काम करणाऱ्यास किंवा खरेदीदार व विक्रेता या दोघांच्या वतीने काम करण्यास मनाई करण्यासंबंधीच्या कोणत्याही तरतुदींचा आणि तसेच कुक्कुट, गुरे-ढोरे, मेंढ्या व बकऱ्या यांहून अन्य कृषि उत्पन्नाच्या संबंधातील व विहित करण्यात येईल अशा इतर कृषि उत्पन्नाच्या संबंधातील व्यापाऱ्या-व्यापाऱ्यामध्ये होणाऱ्या संव्यवहाराखेरीज इतर कोणत्याही संव्यवहारात दलालांनी कार्य करण्यास मनाई करण्यासंबंधीच्या आणि कोणत्याही बाजारात किंवा बाजार क्षेत्रात ज्या रीतीने व ज्या जागी कृषि उत्पन्नाचे लिलाव करण्यात येतील आणि बोली बोलण्यात व स्वीकारण्यात येईल ती रीत व त्या जागा आणि त्या जागी कृषि उत्पन्नाचे वजन करण्यात येईल व ते सुपूर्द करण्यात येईल त्या जागा विहित करण्यासंबंधीच्या तरतुदींचा अंतर्भाव होतो) आणि विहित करण्यात येईल अशा कमाल रकमेहून

---

[१] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३ द्वारे हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

अधिक नसेल इतकी फी दिल्यानंतर, देता येतील. [1][तसेच विहित करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर, व्यक्तींच्या कोणत्याही वर्गास अशी फी देण्याची माफी देण्यासंबंधीसुद्धा तरतूद करता येईल.]

[2][(३) पोट-कलम (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एकापेक्षा अधिक बाजार क्षेत्रांमध्ये व्यापार करण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्यास, लायसन देण्याकरिता किंवा त्याचे नवीकरण करण्याकरिता, राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या अशा प्राधिकाऱ्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे, विहित करण्यात येईल अशा तपशिलासह, अर्ज करता येईल. अशा अर्जामध्ये, अर्जदार व्यापारी ज्यांमध्ये व्यापार करण्यास इच्छुक असेल अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या नावांचा समावेश असेल आणि असे लायसन देणारा प्राधिकारी किंवा अधिकारी, संबंधित व्यापारी ज्यामध्ये व्यापार करण्यास हक्कदार असेल अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांची नावे लायसनमध्ये समाविष्ट करील. एकापेक्षा अधिक बाजार क्षेत्रांत व्यापार करण्यासाठी लायसन मिळण्याकरिता अर्ज करणाऱ्या व्यक्तीस, संबंधित प्राधिकाऱ्याकडे, किंवा अधिकाऱ्याकडे, विहित करण्यात येईल अशा दराने लायसन फी भरावी लागेल आणि अशी फी, असा प्राधिकारी किंवा यथास्थिति, अधिकारी आणि उक्त लायसनच्या कक्षेत येणाऱ्या पणन समित्या यांच्यामध्ये विहित रीतीने वाटून घेण्यात येईल.]

**लायसन रद्द करण्याचा किंवा निलंबित करण्याचा अधिकार.**

८. (१) पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने बाजार समितीला कारणे लेखी नमूद करून त्या कारणास्तव पुढील बाबतीत लायसन निलंबित करता येईल किंवा रद्द करता येईल.—

(क) जर लायसन बुद्धिपुरस्सर विपर्यास करून किंवा कपटाने मिळविण्यात आले असेल;

(ख) जर लायसनधारकाने किंवा त्याच्या नोकराने किंवा त्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने लायसनच्या कोणत्याही अटीचा किंवा शर्तीचा भंग केला असेल;

(ग) जर लायसनधारक इतर लायसनधारकाबरोबर मिळून बाजार क्षेत्रात कृषि उत्पन्नाचे पणन करण्यास बुद्धिपुरस्सर अडथळा करण्याच्या किंवा असे पणन निलंबित करण्याच्या किंवा बंद पाडण्याच्या हेतूने कोणतेही कृत्य करील किंवा बाजारात आपला नेहमीचा धंदा चालविण्याचे बंद करील आणि त्यामुळे कोणत्याही उत्पन्नाच्या पणनाला अडथळा येत असेल किंवा असे पणन निलंबित झाले असेल किंवा ते बंद पडले असेल;

(घ) जर लायसनधारकाला नादार म्हणून न्यायनिर्णित करण्यात आले असेल आणि त्याने नादारीतून मुक्तता मिळविली नसेल; किंवा

(ङ) जर लायसनधारकाला या अधिनियमाअन्वये कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धपराध ठरविण्यात आले असेल.

---

१. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ५ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ८ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[1][(१-क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मात्र पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने, बाजार समितीचा सभापती व सचिव यांना संयुक्तपणे बाजार समिती, ज्या कोणत्याही कारणासाठी पोट-कलम (१) अन्वये लायसन निलंबित करू शकेल अशा कोणत्याही कारणासाठी १५ दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता आदेशाद्वारे लायसन निलंबित करता येईल व त्याची कारणे लेखी नमूद करावी लागतील.]

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पण पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने संचालकास लेखी कारणे नमूद करून त्या कारणास्तव या प्रकरणाअन्वये दिलेले किंवा नवीकरण केलेले कोणतेही लायसन आदेशाद्वारे निलंबित करता येईल किंवा रद्द करता येईल.

(३) लायसनधारकाला अशा रीतीने लायसन निलंबित किंवा रद्द करण्याविरुद्धचे कारण दाखविण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय या कलमाअन्वये असे कोणतेही लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात येणार नाही.

अपील.

**९.** (क) बाजार समितीच्या लायसन देण्याचे किंवा त्याचे नवीकरण करण्याचे नाकारणाऱ्या किंवा लायसन रद्द करणाऱ्या किंवा कोणतेही लायसन निलंबित करणाऱ्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला ज्या तारखेला तो आदेश तिला कळविण्यात आला असेल त्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत संचालकाकडे अपील करता येईल.

(ख) संचालकाच्या, लायसन देण्याचे नाकारणाऱ्या किंवा ते रद्द अथवा निलंबित करणाऱ्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला तितक्याच दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल.

यथास्थिति, संचालक किंवा राज्य शासन, अशा अपिलावर त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देईल.

परंतु, अपील फेटाळण्यापूर्वी, यथास्थिति, संचालक किंवा राज्य शासन, अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल आणि असे अपील फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करील.

विवादाच्या मिटवणुकी-बाबत तरतूद.

**१०.** (१) कोणत्याही कृषि उत्पन्नाची प्रत किंवा त्याचे वजन किंवा त्याबद्दल द्यावयाची रक्कम यासंबंधीचे कोणतेही विवाद धरून, खरेदीदार व विक्रेते यांच्यामधील किंवा त्यांच्या अभिकर्त्यांमधील विवादांची मिटवणूक करण्याच्या किंवा बाजार क्षेत्रातील कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन करण्याच्या संबंधील, कोणत्याही बाबींची मिटवणूक करण्याच्या प्रयोजनासाठी, त्या क्षेत्राची बाजार समिती [2][* * * *] एका [3][विवाद उप-समितीची] रचना करील.

---

[1] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५ अन्वये पोट-कलम (१-क) समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम २ (१) अन्वये "आपल्या सदस्यांमधून" हा मजकूर वगळण्यात आला.

[3] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६ (अ) अन्वये "मंडळाची" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][(२) विवाद उप-समिती—

(क) बाजार समितीचा उप-सभापती, जो विवाद-उपसमितीचा सभापती असेल;

(ख) शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे समितीचे दोन सदस्य—मग ते निवडून देण्यात आलेले असोत किंवा नामनिर्देशित केलेले असोत;

(ग) व्यापाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारा समितीचा एक सदस्य—मग तो निवडून देण्यात आलेला असो किंवा नामनिर्देशित केलेला असो; आणि

(घ) संचालकाच्या मते कृषि उत्पन्नाच्या पणनामध्ये तज्ञ असलेल्या व्यक्तींमधील एक व्यक्ती, यांची मिळून बनलेली असेल.

खंड (ख) व (ग) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले सदस्य हे, बाजार समितीने पदनिर्देशित केलेले असतील आणि खंड (घ) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला सदस्य संचालकाने नामनिर्देशित केलेला असेल. कापसाच्या संबंधात विवाद असेल त्याबाबतीत, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ, मर्यादित, हा व्यापाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्याच्या जागी, त्याच्या अधिकाऱ्यांपैकी, उक्त महासंघाच्या परिमंडल अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा [2][प्रतवारीकाराखेरीज अन्य] एका अधिकाऱ्याची विवाद समितीचा सदस्य म्हणून नेमणूक करील. राज्य शासनाने, कापसाच्या विक्रीसाठी किंवा खरेदीसाठी त्याचा अभिकर्ता म्हणून उक्त महासंघाहून अन्य कोणत्याही व्यक्तीची किंवा प्राधिकरणाची नेमणूक केली असेल त्याबाबतीत असा अभिकर्ता त्या सदस्याची नेमणूक करील.

[3][(३) बाजार समितीचा सचिव हा विवाद उप-समितीचा सदस्य-सचिव म्हणून काम पाहील, त्याला मत देण्याचा अधिकार नसेल, तीन सदस्यांनी गणपूर्ती होईल. विवाद उप-समिती तिचा निर्णय लेखी नोंदविल, विवाद उपसमितीच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस :—

(क) भाजीपाला, फळभाजी आणि मासळी यांसारख्या नाशवंत कृषि मालाच्या बाबतीत तिला असा निर्णय कळविल्यापासून बारा तासांच्या आत, संबंधित बाजार समितीच्या सचिवाकडे अपील करता येईल व तो असे अपील पुढील सहा तासांच्या आत निकालात काढील; आणि

(ख) इतर कोणत्याही नाशवंत कृषि मालाच्या बाबतीत, तिला असा निर्णय कळविल्यापासून चोवीस तासांच्या आत बिगर इतर कृषि मालांच्या बाबतीत, तिला असा निर्णय कळविल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत, संबंधित सहकारी संस्थेच्या जिल्हा उपनिबंधकाकडे अपील करता येईल व तो ते अपील, नाशवंत कृषि मालाच्या बाबतीत चोवीस तासांच्या आत आणि इतर कोणत्याही बिगर नाशवंत कृषि मालाच्या बाबतीत ते मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत निकालात काढील.]

---

१. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६ (ब) अन्वये पोट-कलम (२) ऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

२. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४ द्वारे "कमी दर्जाचा नसेल अशा" या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या, कलम ४ (ख) द्वारे, पोट-कलम (३) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(४) विवाद उपसमितीस, आपले कामकाज चालवण्यासंबंधातील तसेच तिला कोणतीही अनामत रक्कम देण्यात येणार असल्यास, ती देण्यासंबंधातील नियम करता येतील.

[१][(५) बाजार समितीचा सचिव किंवा यथास्थिति, जिल्हा उपनिबंधक, पोट-कलम (३) खालील अपिलाबाबत आपला निर्णय लेखी नमूद करील आणि तो अंतिम असेल.]

[२][(६) प्रत्येक बाजार क्षेत्रात, संचालक, बाजारातील व्याप्ती आणि आवश्यकता विचारात घेऊन हमाल, तोलारी आणि मोजमाप करणाऱ्यांची संख्या निश्चित करील.]

## प्रकरण तीन

## बाजार समित्यांची रचना

बाजार समित्यांची स्थापना.

**११.** राज्य शासन प्रत्येक बाजार क्षेत्रासाठी सभापती, उपसभापती व इतर सदस्य यांची मिळून बनलेली एक बाजार समिती स्थापन करील; आणि त्यास, एकाच बाजार क्षेत्रासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी, निरनिराळ्या प्रकारच्या कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन करण्यासाठी, निरनिराळ्या बाजार समित्या स्थापन करता येतील. बाजार समितीला या अधिनियमाअन्वये किंवा त्याखाली तिच्यामध्ये निहित केलेले असतील असे सर्व अधिकार असतील व निहित केलेली असतील अशी सर्व कार्ये ती पार पाडील.

बाजार समित्यांचे कायद्याने संस्थापन.

**१२.** [३][(१)] प्रत्येक बाजार समिती ही, "............................ कृषि उत्पन्न बाजार समिती" या नावाचा एक निगम निकाय असेल, आणि तिची अखंड अधिकार परंपरा असेल, तिची एक सामान्य मुद्रा असेल, आणि आपल्या निगम नावाने तिला आणि तिच्यावर दावा लावता येईल, आणि ती जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारच्या मालमत्तेबाबत संविदा करण्यास, मालमत्ता संपादन करण्यास व धारण करण्यास, आणि ज्या प्रयोजनांसाठी तिची स्थापना करण्यात आली असेल त्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी करण्यास सक्षम असेल.

[४][परंतु बाजार समिती, जिचे मूल्य विहित मर्यादेपेक्षा अधिक असेल अशी कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता, संचालकांच्या पूर्वपरवानगीवाचून संपादन करणार नाही किंवा तिची विल्हेवाट करणार नाही.]

[३][(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक बाजार समिती ही, सर्व प्रयोजनांसाठी स्थानिक प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल.]

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४ (ग) द्वारे पोट-कलम (५) ऐवजी, हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४ (घ) द्वारे पोट-कलम (५) नंतर हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये, कलम १२ यास कलम १२ चे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला आणि पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ अन्वये पोट-कलम (१) मध्ये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[१][(३) कर्मचारी तक्ता, आस्थापना खर्च व इतर खर्च आणि भत्ते यांसाठी मानके निर्धारित करण्याच्या प्रयोजनासाठी उलाढालीचे प्रमाण व स्वरूप लक्षात घेऊन संचालक, विहित मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन राहून, बाजार समित्यांचे वर्गीकरण करील.

बाजार समित्यांची रचना.

**१३.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने प्रत्येक बाजार समिती पुढील [२][* *] सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

[३][(क) बाजार क्षेत्रात राहणारे (जिल्हाधिकाऱ्याने याबाबत वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षांहून कमी वयाचे नसतील असे) खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तेरा शेतकरी,—

(एक) नऊ (यापैकी दोन महिला सदस्य असतील) (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली करण्यात आलेले नियम याच्या अर्थांतर्गत) त्या बाजार क्षेत्रात कार्य करणाऱ्या कृषि पत संस्था आणि बहुउद्देशीय सहकारी संस्था यांच्या व्यवस्थापन समित्यांच्या सदस्यांनी निवडून दिलेले असतील; आणि

(दोन) चार, तेथे कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी निवडून दिलेले असतील (त्यापैकी एक अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींमधील व्यक्ती असेल आणि एक आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्ती असेल)];

[४][(ख) बाजार क्षेत्रात व्यापारी व अडते म्हणून काम करण्यासाठी दोन वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीकरिता लायसन धारण करणाऱ्या व्यापाऱ्यांनी व अडत्यांनी निवडून दिलेले दोन सदस्य;]

[५][(ख-१) एक सदस्य हा बाजार क्षेत्रात हमाल व तोलारी म्हणून काम करणाऱ्या हमालांनी व तोलाऱ्यांनी निवडून दिलेला असेल;]

---

१. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ द्वारे, पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

२. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८ (अ) (एक) अन्वये "अठरा" हा शब्द वगळण्यात आला.

३. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम २ द्वारे, पोट-कलम (१) मध्ये खंड (क) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

४. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ (क) द्वारे, खंड (ख) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

५. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८ (अ) (चार) अन्वये खंड (ख) नंतर खंड (ख-१) समाविष्ट करण्यात आला.

(ग) बाजार क्षेत्रात कृषि उत्पन्नावर प्रक्रिया करण्याचा किंवा त्याच्या पणनाचा धंदा करणाऱ्या [१][व जिचे नोंदणीकृत कार्यालय त्याच बाजार क्षेत्रात स्थित आहे अशा] सहकारी संस्थेचा सभापती; किंवा त्याच्या अनुपस्थितीत, अशा सहकारी संस्थेच्या व्यवस्थापन समितीने निवडून दिलेला त्या संस्थेचा एक प्रतिनिधी :

परंतु बाजार क्षेत्रात अशा एकाहून अधिक सहकारी संस्था असतील तर अशा सहकारी संस्थांपैकी कोणत्याही एका सहकारी संस्थेचा सभापती किंवा त्याच्या अनुपस्थितीत अशा संस्थेच्या व्यवस्थापन समित्यांनी निवडून दिलेला एक प्रतिनिधी;

(घ) एक सदस्य हा, बाजार क्षेत्र किंवा त्याचा मोठा भाग ज्या पंचायत समितीच्या अधिकारितेमध्ये असेल त्या पंचायत समितीचा सभापती किंवा अशा पंचायत समितीने निवडून दिलेला प्रतिनिधी असेल;

(ङ) एक सदस्य हा, मुख्य बाजार ज्या स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेमध्ये असेल त्या (पंचायत समितीहून अन्य) स्थानिक प्राधिकरणाचा अध्यक्ष किंवा सरपंच अथवा अशा स्थानिक प्राधिकरणाने निवडून दिलेला एक प्रतिनिधी असेल;

[२][(च) त्या जिल्ह्याचा उपनिबंधक, सहकारी संस्था किंवा त्याचा प्रतिनिधी; याला मतदानाचा हक्क असणार नाही];

(छ) [३][बाजार समितीचा सचिव यास मतदानाचा हक्क असणार नाही.]

[४][(छ-क) खंड (ग) (घ) आणि (ङ) अन्वये जी व्यक्ती, बाजार समितीची सदस्य आहे तिला समितीच्या चर्चेमध्ये भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु, तिला समितीच्या सभेच्यावेळी मत देण्याचा हक्क नसेल.]

---

१. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ (ख) द्वारे, "पणनाचा धंदा करण्याऱ्या" या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७३, कलम २ अन्वये मूळ खंडऐवजी खंड (च) दाखल करण्यात आला.

३. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ (ग) द्वारे खंड (छ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ६ (घ) द्वारे खंड (छ) नंतर हा खंड दाखल करण्यात आला.

[१][(१-क) (क) या कलमाचे पोट-कलम (१) किंवा कलम ४ किंवा या अधिनियमाच्या इतर तरतुदी यांत काहीही अंतर्भूत असले तरी, बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्यातील तुर्भे गाव [२][आणि राज्य शासनाकडून वेळोवेळी, राजपत्रात अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल, असे क्षेत्र किंवा क्षेत्रे यांनी मिळून बनलेले (ज्यास यात यापुढे "मुंबई बाजार क्षेत्र" असे म्हटले आहे) क्षेत्र हे अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी बाजार क्षेत्र असल्याचे मानण्यात येईल आणि त्या क्षेत्राची, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती म्हणून संबोधण्यात येणारी बाजार समिती ही पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने पुढे दिलेल्या [३][* * *] सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(एक) राज्यातील इतर कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कृषि सदस्यांनी निवडून दिलेले बारा कृषक प्रतिनिधी, [४][असे दोन सदस्य] प्रत्येक महसुली विभागातून निवडून द्यावयाचे आहेत;

[५][(दोन) खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, मुंबई बाजार क्षेत्रातील व्यापारी व अडते म्हणून काम करण्यासाठी अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या व्यापाऱ्यांनी व अडत्यांनी निवडून दिलेले पाच प्रतिनिधी :—

(क) कांदा, बटाटा आणि लसणाचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला एक प्रतिनिधी;

(ख) फळांचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला एक प्रतिनिधी;

(ग) भाजीपाल्याचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला एक प्रतिनिधी;

(घ) धान्य, डाळी, खाद्य तेल व अखाद्य तेले यांचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला एक प्रतिनिधी;

(ङ) इतर सर्व विक्रेय वस्तूंचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला एक प्रतिनिधी;

(तीन) नवी मुंबई महानगरपालिकेचा एक नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी;

(चार) मुंबई महानगरपालिकेचा एक नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी;

(पाच) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा एक नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी; १९७५ चा महा. ४.

---

१. सन १९७६ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८, कलम २ (१) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ३ द्वारे, "ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्यातील तुर्भे गाव" या मजकुरानंतर हा मजकूर सामाविष्ट करण्यात आला.

३. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८ (ब) (एक) अन्वये हा शब्द वगळण्यात आला.

४. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २ (क) तीन अन्वये मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आले.

५. सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २ (१) अन्वये उपखंड (दोन) आणि (तीन) ते (सात) ऐवजी दाखल करण्यात आले.

(सहा) राज्यातील तीन प्रतिनिधी, त्यापैकी दोन महिलांमधून आणि एक अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींमधून राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील;

(सात) संचालक, कृषि पणन, महाराष्ट्र राज्य, पुणे;]

[१][(दोन-क) त्या बाजार क्षेत्रात हमाल व तोलारी म्हणून काम करणाऱ्या हमालांनी व तोलाऱ्यांनी निवडलेला एक प्रतिनिधी];

[२][परंतु, सभापती व उपसभापती हे याप्रमाणे शेतकरी सदस्यांमधून नामनिर्देशित करण्यात येतील];

(आठ) [३]* * * * *

(नऊ) [३]* * * * *

[४][(ख) खंड (क) चे उपखंड (तीन), (चार), (पाच) किंवा (सात) या अन्वये बाजार समितीचा सदस्य असेल अशा व्यक्तीस, समितीच्या चर्चांमध्ये भाग घेण्याचा हक्क असेल, पण, तिच्या सभेत मतदान करण्याचा हक्क असणार नाही."]

[५][(१-ख) (क) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही कृषि उत्पन्न बाजार समितीला एकापेक्षा अधिक जिल्ह्यांसाठी विभागीय बाजार समिती म्हणून किंवा एकापेक्षा अधिक तालुक्यांसाठी प्रादेशिक बाजार समिती म्हणून घोषित करता येईल.

(ख) राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट केले असेल असे क्षेत्र हे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी बाजार क्षेत्र असल्याचे मानण्यात येईल आणि त्या क्षेत्राकरिता असलेल्या बाजार समितीला, राज्य शासनाने अधिसूचित केले असेल अशा नावाने ओळखले जाईल आणि ती विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती म्हणून कार्य करील.

(ग) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती ही पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(एक) विभागीय बाजार समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये अंतर्भूत असलेल्या प्रत्येक जिल्ह्यामधील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी सदस्यांनी निवडून दिलेले, शेतकऱ्यांचे दोन प्रतिनिधी; किंवा

---

१. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८ (ब) (दोन) अन्वये उपखंड (दोन) नंतर हा उपखंड समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ (क) अन्वये पोट-कलम (२) मध्ये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

३. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २ कलम २ (अ) (सात) अन्वये उपखंड (आठ) आणि (नऊ) वगळण्यात आले.

४. सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २ (२) द्वारे खंड (ख) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

५. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ९ (१) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

(दोन) प्रादेशिक बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात अंतर्भूत असलेल्या प्रत्येक तालुक्यामधील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी सदस्यांनी निवडून दिलेला, शेतकऱ्यांचा एक प्रतिनिधी;

(तीन) बाजार क्षेत्रामध्ये व्यापारी व अडत्या म्हणून काम करण्याचे लायसन धारण करणाऱ्या व्यापाऱ्यांनी व अडत्यांनी निवडून दिलेले दोन प्रतिनिधी;

(चार) बाजार क्षेत्रात हमाल व तोलारी म्हणून काम करणाऱ्यांनी निवडून दिलेला, एक प्रतिनिधी;

(पाच) राज्य पणन मंडळाचा एक प्रतिनिधी;

(सहा) बाजार समितीच्या मुख्यालयाच्या जागी कार्यरत असलेल्या महानगरपालिकेचा किंवा नगर परिषदेचा एक प्रतिनिधी;

(सात) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे किंवा त्याचा प्रतिनिधी.

(घ) खंड (ग) च्या उप-खंड (पाच), (सहा) आणि (सात) खालील बाजार समितीचा सदस्य असलेल्या एखाद्या व्यक्तीस, समितीच्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल. परंतु, तिच्या बैठकीमध्ये मत देण्याचा हक्क असणार नाही.]

(२) जेव्हा बाजार समितीची रचना [१][— मग ते पोट-कलम (१) अन्वये असो [२][(१-क) किंवा (१-ख)] अन्वये असो—] प्रथमच करण्यात आली असेल तेव्हा तिचे सर्व सदस्य आणि सभापती व उपसभापती हे राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले असतील.

**सदस्यांची निवडणूक व त्यांचा पदावधी.**

**१४.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने, नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने सदस्य निवडून दिले जातील. अशा नियमांत, मतदारसंघ निर्धारित करणे, मतदारांची यादी तयार करणे व ठेवणे, निवडून येण्यास अर्ह असलेल्या व्यक्ती, सदस्य म्हणून निवडण्यासाठी व सदस्य होण्यासाठी निरर्हता, मतदानाचा हक्क, अनामत रक्कम देणे व ती समपहृत करणे, निवडणूक विवादांचा निर्णय करणे व निवडणुकीच्या खर्चासंबंधीची तरतूद धरून तत्संबंधित सर्व बाबींसंबंधीसुद्धा तरतूद करता येईल.

(२) जर कोणत्याही कारणास्तव कोणत्याही व्यक्ती सहकारी संस्था किंवा तिची व्यवस्थापन समिती किंवा पंचायत समिती किंवा स्थानिक प्राधिकरण कोणतेही सदस्य निवडून देण्यात कसूर करील तर, संचालक त्यांना लेखी नोटीस देऊन, अशा नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत सदस्य निवडून देण्यास फर्मावील; आणि पूर्वोक्त कालावधीच्या आत सदस्य निवडून देण्यात पुन्हा कसूर करण्यात आली तर संचालक अशा व्यक्तींच्या, सहकारी संस्थेच्या, समितीच्या, पंचायत समितीच्या, किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या वतीने, कलम १३, पोट-कलम (१) [३][किंवा (१-क)] अन्वये निवडून येण्यास अर्ह असलेल्या आवश्यक तेवढ्या व्यक्तींची नेमणूक करील.

---

[१] सन १९७६ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८, कलम २ (२) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ९ (२) द्वारे, "किंवा (१-ख) ऐवजी" दाखल करण्यात आले.

[३] सन १९७६ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज बाजार समितीचे (प्रथमत:च रचना केलेली समिती नसेल अशा), सदस्य [1][पाच वर्षांच्या] कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करतील आणि प्रथमत:च रचना केलेल्या समितीचे सदस्य दोन वर्षांच्या कालावधीकरिता अधिकारपद धारण करतील:

[2][परंतु, पहिल्यांदा घटित केलेली बाजार समिती शासनाकडून बदलली जाऊ शकेल आणि अशा प्रकारे बदललेली नवीन समिती उर्वरित कालावधीसाठी पद धारण करील.]

[3][[4][परंतु आणखी असे की, समितीच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणांमुळे पूर्वोक्तानुसार समितीच्या सदस्यांचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी समितीच्या सदस्यांची सर्वसाधारण निवडणूक घेणे शक्य झाले नाही तर, राज्य शासनास, **राजपत्रातील** आदेशाद्वारे, वेळोवेळी, अशा कोणत्याही समितीचा पदावधी वाढविता येईल; मात्र अशा प्रकारे वाढविण्यात आलेला पदावधी एकंदर एक वर्षाहून अधिक असणार नाही];

[5][(३-क) जेव्हा टंचाई, दुष्काळ, पूर, आग किंवा इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाळा, यामुळे किंवा राज्य विधानमंडळाचा किंवा संसदेचा किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही निवडणूक कार्यक्रम, आणि कोणत्याही बाजार समितीचा निवडणूक कार्यक्रम एकाच वेळी आल्यामुळे, किंवा राज्य शासनाच्या मते विशेष असेल अशा इतर कारणामुळे, कोणत्याही बाजार समितीच्या निवडणुका घेणे हे लोकहिताचे असणार नाही, तेव्हा, राज्य शासनास, या अधिनियमामध्ये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांमध्ये किंवा उपविधींमध्ये, किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही बाजार समितीची निवडणूक कारणे लेखी नमूद करून, एका वेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी पुढे ढकलता येईल. परंतु, तो कालावधी अशा रीतीने आणखी वाढविता येईल, की, जेणेकरून एकूण कालावधी एक वर्षापेक्षा अधिक होणार नाही.]

[6][ (४) (क) कोणत्याही पोट-निवडणुकीच्या निकालानंतर किंवा उपखंड (ख) च्या तरतुदींच्या अधीनतेने, सार्वत्रिक निवडणुकीचे सर्व निकाल उपलब्ध झाल्यावर जिल्हाधिकारी, शक्य तितक्या लवकर, समितीच्या निवडून आलेल्या एका किंवा अनेक सदस्यांची नावे **राजपत्रात** तसेच, त्या

---

1. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम २ अन्वये "तीन वर्षांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
2. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ७ (क) (एक) अन्वये पोट-कलम (३) मध्ये परंतुक समाविष्ट करण्यात आले.
3. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९ (अ) अन्वये पोट-कलम (३) मध्ये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
4. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ७ (क) (दोन) अन्वये, "परंतु" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
5. वरील अधिनियमाच्या कलम ७ (ख) अन्वये पोट-कलम (३) नंतर हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.
6. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ कलम ९ (ब) अन्वये पोट-कलम (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

बाजार क्षेत्रात खप असलेल्या मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करील किंवा प्रसिद्ध करण्याची तजवीज करील. पूर्वोक्तानुसार, वृत्तपत्रातून नावाची किंवा नावांची प्रसिद्धी ही, या कलमाच्या प्रयोजनार्थ, बाजार समितीच्या निवडून आलेल्या सदस्याच्या किंवा सदस्यांच्या नावाची किंवा नावांची पुरेशी प्रसिद्धी असल्याचे मानण्यात येईल.

(ख) एखाद्या सार्वत्रिक निवडणुकीत, कलम १३ च्या पोट-कलम (१) किंवा (१-क) अन्वये निवडावयाच्या कोणत्याही व्यक्तींची नावे कोणत्याही कारणामुळे पूर्वोक्तानुसार प्रसिद्ध होऊ शकत नसतील तर, आणि निवडणुकीच्या उपलब्ध निकालानुसार समिती बारापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांची मिळून बनलेली असेल तर, त्याबाबतीत, जिल्हाधिकारी, या सदस्यांची नावे पूर्वोक्तानुसार **राजपत्रात** तसेच एखाद्या वृत्तपत्रात प्रसिद्ध करील.

(ग) उरलेल्या निवडणुकांच्या बाबतीत, अशा निवडणुकांचे निकाल जसजसे उपलब्ध होतील त्याप्रमाणे जिल्हाधिकारी त्याच पद्धतीने सदस्यांची नावे किंवा यथास्थिति, निवड न केल्यास, पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही व्यक्तींची रीतसर नेमणूक करण्यात आली असेल अशा व्यक्तींची नावे प्रसिद्ध करील.

(घ) प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर, समितीच्या सर्व सदस्यांची नावे खंड (क) अन्वये प्रसिद्ध करण्यात आल्यावर किंवा यथास्थिति ज्यायोगे उपरोक्तप्रमाणे समिती बारापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांची मिळून तयार होईल अशी नावे या पोट-कलमान्वये वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्यावर बाजार समितीची रीतसर रचना झाली असल्याचे मानण्यात येईल.]

[1][१४-क (१) बाजार समित्यांच्या सर्व निवडणुकांसाठी मतदारांची यादी करणे आणि बाजार समितीच्या सर्व निवडणुकांचे कामकाज चालविणे याबाबतचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण, जिल्हाधिकाऱ्यांमध्ये निहित असेल; आणि मतदारांची यादी तयार करण्याच्या आणि निवडणुकांचे कामकाज चालविण्याच्या प्रयोजनासाठी प्रत्येक बाजार समिती या अधिनियमान्वये तिला कोणत्याही वर्षात फीच्या रूपाने मिळालेल्या सर्व रक्कमांच्या [2][दोन टक्के] किंवा दरसाल [3][दहा हजार] रुपये, यांपैकी जी कमी असेल त्या रकमेचा मिळून होईल असा निवडणूक निधी स्थापन करील: निवडणूक निधी.

[4][परंतु, जर निवडणूक निधीच्या अभावी कोणत्याही बाजार समितीला अशा बाजार समितीची निवडणूक घेणे शक्य नसेल तर महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ जिल्हाधिकाऱ्याला अशा बाजार समितीची निवडणूक घेणे शक्य व्हावे म्हणून असा निधी पुरवील, अशी निवडणूक घेण्यात आल्यानंतर बाजार समिती जिल्हाधिकाऱ्याकडे, अशा निवडणुकीसाठी त्याने केलेल्या खर्चाची

---

१. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम २ अन्वये कलम १४-क समाविष्ट करण्यात आले.

२. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ८ (क) अन्वये, "पाच टक्के" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ (ख) अन्वये, "दोन हजार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ८ (ख) अन्वये, परंतुक दाखल करण्यात आले.

प्रतिपूर्ती करील आणि जिल्हाधिकाऱ्याकडे अशी प्रतिपूर्ती करण्यात तिने कसूर केल्यास निवडणुकीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत अशी बाजार समिती, उक्त कालावधी समाप्त झाल्यावर विसर्जित करण्यांत येईल. परंतु, जिल्हाधिकाऱ्यांकडे निवडणूक खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी असलेला एक वर्षाचा कालावधी संचालकाला पुरेशा कारणासाठी ती कारणे लेखी नमूद करून एक वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या पुढील कालावधीसाठी वाढविता येईल.]

(२) वर्षभरात घ्यावयाच्या निवडणुका आणि अशा निवडणुकांसाठी मतदारांची यादी तयार करण्यासाठी किंवा अशा निवडणुकांचे कामकाज चालविण्यासाठी किंवा या दोन्हींकरिता निधीतून पैसा उपलब्ध होण्याची गरज विचारात घेऊन, संचालक निदेश देईल अशा रीतीने निवडणूक निधी गुंतविण्यात येईल.

(३) प्रत्येक बाजार समिती दरवर्षी ३१ ऑक्टोबरपर्यंत आणि जिल्हाधिकारी फर्मावील अशा इतर कोणत्याही वेळीसुद्धा निवडणूक निधीत जमा असलेल्या रकमेबाबत जिल्हाधिकाऱ्यास कळवील.

(४) मतदारांची यादी तयार करावयाची असेल किंवा ती सुधारावयाची असेल किंवा बाजार समितीच्या कोणत्याही निवडणुका घ्यावयाच्या असतील त्या त्या वेळी जिल्हाधिकारी त्याबाबत बाजार समितीस लेखी कळवील, आणि मतदारांची यादी तयार करण्यासाठी किंवा ती सुधारण्यासाठी किंवा यथास्थिति, निवडणुकांचे कामकाज चालविण्यासाठी किंवा या दोन्हींसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी, लेखी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी, त्यांच्याकडे निक्षिप्त करण्यास बाजार समितीस फर्मावील.

(५) मतदारांची यादी तयार केल्यानंतर किंवा ती सुधारल्यानंतर किंवा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर, जिल्हाधिकारी, अशी यादी तयार करण्यासाठी किंवा ती सुधारण्यासाठी अथवा निवडणुकांचे कामकाज चालविण्यासाठी आलेल्या खर्चाचे विवरण तयार करील. आणि अशा रीतीने यादी तयार केल्याच्या किंवा ती सुधारल्याच्या किंवा निकाल जाहीर केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत ते बाजार समितीकडे माहितीसाठी पाठवील. खर्च न झालेली उर्वरित रक्कम असल्यास, ती बाजार समितीस परत करण्यात येईल. खर्च झालेली रक्कम निक्षिप्त केलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल तर जिल्हाधिकारी बाजार समितीस तो विनिर्दिष्ट करील तेवढी जादा रक्कम, त्यांच्याकडून निदेश मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत भरण्यास फर्मावील आणि बाजार समिती अशा निदेशांचे पालन करील.]

[१][(६) मुंबई बाजार क्षेत्राच्या मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत, जिल्हाधिकारी, मुंबई, हा, या कलमाच्या प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्याला असलेल्या अधिकाराचा वापर करील व त्याची कर्तव्ये बजावील.]

सदस्यांच्या पदावधीचा प्रारंभ.

**१५.** (१) बाजार समितीच्या सदस्यांचा पदावधी हा, बाजार समितीच्या ज्या पहिल्या सभेत कामकाज चालविण्यात आले असेल त्या सभेच्या तारखेला सुरू होतो असे मानले जाईल:

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८, कलम ४ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[1][परंतु, कलम १३ च्या पोट-कलम (१) किंवा (१-क) मध्ये निर्देशिलेल्या, सदस्यांच्या कोणत्याही प्रवर्गातील जी कोणतीही व्यक्ती, ती प्रतिनिधी असल्याच्या किंवा अधिकारपद धारण करीत असल्याच्या किंवा लायसन धारण करीत असल्याच्या सामर्थ्याने सदस्य असेल ती व्यक्ती, असा प्रतिनिधी असण्याचे चालू राहीतोपर्यंत किंवा असे अधिकारपद किंवा असे लायसन धारण करीतोपर्यंतच असा सदस्य म्हणून अधिकारपद धारण करील आणि ती असा प्रतिनिधी असण्याचे किंवा तिने असे अधिकारपद वा लायसन धारण करण्याचे बंद झाल्यावर ती असा सदस्य असण्याचे बंद होईल व तिने आपले अधिकारपद रिकामे केले असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्या दिनांकाला बाजार समितीच्या पहिल्या सभेचे कामकाज चालविण्यात आले असेल ती तारीख ही, सभापती व उपसभापती यांच्या निवडणुकीकरिता कलम २२ च्या पोट-कलम (१) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याने बोलविलेल्या सभेची तारीख असेल;]

[2][* * *]

(३) मावळत्या सदस्यांचा पदावधी, अशा पहिल्या सभेच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तारखेपर्यंत चालू राहतो व त्या तारखेला संपतो असे मानले जाईल.

[3][१५-क (१) या अधिनियमाच्या कलम १५, पोट-कलम (३) मध्ये किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये, काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही बाजार समितीच्या सदस्यांच्या दोन वर्षांचा किंवा पाच वर्षांचा पदावधी [4][* * *] कलम १४, पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये कोणताही वाढीव पदावधी असल्यास, तो संपलेला असेल त्याबाबतीत, संचालक किंवा त्याने प्राधिकृत केलेला, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही अधिकारी, लेखी आदेशाद्वारे, असा निदेश देईल की,— सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर प्रशासक नेमण्याची तरतूद.

(क) समितीचे सर्व सदस्य, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून, सदस्य म्हणून किंवा अन्यथा असलेली आपली अधिकारपदे धारण करण्याचे बंद होईल व ते ती अधिकारपदे रिकामी करतील; आणि

(ख) संचालकाने किंवा अशा प्राधिकृत अधिकाऱ्याने वेळोवेळी नेमलेली व्यक्ती ही, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून आणि निवडणूक घेतल्यानंतर, पुनर्रचित समितीची गणपूर्ती असलेली पहिली सभा होईल त्या दिवसापर्यंतच्या कालावधीत (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त

---

१. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १० (अ) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १० (ब) अन्वये, पोट-कलम (२) हे वगळण्यात आले.

३. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ४ अन्वये कलम १५-क समाविष्ट करण्यात आले.

४. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११ (अ) अन्वये "किंवा यथास्थिति" या शब्दांनी सुरू होणारा व "अंमलात असलेल्या" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

कालवधी" असा करण्यात आला आहे) समितीचे कामकाज पाहण्यासाठी प्रशासक म्हणून असेल. अशी निवडणूक ही प्रशासकाने अधिकारपद ग्रहण केल्याच्या तारखेपासून [१][सहा महिन्यांच्या] कालावधीत घेण्यात येईल:

[२][परंतु, अपवादात्मक परिस्थितीत, राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तीत नमूद करण्यात येतील अशा कारणांस्तव हा [३][सहा महिन्यांचा] कालावधी, वेळोवेळी, सर्व मिळून जास्तीत जास्त [४][एक वर्षापर्यंत] वाढविता येईल.]

१९८५ चा महा. २५. [५][ (१-क) "महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा व विधीग्राह्यीकरण) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभापूर्वीच्या पोट-कलम (१) चा खंड (ख) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही समितीचा कारभार पाहण्यासाठी प्रशासकाची नेमणूक करण्यात आली असेल, पण पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे एक वर्षाच्या कालावधीच्या आत समितीची निवडणूक घेण्यात आली नसेल त्याबाबतीत, अशा समितीची निवडणूक घेण्याचा कालावधी दिनांक ३१ मार्च १९८६ हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत वाढविण्यात येईल व तो तसाच वाढविण्यात आला होता असे नेहमीच मानण्यात येईल.]

(२) उक्त कालावधीत हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम व उपविधी किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याखालील समिती व तिची विविध प्राधिकरणे यांच्या सर्व अधिकारांचा वापर व कर्तव्यांचे पालन प्रशासकाकडून केले जाईल.

(३) प्रशासकाला आपल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार व आपल्या कर्तव्यांपैकी कोणतीही कर्तव्ये, त्या त्या वेळी त्याच्या किंवा समितीच्या अधीन असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

(४) प्रशासकाला, संचालक किंवा प्राधिकृत अधिकारी, वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारित करील इतके पारिश्रमिक बाजार निधीतून मिळेल.]

---

१. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११ (ब) अन्वये खंड (ब) मध्ये "एका वर्षाच्या" या मजकुराऐवजी "सहा महिन्यांचा" हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ (अ) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

३. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११ (क) (एक) अन्वये "एक वर्षाचा" या मजकुराऐवजी "सहा महिन्यांचा" हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ११ (क) (दोन) अन्वये "अडीच वर्षापर्यंत" या मजकुराऐवजी "एक वर्षापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ (ब) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

## सदस्यांचा राजीनामा, त्यांना अधिकारपदावरून काढून टाकणे आणि त्यांच्या नैमित्तिक रिकाम्या जागा

१६. (१) बाजार समितीच्या कोणत्याही सदस्यास, सभापतीला उद्देशून त्याने आपल्या सहीनिशी लिहिलेल्या पत्राद्वारे आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल, आणि सभापतीस, संचालकाला उद्देशून आपल्या सहीनिशी लिहिलेल्या पत्राद्वारे आपल्या सदस्यत्वाच्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल. यथास्थिति, सभापती किंवा संचालक ज्या तारखेला राजीनामा स्वीकारील त्या तारखेपासून तो अंमलात येईल. विवक्षित परिस्थितीत सदस्यांचा राजीनामा व नामनिर्देशन.

(२) कोणत्याही बाजार समितीच्या सर्व सदस्यांनी किंवा बहुसंख्य सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे ती बाजार समिती या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार तिच्याकडे सोपविलेली किंवा तिच्यावर लादण्यात आलेली कामे पार पाडण्यास असमर्थ झाली आहे, असे कोणत्याही वेळी राज्य शासनाला दिसून आल्यास, राज्य शासनाला **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, राजीनामा दिलेल्या सदस्यांच्या रिकाम्या जागा भरण्यासाठी, व्यक्ती नामनिर्देशित करता येतील; मात्र याप्रमाणे नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती केवळ ज्यांच्या जागी त्यांना नामनिर्दिष्ट केले असेल त्या सदस्यांच्या उर्वरित पदावधीसाठी किंवा अशा रिकाम्या जागा निवडणुकीद्वारे रीतसर भरण्यात येईपर्यंत—यांपैकी जो अगोदरचा असेल त्या कालावधीपर्यंत—अधिकारपद धारण करतील.

१७. एखादा सदस्य, आपली कर्तव्ये बजावीत असताना हयगय केल्याबद्दल किंवा गैरवर्तणूक केल्याबद्दल किंवा कोणतीही लज्जास्पद वर्तणूक केल्याबद्दल दोषी असेल किंवा सदस्य या नात्याने आपली कर्तव्ये बजावण्यास असमर्थ झाला असेल किंवा त्याला नादार म्हणून न्यायनिर्णीत करण्यात आले असेल तर, राज्य शासनाला, सभेत हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या कमीत कमी [१][दहा सदस्यांनी] पाठिंबा दिलेल्या, बाजार समितीच्या शिफारशीवरून अशा सदस्याला काढून टाकता येईल; गैरवर्तणुकी-बद्दल सदस्याला काढून टाकणे.

परंतु, अशा कोणत्याही सदस्याला राज्य शासनासमोर आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यावाचून अधिकारपदावरून काढून टाकले जाणार नाही.

[२][१८. एखाद्या सदस्याच्या मृत्युमुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याला काढून टाकल्यामुळे, किंवा एखादा सदस्य, सदस्य म्हणून काम करण्यास असमर्थ झाल्यामुळे किंवा अन्यप्रकारे, एखादे पद रिक्त झाल्यास अशा प्रसंगी, बाजार समिती, सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असलेल्या एखाद्या व्यक्तीस स्वीकृत करून असे रिक्त पद भरील: नैमित्तिक रिक्त पदे.

परंतु, बाजार समितीमध्ये कोणत्याही वेळी अशा स्वीकृत सदस्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असणार नाही आणि त्यानंतर कोणतीही रिकामी जागा निवडणूक घेऊन भरण्यात येईल:

---

१. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ७ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ९ अन्वये, कलम १८ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

परंतु, आणखी असे की, एखाद्या सदस्याचा पदावधी संपण्याच्या तारखेपूर्वीच्या सहा महिन्यांत एखादी जागा रिकामी झाली तर, ती रिकामी जागा, राज्य शासनाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, भरण्यात येणार नाही.]

## सभापती व उपसभापती

सभापती व उपसभापती यांची निवडणूक.

**१९.** [1][(१)] कलम १३, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने, प्रत्येक बाजार समितीच्या अध्यक्षस्थानी एक सभापती असेल व [2][निवडून आलेल्या शेतकरी सदस्यांमधून] समिती त्याला निवडून देईल, तसेच [2][निवडून आलेल्या शेतकरी सदस्यांमधून] समिती एका सदस्याला उपसभापती म्हणून निवडून देईल.

[3][(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, यथास्थिति, सभापती किंवा महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९८७ याच्या प्रारंभाच्या तारखेस असे अधिकारपद धारण करीत असलेला सभापती किंवा उपसभापती हा, तो सदस्याच्या ज्या प्रवर्गातील असेल तो प्रवर्ग कोणताही असला तरी, त्याचा पदावधी संपेपर्यंत त्याने त्या अधिकारपदाचा राजीनामा दिलेला नसेल किंवा तो त्या अधिकारपदास निरर्ह ठरविला गेला नसेल किंवा त्याला त्या अधिकारपदावरून मुदतपूर्व काढून टाकण्यात आले नसेल तर असा सभापती किंवा उपसभापती म्हणून अधिकारपद धारण करण्याचे चालू ठेवील. १९८७ चा महा. २७.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादा सदस्य, सभापती किंवा उपसभापती हा, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९८७ याच्या प्रारंभाच्या दिनांकाला एकाहून अधिक कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा असा सदस्य, सभापती किंवा उपसभापती म्हणून अधिकारपद धारण करणार नाही.] १९८७ चा महा. २७.

सभापती व उपसभापती यांचा पदावधी.

**२०.** सभापती व उपसभापती, विहित करण्यात येईल अशा कालावधीकरिता अधिकारपद धारण करतील.

---

[1] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२ (अ) अन्वये कलम १९ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १२ (अ) अन्वये "निवडून आलेल्या सदस्यांमधून" या मजकुराऐवजी "निवडून आलेल्या शेतकरी सदस्यांमधून" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) अन्वये पोट-कलमे (२) आणि (३) ही जादा दाखल करण्यात आली.

२१. सभापती व उपसभापती हे, त्यांचा पदावधी संपला असला तरीही त्यांचे उत्तराधिकारी त्यांच्या अधिकारपदावर येईपर्यंत, [१][किंवा कलम १५-अ अन्वये नेमलेला प्रशासक अधिकारपद ग्रहण करीपर्यंत] अधिकारपद धारण करण्याचे चालू ठेवतील. सभापती व उपसभापती यांनी त्यांचा उत्तराधिकारी अधिकार-पदावर येईपर्यंत अधिकारपद धारण करणे.

[२][२१-क. बाजार समितीची आर्थिक बाजू विचारात घेऊन संचालक विनिर्दिष्ट करील इतक्या रकमेचे मानधन सभापती व उपसभापती यांना देण्यात येईल; तथापि, त्या दोघांना देण्यात येणाऱ्या मानधनाची एकूण रक्कम [३][विहित करण्यात येईल त्या मर्यादेपेक्षा अधिक होता कामा नये]. सभापती व उपसभापती यांना मानधन.

२२. [४][ (१) सार्वत्रिक निवडणुकीनंतर किंवा अन्यथा बाजार समितीची रचना झाल्यावर जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्याने त्याबाबतीत प्राधिकृत केलेला उपजिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा अधिकारी (यात यापुढे या कलमात ज्याचा निर्देश "प्राधिकृत अधिकारी" असा करण्यात आला आहे) कलम १४ चे, पोट-कलम (४) च्या यथास्थिति खंड (क) अन्वये, किंवा खंड (ख) अन्वये घेतलेल्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर केल्यापासून ३० दिवसांच्या आत सभापतीच्या किंवा उपसभापतीच्या निवडणुकीसाठी सभा बोलावील.] सभापती व उपसभापती यांच्या निवडणुकीची कार्यपद्धती.

(२) अशा सभेत [५][जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी], अध्यक्षस्थानी असेल. बाजार समितीचा अध्यक्ष म्हणून काम चालविताना सभापतीला जे अधिकार असतात तेच अधिकार सभेच्या अध्यक्षस्थानी असताना [५][जिल्हाधिकाऱ्याला किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याला] असतील, मात्र त्याला मतदानाचा हक्क असणार नाही.

---

[१] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५ अन्वये, "त्यांचे उत्तराधिकारी त्यांच्या पदावर येईपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ३ अन्वये कलम २१-क समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ६ अन्वये "दरवर्षी रुपये ३,६०० पेक्षा अधिक होता काम नये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३ (अ) अन्वये पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १३ (ख) अन्वये "संचालक किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती" या मजकुराऐवजी "जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी" आणि "संचालकाला किंवा अशा व्यक्तीला" या मजकुराऐवजी "जिल्हाधिकाऱ्याला किंवा अशा प्राधिकृत अधिकाऱ्याला" हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) सभापतीच्या किंवा उपसभापतीच्या निवडणुकीत समसमान मते पडल्यास, अध्यक्षपदस्थ अधिकाऱ्यासमक्ष तो ठरवील अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून निवडणुकीचा निर्णय करण्यात येईल.

(४) सभापतीच्या किंवा उपसभापतीच्या निवडणुकीच्या विधिग्राह्यतेबाबत विवाद उपस्थित झाल्यास, [१][जिल्हाधिकारी] अध्यक्षस्थानी असल्यास तो स्वतः त्या विवादाचा निर्णय करील; आणि इतर कोणत्याही बाबतीत, अध्यक्षस्थानी असणारा अधिकारी तो विवाद निर्णयासाठी [१][जिल्हाधिकाऱ्याकडे] निर्देशित करील. [१][जिल्हाधिकाऱ्याचा] त्यावरील निर्णय अंतिम असेल, मात्र त्यावर [२][महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ६ अन्वये नेमलेल्या आयुक्ताकडे] अपील करता येईल; आणि अशा कोणत्याही निर्णयाच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही. १९६६ चा महा. ४१

सभापतीचा व उप-सभापतीचा राजीनामा.

**२३.** (१) सभापतीला स्वतःच्या सहीने संचालकाला उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल; आणि तो राजीनामा ज्या तारखेस स्वीकारला असेल त्या तारखेपासून तो अंमलात येईल.

(२) उपसभापतीला स्वतःच्या सहीने सभापतीला उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे, आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल; आणि तो राजीनामा ज्या तारखेला स्वीकारला असेल त्या तारखेपासून तो अंमलात येईल.

सभापती विरुद्ध किंवा उपसभापती विरुद्ध अविश्वासाचा ठराव.

[३][**२३-क.** (१) बाजार समितीने विशेष सभेत एकूण सदस्यसंख्येच्या (मतदान करण्याचा हक्क नसेल असे सदस्य वगळून) दोन तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे तसा निर्णय घेतला असेल तर, सभापती किंवा उपसभापती हे, यथास्थिति सभापती किंवा उपसभापती असण्याचे ताबडतोब बंद होईल.]

---

१. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३ (ग) (एक) अन्वये पोट-कलम (४) मध्ये "संचालक" या शब्दाऐवजी "जिल्हाधिकारी" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ (ग) (दोन) अन्वये " राज्य शासनाकडे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ७ अन्वये कलम २३-क समाविष्ट करण्यात आले.

(२) अशा विशेष सभेबाबतच्या मागणीपत्रावर एकूण सदस्य संख्येच्या एक द्वितीयांशाहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी (मतदान करण्याचा हक्क नसेल असे सदस्य वगळून) सही केलेली असेल आणि ते मागणीपत्र, जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल व त्याबाबत संचालकांना कळविण्यात येईल.

(३) जिल्हाधिकाऱ्याला, पोट-कलम (२) खालील मागणीपत्र मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत, समितीची विशेष सभा बोलाविता येईल:

परंतु, जिल्हाधिकारी जेव्हा समितीची अशी विशेष सभा बोलावील तेव्हा, तो त्याबाबत यथास्थिति, सभापतीस किंवा उपसभापतीस आणि संचालकासही कळवील.

(४) (क) पोट-कलम (१) खालील ठरावावर विचार करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या विशेष सभेत जिल्हाधिकारी किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी अध्यक्षस्थानी असेल; परंतु जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास किंवा संचालकास (उपस्थित असल्यास) अशा सभेत मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(ख) समितीच्या ज्या सदस्यांना मतदान करण्याचा हक्क नसेल त्यांना चर्चेत भाग घेता येईल, पण त्यांना मतदान करता येणार नाही.

[१][(५) वर सांगितल्याप्रमाणे अविश्वासाचा ठराव संमत करण्यात आलेला नसेल किंवा गणपूर्तीअभावी सभा भरविता आली नसेल तर अशा सभेच्या तारखेपासून सहा महिने संपेतोपर्यंत त्याच सभापतीवर किंवा उपसभापतीवर अविश्वास दर्शविणारा असा नवीन प्रस्ताव विचारात घेण्याची मागणी करण्यात येणार नाही.]

परवानगी खेरीज सभापती उपसभापती किंवा सदस्य अनुपस्थित राहिल्याचे परिणाम.

[२][**२४.** राज्य शासन, याबाबतीत जे नियम करील त्यांच्या अधीनतेने, बाजार समितीचा सभापती, उपसभापती किंवा सदस्य, बाजार समितीच्या परवानगीशिवाय बाजार समितीच्या लागोपाठच्या तीन सभांना अनुपस्थित राहिल्यास तो बाजार समितीचा सभापती, उपसभापती किंवा सदस्य असण्याचे बंद होईल.]

---

१ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४ अन्वये कलम २३-क मध्ये पोट-कलम (४) नंतर हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

२ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १० अन्वये कलम २४ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

**सभापती व उपसभापती यांची रिकामी झालेली अधिकारपदे भरणे.**

२५. (१) सभापती किंवा उपसभापती मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याला काढून टाकल्यामुळे, किंवा इतर अन्यथा त्याचे अधिकारपद रिकामे झाले तर, कलम १९ च्या तरतुदींच्या अधीनतेने शक्य तितक्या लवकर असा सभापती किंवा उपसभापती निवडून आलेला असल्यास निवडणुकीद्वारे किंवा नामनिर्देशित असल्यास नामनिर्देशनाद्वारे त्याची रिकामी जागा भरण्यात येईल.

(२) नैमित्तिक रिकामी जागा भरण्यासाठी या कलमान्वये निवडून देण्यात आलेला किंवा नामनिर्देशित करण्यात आलेला प्रत्येक सभापती किंवा उपसभापती, ज्याच्या जागी त्याला निवडून देण्यात आले असेल किंवा यथास्थिति, त्याला नामनिर्देशित करण्यात आले असेल त्या सभापतीने किंवा उपसभापतीने ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या कालावधीपर्यंत ते अधिकारपद धारण केले असते त्याच कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करील.

**नवीन सभापतीकडे किंवा उपसभापतीकडे कार्यभार सोपवण्यास नकार देणे.**

२६. (१) नवीन सभापती किंवा उपसभापती निवडून देण्यात आल्यावर किंवा त्याला नामनिर्देशित करण्यात आल्यावर ज्या मावळत्या सभापतीच्या किंवा उपसभापतीच्या जागी नवीन सभापतीला किंवा उपसभापतीला निवडून देण्यात आले असेल किंवा नामनिर्देशित करण्यात आले असेल, तो सभापती किंवा उपसभापती आपल्या अधिकारपदाचा कार्यभार यथास्थिति, अशा नवीन सभापतीकडे किंवा उपसभापतीकडे ताबडतोब सोपवील.

(२) जर मावळत्या सभापतीने किंवा उपसभापतीने पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे आपल्या अधिकारपदाचा कार्यभार सोपविला नाही किंवा सोपविण्यास नकार दिला तर संचालक किंवा याबाबतीत संचालकाने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी लेखी आदेशाद्वारे त्यांना आपल्या अधिकारपदाचा कारभार तात्काळ सोपविण्याविषयी आणि सभापती किंवा उपसभापती म्हणून त्यांच्या कब्जात बाजार समितीची कोणतीही कागदपत्रे, निधी व मालमत्ता, असल्यास ती, नवीन सभापतीच्या किंवा उपसभापतीच्या स्वाधीन करण्याविषयी यथास्थिति, सभापतीला किंवा उपसभापतीला निदेश देऊ शकेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये ज्याला निदेश देण्यात आला आहे अशा मावळत्या सभापतीने किंवा उपसभापतीने अशा निदेशाचे अनुपालन केले नाही तर संचालकास किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, अशा सभापतीच्या किंवा उपसभापतीच्या कब्जात असलेली समितीची कागदपत्रे, निधी व मालमत्ता यांचे अभिग्रहण करण्यासाठी व ती कब्जात घेण्यासाठी ज्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या अधिकारितेमध्ये ती समिती काम करीत असेल अशा कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(४) पोट-कलम (३) खाली अर्ज मिळाल्यावर, दंडाधिकाऱ्यास, जेथे अभिलेख व मालमत्ता ठेवण्यात आली असेल किंवा ठेवण्याचा संभव असेल अशा कोणत्याही जागेत प्रवेश करण्यासाठी व झडती घेण्यासाठी आणि ते अभिलेख व मालमत्ता याचे अभिग्रहण करण्यासाठी व ती यथास्थिती, नवीन सभापतीच्या किंवा उपसभापतीच्या कब्जात देण्यासाठी, फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला प्राधिकृत करता येईल.

**बाजार समितीची सभा वगैरे.**

**२७.** बाजार समितीच्या सभा, सभेची गणपूर्ती व सभेची कार्यपद्धती या गोष्टींचे, या प्रयोजनासाठी करण्यात आलेल्या उपविधींअनुसार विनियमन करण्यात येईल.

**बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा.**

[1][**२७-क** (१) कलम २७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती व्यतिरिक्त इतर प्रत्येक बाजार समिती, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीनंतरच्या सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये, तिच्या सदस्यांची व खाली विनिर्दिष्ट केलेल्या आमंत्रितांची एक वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविल:—

(अ) बाजार क्षेत्रातील सर्व प्राथमिक कृषी पत संस्थेचे अध्यक्ष आणि सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच किंवा त्यांचे प्रतिनिधी;

(ब) बाजार क्षेत्रातील अनुज्ञप्तीप्राप्त अडते आणि व्यापारी यांच्या प्रत्येक नोंदणीकृत संस्थेकडून नामनिर्देशित करावयाचे पाच पदाधिकारी. नोंदणीकृत संस्था नसल्यास, बाजार समितीच्या अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचे, अनुज्ञप्तीप्राप्त अडते आणि व्यापारी यांचे पाच प्रतिनिधी;

(क) बाजार क्षेत्रातील हमाल आणि तोलारी यांच्या प्रत्येक नोंदणीकृत संस्थेकडून नामनिर्देशित करावयाचे पाच पदाधिकारी.

(२) बाजार समितीचा सचिव, वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावील. वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख, वेळ आणि ठिकाण विनिर्दिष्ट करणारी नोटीस व कार्यसूची, बाजार समितीच्या सर्व सदस्यांना आणि पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आमंत्रितांना, सभेच्या दिनांकापूर्वी कमीत कमी पंधरा दिवस अगोदर पाठविण्यात येईल.

(३) बाजार समितीचा सभापती, सभेचा अध्यक्ष म्हणून काम पाहील आणि त्याच्या अनुपस्थितीत बाजार समितीचा उपसभापती आणि या दोघांच्या अनुपस्थितीत, सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांकडून निवडून दिलेली व्यक्ती सभेचा अध्यक्ष म्हणून काम पाहील.

(४) प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभेत ताळेबंद, जमाखर्चाचे लेखे, सांविधिक लेखा परीक्षकाने लेखापरीक्षित केलेले लेख्याचे ज्ञापन आणि बाजार समितीचा वार्षिक अहवाल चर्चेसाठी ठेवण्यात येईल आणि समितीच्या कामकाजाबाबतचे विहित करण्यात येतील असे इतर व्यवहारही पार पाडण्यात येतील.

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ११ अन्वये, कलम २७ नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले.

"(५) जर, वार्षिक सर्वसाधारण सभेत कोणत्याही आमंत्रिताने, कोणतीही सूचना केली किंवा कोणतीही हरकत घेतली तर, बाजार समिती अशा सूचनेबाबतचे किंवा हरकतीबाबतचे आपले स्पष्टीकरण, अशा वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत आमंत्रिताकडे पाठवील."]

जागा रिकामी असेल तेव्हा सदस्यांनी कृती करणे, उपचारदोषांमुळे समिती वगैरेच्या कृती विधिअग्राह्य न ठरणे.

**२८.** (१) बाजार समितीमध्ये कोणतीही जागा रिकामी असताना अधिकारपदावर असलेल्या सदस्यांना जणूकाही ती जागा रिकामी झालेलीच नसावी त्याप्रमाणे काम चालू ठेवता येईल.

(२) बाजार समितीमध्ये कोणतीही जागा रिकामी असली किंवा तिच्या रचनेत कोणताही दोष असला तरी, बाजार समितीला काम करण्याचा अधिकार असेल; आणि एखाद्या व्यक्तीला सभेत बसण्याचा किंवा मतदान करण्याचा किंवा कामकाजात अन्यथा भाग घेण्याचा हक्क नसतानाही अशी व्यक्ती सभेत बसली होती किंवा तिने मतदान केले होते किंवा अन्यथा कामकाजात भाग घेतला होता, ही गोष्ट त्यानंतर उघडकीस आली असली तरी, अशा सभेचे कामकाज विधिग्राह्य असेल.

## प्रकरण चार

### बाजार समित्या : अधिकार व कर्तव्ये

बाजार समितीचे अधिकार व कर्तव्ये.

**२९.** (१) बाजार समितीने बाजार क्षेत्रात, हा अधिनियम, तदन्वये केलेले नियम आणि उपविधी यांच्या तरतुदी अंमलात आणणे; बाजार क्षेत्रात कृषि उत्पन्नाच्या पणनाच्या बाबतीत [1][यथास्थिति, संचालक, राज्य पणन मंडळ किंवा राज्य शासन] वेळोवेळी निदेश देईल अशा सुविधांची तरतूद करणे, बाजारांच्या संबंधात अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण याबाबतीत किंवा बाजार क्षेत्रातील कोणत्याही जागी कृषि उत्पन्नाच्या पणनाच्या विनियमनासाठी आणि पूर्वोक्त गोष्टींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशी इतर कामे करणे, हे या बाजार समितीचे कर्तव्य असेल आणि त्या प्रयोजनासाठी तिला या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार तरतूद करण्यात येईल अशा अधिकारांचा वापर करता येईल आणि अशा कर्तव्यांचे पालन करता येईल व अशी कामे पार पाडता येतील.

[2][(२) पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, बाजार समितीला पुढील गोष्टी करता येतील:—

(एक) बाजारात येणाऱ्या लोकांच्या प्रवेशाचे आणि वाहनांच्या वाहतुकीचे विनियमन करणे;

(दोन) जे लोक धंदा चालवण्यासाठी बाजारात प्रवेश करतील त्यांच्या वागणुकीवर देखरेख ठेवणे;

(तीन) लायसन्स देणे, त्याचे नवीकरण करणे, ते नाकारणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे;

---

१ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५ (अ) अन्वये, पोट-कलम (१) मध्ये "संचालक" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५ (ख) अन्वये, पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(चार) बाजार क्षेत्रामधील बाजाराची देखभाल करणे व त्याचे व्यवस्थापन करणे व त्यासह बाजारात प्रवेश देणे व बाजारांचा वापर करण्यासंबंधात शर्ती घालणे;

(पाच) बाजार क्षेत्रामधील बाजारात कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी आवश्यक सुविधा पुरविणे;

(सहा) या अधिनियमाखाली करण्यात आलेले नियम किंवा बाजार समितीचे उपविधी याअन्वये विहित करण्यात आलेल्या तरतुदी व कार्यपद्धती यांच्या अनुसार अधिसूचित कृषि उत्पन्नाच्या लिलावांचे विनियमन करणे व पर्यवेक्षण करणे;

(सात) अधिसूचित कृषि उत्पन्नाची विक्री, त्याचे मोजमाप करणे, ते सुपूर्द करणे, त्यासंबंधात द्यावयाची रक्कम आणि त्याच्या पणनाशी संबंधित इतर सर्व बाबी या विहित पद्धतीने करणे, पार पाडणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे किंवा रद्द करणे या गोष्टींचे विनियमन करणे;

(आठ) कृषि उत्पन्नात भेसळ करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि कृषि उत्पन्नाच्या प्रतवारीस व प्रमाणिकरणास चालना देण्यासाठी व ते आयोजित करण्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना करणे;

(नऊ) शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या किमान आधार किंमतीपेक्षा कमी किंमतीत खरेदी व विक्री करण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे;

(दहा) अधिसूचित कृषि उत्पन्नाचे उत्पादन, विक्री, साठवण, त्यावर प्रक्रिया करणे, त्यांच्या किंमती व त्यांची ने-आण यासंबंधीची माहिती व त्यासह संचालकास आवश्यक वाटेल अशी पिके, त्यांची आकडेवारी व बाजारवृत्त यासंबंधीची माहिती गोळा करणे किंवा ठेवणे, तिचा प्रसार करणे व ती पुरविणे;

(अकरा) बाजार क्षेत्रामध्ये आणण्यात येणारी किंवा विक्री करण्यात येणारी जनावरे, गुरेढोरे, पक्षी इत्यादींच्या बाबतीत पशुरोग डॉक्टरकडून आरोग्यविषयक स्वास्थ्य प्रमाणपत्र मिळविण्यासंबंधात व्यवस्था करणे;

(बारा) बाजार समितीच्या मते प्रभावी किंवा आवश्यक असलेल्या माध्यमातून बाजार क्षेत्रातील विनियमनाचे फायदे, संव्यवहाराची पद्धती, तेथे पुरविण्यात आलेल्या सुविधा यांना प्रसिद्धी देणे;

(तेरा) कृषि उत्पन्नाचे पणन आणि त्याला सहाय्यभूत अशा सर्व बाबी यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रकारच्या संव्यवहारांमधून उद्भवणाऱ्या विवादांची मिटवणूक करण्यासाठी तरतूद करणे;

(चौदा) आपली कर्तव्ये सक्षमतेने पार पाडण्यासाठी कलम १२ च्या तरतुदींच्या अधीनतेने कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता संपादन करणे, धारण करणे किंवा तिची विल्हेवाट करणे;

(पंधरा) कोणताही दावा, खटला, वाद, कार्यवाही, अर्ज किंवा लवाद दाखल करणे किंवा त्यासंबंधात बचाव करणे आणि असा दावा, वाद, कार्यवाही, अर्ज किंवा लवाद यांच्या बाबतीत तडजोड करणे;

(सोळा) विहित पद्धतीने बाजार समितीच्या निवडणुका घेण्यासाठी व्यवस्था करणे;

(सतरा) बाजार समिती ज्या बाबतीत हक्कदार असेल असे आकार, फी, पट्ट्या आणि इतर रकमा किंवा पैसे आकारणे, घेणे, वसूल करणे व स्वीकारणे;

(अठरा) बाजारात वखारविषयक व पणनविषयक सुविधा पुरविण्यासाठी संचालकाची मान्यता मिळविण्याच्या अधीनतेने राज्य शासन व केंद्र सरकार किंवा कोणतीही वित्तव्यवस्था, एजन्सी यांच्याकडून कर्जे, अर्थसहाय्य, आर्थिक मदत मिळविणे;

(एकोणीस) राज्य पणन मंडळाच्या मान्यतेच्या अधीनतेने अर्थसंकल्प तयार करणे, पूरक अर्थसंकल्प तयार करणे, अर्थसंकल्पात पुनर्विनियोजन करणे व त्यानुसार खर्च करणे;

(वीस) ज्यांच्या आधारे वजने व मापे यांची तपासणी करता येईल अशी प्रमाण वजने व मापे यांचा एक संच बाजारात ठेवणे;

(एकवीस) बाजार क्षेत्रात वापरात असलेले तराजू, वजने व मापे यांची आणि तसेच लायसन धारकांनी, विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवलेली लेखा पुस्तके व इतर दस्तऐवज यांचे निरीक्षण व पडताळणी करणे;

(बावीस) या अधिनियमाच्या तरतुदी, बाजारसमितीचे नियम व उपविधी यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक संख्येइतके अधिकारी व कर्मचारी नोकरीस ठेवणे;

(तेवीस) बाजार समितीने नोकरीस ठेवलेले अधिकारी व कर्मचारी यांना, विहित रीतीने वेतन व इतर वित्तलब्धी, निवृत्तिवेतन, रजा भत्ता, उपदाने, अनुकंपा भत्ता आणि रजा भत्ता, निवृत्तिवेतन किंवा भविष्यनिर्वाह निधी यामधील अंशदानार्थ रक्कम देणे;

(चोवीस) या अधिनियमाच्या कलम ३६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाजारनिधीचे प्रशासन करणे व त्यांचा हिशेब ठेवणे आणि विहित पद्धतीने त्याची लेखापरीक्षा करून घेणे;

(पंचवीस) कलम ५२-अ मध्ये तरतूद केल्यानुसार हा अधिनियम, नियम व उपविधी यांच्या तरतुदींचा भंग केल्याबद्दल लोकांवर खटला भरणे व अपराध आपसात मिटविणे;

(सव्वीस) बाजार क्षेत्रामध्ये साठवणविषयक व वखारविषयक सुविधा पुरविणे;

(सत्तावीस) कृषिविषयक पणनाचे विनियमन प्रवर्धित करण्याच्या दृष्टीने हितावह असलेला इतर कोणताही कार्यक्रम राज्य शासन, राज्य पणन मंडळ किंवा संचालक यांच्या पूर्वमंजुरीने हाती घेणे;

(अठ्ठावीस) (अ) ज्याच्या संबंधातील सर्व व्यापार त्या प्रयोजनासाठी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा त्याखाली केवळ राज्य शासनाकडून करण्यात येणार असेल असे बाजार क्षेत्रातील कृषि उत्पन्न; किंवा

(ब) राज्य शासन वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करील असे बाजार क्षेत्रातील इतर कृषिउत्पन्न (यात यापुढे ज्यांचा निर्देश 'अधिसूचित उत्पन्न' असा करण्यात आला आहे), गोळा करण्याची व्यवस्था करणे.]

**३०.** बाजार समितीला आपल्या सदस्यांपैकी एक किंवा अधिक सदस्यांची मिळून (संचालकाची किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची मान्यता घेऊन, समितीने स्वीकृत करून घेतलेल्या कोणत्याही व्यक्ती धरून) एक किंवा अधिक उप-समित्या नेमता येतील; तसेच तिला योग्य वाटतील असे आपले अधिकार किंवा कर्तव्ये, अशा उप-समितीकडे प्रत्यायोजित करता येतील.

उप-समित्यांची नेमणूक, अधिकारांचे प्रत्यायोजन.

[1][याप्रमाणे नेमण्यात आलेली उप-समिती, बाजार समितीचे अधीक्षण, मार्गदर्शन, निदेशन व नियंत्रण याखाली काम करतील.]

[2][**३०-क.** (१) राज्य शासनाने या प्रयोजनार्थ रीतसर प्राधिकृत केलेल्या बाजार समितीस, लेखी आदेशाद्वारे अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेले अधिसूचित उत्पन्न, संचयन केंद्राच्या ठिकाणी गोळा होण्यासाठी संचयन केंद्र उघडता येतील. बाजार समिती तिला योग्य वाटेल अशा रीतीने असा आदेश जनतेच्या माहितीकरिता प्रसिद्ध करील;

अधिसूचित उत्पन्नाच्या पणनासाठी संचयन केंद्रे उघडण्याचा बाजार समितीचा अधिकार; पावतीसंबंधी व खरेदीदाराने रक्कम देण्यासंबंधी तरतुदी.

(२) एखाद्या व्यक्तीची, एखाद्या अधिसूचित उत्पन्नाची बाजार क्षेत्रात विक्री करण्याची इच्छा असेल तर त्याबाबतीत ती व्यक्ती पोट-कलम (१) खाली त्या प्रयोजनार्थ स्थापन केलेल्या संचयन केंद्रामध्ये असे सर्व उत्पन्न अडत्यामार्फत देण्याची व्यवस्था करील;

परंतु, कलम २९, पोट-कलम (२), खंड (छ-१), उप-खंड (दोन) अनुसार अधिसूचित करण्यात आलेले कृषि उत्पन्न देण्याची व्यवस्था करता येईल.

(३) बाजार समिती, अशा उत्पन्नाच्या विक्रीनंतर ताबडतोब त्याचे वजन करण्याची, ते मापण्याची किंवा यथास्थिति, ते मोजण्याची तजवीज करील आणि ज्या व्यक्तीने विक्रीकरिता संचयन केंद्रावर उत्पन्न दिले असेल किंवा अभिकर्त्यामार्फत उत्पन्न देण्यास मुभा असेल त्याबाबतीत यथास्थिति अडत्यामार्फत किंवा शासनाने निश्चित केलेल्या कोणत्याही अभिकरणामार्फत दिले असेल तिला त्याबाबत पावती देण्याची व्यवस्था करील व तसेच खरेदीदारास ती सहकारी संस्था असल्यास तिला, आणि अशा अभिकर्त्यामार्फत किंवा अभिकरणामार्फत पावती देण्यात येत असेल तेव्हा बाजार समितीसदेखील अशा पावतीची एक प्रत देण्याची व्यवस्था करील.

(४) अशा पावतीत खालील तपशिलाचा अंतर्भाव असेल:—

(एक) संचयन केंद्राचे नाव,

(दोन) उत्पन्न देणाऱ्या व्यक्तीचे नाव,

(तीन) खरेदीदाराचे नाव,

(चार) अडत्या असल्यास त्याचे नाव,

(पाच) अधिसूचित उत्पन्नाचे नाव व परिमाण, त्याचे वजन, माप किंवा संख्या व त्यावरील आकार,

(सहा) अधिसूचित उत्पन्नाची कोणतीही प्रत असल्यास, ती प्रत व त्याचा दर,

---

१ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६ अन्वये कलम ३० मध्ये अखेरीस हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ५ अन्वये कलम ३०-क हे समाविष्ट करण्यात आले.

(सात) खरेदीदाराने बाजार समितीस देणे असलेली रक्कम,

(आठ) उत्पन्न देणाऱ्याने, अडत्यास त्याची अडत म्हणून द्यावयाची काही रक्कम असल्यास ती रक्कम व बाजार समितीने रीतसर प्राधिकृत केलेले इतर बाजार आकार,

(नऊ) उत्पन्न देणाऱ्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याचे कलम ४८-अ
१९६१ चा महा. २४. अन्वये सहकारी संस्थांना देणे असलेली रक्कम,

(दहा) कलम २९, पोट-कलम (२), खंड (ग-१), उप-खंड (एक) अन्वये अधिसूचित केलेल्या कृषि उत्पन्नाच्या बाबतीत, उत्पन्न देणाऱ्यास आगाऊ किंमतीची रक्कम मिळालेली असल्यास ती,

(अकरा) नोंद (सात), (आठ), (नऊ) व (दहा) याखाली येणाऱ्या रकमा असल्यास, त्या रकमा वजा केल्यानंतर उत्पन्न देणाऱ्या व्यक्तीस प्रत्यक्ष द्यावयाची रक्कम, आणि

(बारा) खरेदीदाराने खरेदी केलेल्या अधिसूचित उत्पन्नाच्या बाबतीत त्याने द्यावयाची एकूण रक्कम.

(५) बाजार समितीस देय असलेल्या रकमांमध्ये, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली आकारावयाच्या व खरेदीदाराकडून गोळा करावयाच्या फीच्या रकमांचा अंतर्भाव होतो.

(६) पावतीची प्रत मिळाल्यानंतर खरेदीदार, बाजार समितीच्या नावे एक व उत्पन्न देणाऱ्याच्या नावे एक असे दोन धनादेश लिहून, पावतीमध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याने द्यावयाची एकूण रक्कम, ताबडतोब देईल. दोन्ही धनादेश, ते सादर केल्यानंतर त्यांची रक्कम देय असेल. बाजार समितीच्या प्रीत्यर्थ लिहिलेला धनादेश पोट-कलम (४) खालील खंड (सात), (आठ), (नऊ) व (दहा) यामध्ये निर्देशित केलेल्या रकमेइतक्या रकमेचा असेल; आणि उत्पन्न देणाऱ्याच्या नावे लिहिलेला धनादेश पोट-कलम (४) खालील खंड (अकरा) मध्ये निर्देशित केलेल्या रकमेइतक्या रकमेचा असेल. धनादेश मिळाल्यानंतर, बाजार समिती कोणताही अडत्या असल्यास त्याला आणि सहकारी संस्था असल्यास तिला पावतीमध्ये त्या प्रत्येकासमोर नमूद केलेली रक्कम देण्याची व्यवस्था करील आणि तिला येणे असलेली उर्वरित रक्कम बाजार निधीत जमा करील:]

[१][परंतु, राज्य शासन किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये राज्य शासनाने आपल्या वतीने कोणत्याही अधिसूचित उत्पन्नाची खरेदी करण्यासाठी नेमलेला अभिकर्ता हा खरेदीदार असेल त्या बाबतीत, उत्पन्न देणाऱ्यास देय असलेली रक्कम एक तर रोख रकमेत किंवा उत्पन्न देणाऱ्यांच्या सहकारी बँकेतील खात्यात जमा करून देण्यात येईल]

[२][**स्पष्टीकरण.**—हे कलम, ३१ व कलम ३४-क यांच्या प्रयोजनांकरिता, "खरेदीदार" या शब्दांमध्ये, जी व्यक्ती विक्रीसाठी दिलेल्या कोणत्याही अधिसूचित उत्पन्नाची किंवा यथास्थिति कृषि उत्पन्नाची खरेदीची किंमत देईल किंवा जी स्वत:ची म्हणून किंवा अभिकर्ता म्हणून किंवा कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने अशा किमतीचा भरणा करील, अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.]

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम २ हे अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम २ अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

**फी बसविण्याचा [2][व अडतीचे दर] निश्चित करण्याचा बाजार समितीचा अधिकार.**

३१. [1][(१)] बाजार समिती, ती ठरवील (मात्र राज्य शासनाकडून त्या बाबतीत राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निश्चित करण्यात येतील अशा किमान व कमाल दराच्या अधीनतेने) त्या दराने बाजार क्षेत्रात पणन केलेल्या कृषि उत्पन्नाच्या प्रत्येक खरेदीदारावर विहित रीतीने फी बसविण्यास आणि ती गोळा करण्यास सक्षम असेल;

परंतु केवळ प्रक्रिया करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही बाजार क्षेत्रात आणलेले कोणतेही कृषि उत्पन्न, त्या जागी आणल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत त्यावर प्रक्रिया करण्यात आली नाही [3][ ] तर, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईतोपर्यंत त्याचे बाजार क्षेत्रात पणन करण्यात आले आहे असे गृहित धरले जाईल आणि जणू काही त्याचे याप्रमाणे पणन करण्यात आले असावे त्याप्रमाणे ते फी बसविण्यास पात्र ठरेल;

[4]["परंतु आणखी असे की,—

(क) जर असा निर्यातदार किंवा त्याचा यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला अभिकर्ता कोणतेही कृषि उत्पन्न समितीच्या निर्यातीच्या अनन्य प्रयोजनासाठी बाजार क्षेत्रामध्ये आणताना संबद्ध किंवा लागू असेल त्याप्रमाणे पतपत्र किंवा निर्यातीचा कायम केलेला आदेश किंवा माल पाठवणीचा कायम केलेला निर्यात आदेश, संबंधित बाजार समितीने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे, त्यासंबंधातील, राज्य शासन, वेळोवेळी आदेशाद्वारे निदेश देईल अशा नमुन्यातील प्रतिज्ञापत्रासह, सादर करील तर, बाजारक्षेत्रामध्ये आणलेल्या अशा उत्पन्नास फी भरण्यापासून व देखरेख खर्च देण्यापासून सूट देण्यात येईल;

(ख) जर अशा निर्यातदाराने, अशा निर्यातीचा पुरावा म्हणून भरणपत्राची किंवा हवाई वाहतूक आकार देयकाची किंवा राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा इतर कोणत्याही दस्तऐवजांची प्रमाणित प्रत, कृषि उत्पन्न बाजारक्षेत्रामध्ये आणल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत सादर केली नाही तर अशा कृषि उत्पन्नाची बाजार क्षेत्रामध्ये खरेदी-विक्री करण्यात आलेली आहे असे समजण्यात येईल आणि तो निर्यातदार ताबडतोब बाजार क्षेत्रामध्ये असे उत्पन्न आणल्याच्या तारखेपासून अशा कृषि उत्पन्नावर, या कलमान्वयेची बाजार फी व बाजार फी आणि देखरेखीचा खर्च म्हणून देय असलेल्या व भरणा करावयाच्या एकूण रकमेवरील अठरा टक्के व्याजासहित अशा कृषि उत्पन्नावर कलम ३४-क अन्वयेचा देखरेखीचा खर्च देखील भरेल;"]

---

[1] सन १९८७ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७ अन्वये कलम ३१ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) अन्वये "फी बसविण्याचा" या शब्दानंतर "व अडतीचे दर" हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ६ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[4] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७ (अ) अन्वये पोट-कलम (१) नंतर ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

[1][परंतु तसेच,] ज्या कृषि उत्पन्नाच्या संबंधात एखाद्या बाजार क्षेत्रात या कलमान्वये आधीच फी बसविण्यात किंवा गोळा करण्यात आली असेल त्या उत्पन्नाच्या संबंधात [2][किंवा कोणत्याही बाजार क्षेत्रात कोणतीही यंत्रसामग्री किंवा कामगार यांच्या मदतीविना चालविण्यात येणाऱ्या उद्योगांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींनी खरेदी केलेल्या घोषित कृषि उत्पन्नाच्या संबंधात] त्याच बाजार क्षेत्रात अशी कोणतीही फी बसविता किंवा गोळा करता येणार नाही.

[3][(२) बाजार समिती, बाजार क्षेत्रात पणन करण्यात येणाऱ्या एखाद्या कृषि उत्पन्नाच्या किंवा कृषि उत्पन्नाच्या वर्गाच्या संबंधात अडत्यांनी आकारावयाच्या अडतीचा दर राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने निश्चित करण्यास सक्षम असेल.

(३) कृषि उत्पन्नाचे वजन किंवा मोजणी करण्यात आल्यानंतर निश्चित करण्यात आलेली बाजार फी ताबडतोब भरणे हे खरेदीदार, अडत्या, प्रक्रियाकार आणि व्यापारी यांचे कर्तव्य असेल. वर निश्चित केलेली बाजार फी भरण्यात कसूर करणारा खरेदीदार, अडत्या, प्रक्रियाकार व व्यापारी हा अशा फी व्यतिरिक्त आणखी, विहित करण्यात आलेला दंड भरण्यास दायी असेल.

(४) हा अधिनियम किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा किंवा कोणताही करार यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, बाजार समिती ही खरेदीदार, अडत्या, प्रक्रियाकार किंवा व्यापारी यांच्याकडून बाजार समितीला देय असलेल्या दंडाच्या रकमेसह फीची रक्कम—

(क) यथास्थिति खरेदीदार, अडत्या, प्रक्रियाकार किंवा व्यापारी याने बाजार समितीकडे ठेवलेल्या ठेवीच्या रकमेमधून;

(ख) असा खरेदीदार, अडत्या, प्रक्रियाकार किंवा व्यापारी यांना हमी देणाऱ्या बँकेकडून वसूल करण्यास सक्षम असेल व ती बँक बाजार समितीने मागणी केली असता, याप्रमाणे मागणी करण्यात आलेली रक्कम बाजार समितीला देईल.]

कर्ज काढण्याचा अधिकार.

**३२.** (१) बाजार समितीला, संचालकाच्या पूर्वमंजुरीने ज्या प्रयोजनासाठी तिची स्थापना करण्यात आली असेल ती प्रयोजने पार पाडण्यासाठी, तिच्यामध्ये निहित असलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या व या अधिनियमान्वये तिने बसविण्याजोग्या कोणत्याही फीच्या प्रतिभूतीवर आवश्यक असलेला पैसा उभारता येईल.

(२) बाजारात स्थापन करण्यासाठी लागणाऱ्या जमिनी, इमारती व सामग्री यांवरील खर्च भागविण्यासाठी, बाजार समितीला राज्य शासन निर्धारित करील अशा अटींवर व शर्तींवर राज्य शासनाकडून कर्जे घेता येतील.

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २ (अ) द्वारे "किंवा निर्यात करण्यासाठी" व "किंवा त्याची निर्यात करण्यात आली नाही" हा मजकूर वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) द्वारे पहिल्या परंतुकानंतर समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २ (क) द्वारे "आणखी असे की," या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][३२ क. (१) बाजार समिती या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी याबाबतीत विनिर्दिष्ट करील असा बाजार समितीचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी (यात यापुढे ज्याचा निर्देश "विनिर्दिष्ट अधिकारी किंवा कर्मचारी" असा करण्यात आला आहे) बाजार क्षेत्रामध्ये कोणत्याही कृषि उत्पन्नाचा व्यापार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, लेखे व इतर दस्तऐवज त्याच्या समोर हजर करण्यास आणि अशा कृषि उत्पन्नाचे साठे किंवा अशा व्यक्तीने अशा कृषि उत्पन्नाची केलेली खरेदी, विक्री व पोचवणी यांच्याशी संबंधित कोणतीही माहिती तसेच, अशा व्यक्तीने भरलेली बाजार फी आणि विक्रेत्याला दिलेली रक्कम यांच्याशी संबंधित इतर माहिती सादर करण्यास फर्मावू शकेल.

हजर करण्याचा, आदेश देण्याचा अधिकार व प्रवेश करण्याचा, तपासणी करण्याचा, झडती घेण्याचा व जप्त करण्याचा अधिकार.

(२) कोणत्याही व्यक्तीने, बाजार क्षेत्रामध्ये कोणत्याही कृषि उत्पन्नाचा नेहमीचा व्यापार करताना ठेवलेले सर्व लेखे व नोंदवह्या आणि अशा कृषि उत्पन्नाचा साठा किंवा त्या व्यक्तीच्या ताब्यातील अशा कृषि उत्पन्नाची खरेदी, विक्री व पोचवणी यांच्याशी संबंधित दस्तऐवज आणि अशा व्यक्तीची कार्यालयीन आस्थापना, गोदामे, जहाजे किंवा वाहने, अशा विनिर्दिष्ट अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला तपासणी करण्यासाठी सर्व उचित वेळी खुली असतील.

(३) [२][महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नियुक्त केलेल्या निबंधकास किंवा सहायक निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्यास; आणि बाजार समितीच्या सचिवास, सह सचिवास, किंवा उप सचिवास (यात यापुढे ज्याचा निर्देश "प्राधिकृत अधिकारी" असा करण्यात आला आहे)]—

(क) उक्त बाजार समितीच्या अधिकारितेतील बाजार क्षेत्रामध्ये कोणत्याही कृषि उत्पन्नाचा व्यापार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने,—

(एक) हा अधिनियम, नियम किंवा उप-विधी याअन्वये तिने देय असलेली कोणतीही फी किंवा आकार देण्यास टाळाटाळ करण्याचा प्रयत्न चालवला आहे किंवा अशी टाळाटाळ केलेली आहे; किंवा

(दोन) हा अधिनियम, नियम किंवा उप-विधी यांच्या तरतुदींविरुद्ध कोणतीही कृती केलेली आहे; किंवा

(तीन) कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या व्यापाराच्या संबंधातील कोणतीही लेखा पुस्तके किंवा अन्य दस्तऐवज किंवा जिनसा किंवा नोंदवह्या किंवा वस्तू हजर करण्यास किंवा हजर करण्याची व्यवस्था करण्यास सांगणारी नोटीस बजावण्यात आली असताना तसे करण्यात कसूर केलेली आहे; किंवा

(ख) कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या किंवा उप-विधींच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतेही कृषि उत्पन्न खरेदी केले आहे.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ३ द्वारे, कलम ३२-क ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १२ अन्वये, कलम ३२-क मधील पोट-कलम (३) मध्ये, "राज्य शासन" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि कंसातील "करण्यात आला आहे" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

असे सकारण वाटत असेल तर, त्या प्राधिकृत अधिकाऱ्यास,—

(एक) अशा व्यक्तीने ज्या ठिकाणी अशी कोणतीही लेखापुस्तके, दस्तऐवज, जिनसा, नोंदवह्या किंवा वस्तू ठेवल्या आहेत किंवा ती ठेवते असा सकारण संशय असेल अशा कोणत्याही जागेत, इमारतीत, वखारीत, गोदामात, जहाजात, गाडीत किंवा वाहनात प्रवेश करता येईल व त्यांची झडती घेता येईल.

(दोन) कोणतेही दार, पेटी, लॉकर, तिजोरी, अलमारी किंवा इतर पात्र याच्या कुलुपाच्या चाव्या उपलब्ध नसतील त्याबाबतीत उपखंड (एक) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्याकरिता ते कुलूप फोडता येईल;

(तीन) कोणत्याही जागेतून किंवा वास्तूमधून बाहेर पडलेल्या किंवा तेथे शिरण्याच्या बेतात असलेल्या किंवा तेथे असलेल्या कोणत्याही व्यक्तीने अशी कोणतीही लेखापुस्तके, इतर दस्तऐवज, जिनसा, नोंदवह्या किंवा वस्तू आपल्या शरीरावर लपविलेल्या आहेत असा प्राधिकृत अधिकाऱ्यास सकारण संशय आल्यास त्या व्यक्तीची झडती घेता येईल;

(चार) अशा कोणत्याही झडतीमध्ये सापडलेली अशी कोणतीही लेखापुस्तके, इतर दस्तऐवज, जिनसा, नोंदवह्या किंवा वस्तू जप्त करता येतील;

(पाच) अशा कोणत्याही लेखापुस्तकांवर किंवा अन्य दस्तऐवजांवर, जिनसांवर, नोंदवह्यांवर किंवा वस्तूंवर ओळखण्यासाठी खुणा करता येतील आणि त्यातील उतारे काढून घेता येतील किंवा त्यांच्या प्रती काढून घेता येतील किंवा काढून घेण्याची व्यवस्था करता येईल;

(सहा) जप्त करण्यात आलेल्या अशा कोणत्याही लेखापुस्तकांची, इतर दस्तऐवजांची, जिनसांची, नोंदवह्यांची किंवा वस्तूंची नोंद किंवा यादी तयार करता येईल.

(४) प्राधिकृत अधिकाऱ्याला, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी त्याला साहाय्य करण्याकरिता कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याच्या सेवांची मागणी करता येईल आणि अशा मागणीचे अनुपालन करणे हे प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(५) पोट-कलम (३) अन्वये, अशी कोणतीही लेखापुस्तके, इतर दस्तऐवज, जिनसा, नोंदवह्या किंवा वस्तू किंवा वाहने जप्त करणे व्यवहार्य नसेल त्याबाबतीत, प्राधिकृत अधिकाऱ्याला अशी लेखापुस्तके, इत्यादींच्या मालकावर किंवा त्यांचा प्रत्यक्ष कब्जा जिच्याकडे आहे किंवा त्यांवर जिचे नियंत्रण आहे अशा व्यक्तीवर, तिने अशा अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अशी लेखापुस्तके, इत्यादी हलवू नयेत, स्वतःपासून दूर करू नयेत किंवा त्यासंबंधात अन्यप्रकारे कोणतेही व्यवहार करू नयेत असा आदेश बजावता येईल व अशा आदेशाचे पालन होत आहे याबद्दल खातरजमा करून घेण्यासाठी अशा अधिकाऱ्यास आवश्यक ती उपाययोजना करता येईल.

(६) झडतीच्या वेळी कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली कोणतीही लेखा पुस्तके, इतर दस्तऐवज, जिनसा, नोंदवह्या किंवा वस्तू असल्याचे आढळून आल्यास,—

(एक) झडतीच्या वेळी कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असल्याचे आढळून आलेली अशी लेखापुस्तके, इतर दस्तऐवज, जिनसा, नोंदवह्या किंवा, वस्तू या अशा व्यक्तीच्या मालकीच्या आहेत;

(दोन) अशा लेखापुस्तकांमधील व इतर दस्तऐवजांमधील मजकूर खरा आहे; आणि

(तीन) अशा लेखापुस्तकांमधील व इतर दस्तऐवजांमधील जी स्वाक्षरी व त्यामधील जो इतर प्रत्येक भाग एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या हस्ताक्षरात असल्याचे अभिप्रेत असेल किंवा ज्यावर कोणत्याही विशिष्ट व्यक्तीने सही केलेली असल्याचे किंवा जो तिच्या हस्ताक्षरात असल्याचे गृहित धरण्यास वाजवी कारण असेल ती स्वाक्षरी व तो भाग त्या व्यक्तीच्या हस्ताक्षरात आहे आणि मुद्रांकित करण्यात आलेल्या, निष्पादित करून देण्यात आलेल्या किंवा अनुप्रमाणित केलेल्या दस्तऐवजांच्या बाबतीत, ज्या व्यक्तीने असा दस्तऐवज निष्पादित करून दिलेला असल्याचे किंवा अनुप्रमाणित केलेला असल्याचे अभिप्रेत असेल त्या व्यक्तीनेच तो अशा प्रकारे निष्पादित करून दिलेला आहे किंवा अनुप्रमाणित केलेला आहे, असे गृहित धरता येईल.

(७) पूर्वगामी पोट-कलमांन्वये जिच्या ताब्यातून कोणतीही लेखापुस्तके, इतर दस्तऐवज, जिनसा, नोंदवह्या किंवा वस्तू जप्त करण्यात आल्या असतील अशा व्यक्तीला, प्राधिकृत अधिकाऱ्याच्या किंवा त्याने याबाबतीत अधिकार दिलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या उपस्थितीत, तो प्राधिकृत अधिकारी यासंबंधात नेमून देईल अशा ठिकाणी व अशा वेळी त्या लेखापुस्तकांच्या किंवा इतर दस्तऐवजांच्या किंवा नोंदवह्यांच्या प्रती काढून घेता येतील किंवा त्यामधून उतारे काढून घेत येतील.

(८) प्राधिकृत अधिकारी अशा प्रकारे जप्त करण्यात आलेली लेखापुस्तके, दस्तऐवज, जिनसा, नोंदवह्या किंवा वस्तू त्या जप्त केल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांहून अधिक होईल इतक्या मुदतीकरिता ठेवून घेणार नाही:

परंतु, अशा कालावधीची गणना करताना, कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाद्वारे किंवा व्यादेशाद्वारे या अधिनियमाखाली कोणतीही कार्यवाही ज्या कालावधीत स्थगित करण्यात आली आहे, असा कालावधी वगळण्यात येईल:

परंतु आणखी असे की, अशा प्रकारे जप्त करण्यात आलेल्या कोणत्याही जिनसा किंवा वस्तू नाशवंत स्वरूपाच्या असतील त्याबाबतीत, प्राधिकृत अधिकारी, अशा जिनसा किंवा वस्तू जप्त करण्यात आल्यापासून बारा तासांहून अधिक काळ ठेवून घेणार नाही.

(९) पोट-कलम (८) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) अशा जिनसा किंवा वस्तू यांमध्ये कृषि उत्पन्नांचा समावेश असेल व अशा प्रकारे जप्त करण्यात आलेल्या वाहनांमधून बाजार क्षेत्रामध्ये त्यांची वाहतूक करण्यात आली असेल व अशा कृषि उत्पन्नाच्या संबंधातील बाजार फी किंवा अन्य कोणत्याही देय रकमा भरण्यात आलेल्या नसतील त्याबाबतीत, बाजार फीच्या आणि देखरेखीच्या खर्चाच्या रकमेच्या तीन पटींएवढ्या शास्तीच्या रकमेसह अशी फी व खर्च व अशा जप्तीचा प्रत्यक्ष खर्च यांची रक्कम भरण्यात येईतोपर्यंत असे वाहन व असे कृषि उत्पन्न ठेवून घेता येईल, आणि अशी फी, खर्च, शास्ती आणि (प्रत्यक्ष) खर्च यांची लेखी मागणी केल्यानंतर देखील अशा रकमा भरण्यात न आल्यास

अशा कृषि उत्पन्नाची लिलावाद्वारे विक्री करून अशा रकमा वसूल करता येतील व त्यानंतर कोणतीही रक्कम शिल्लक उरल्यास, ती, ज्या व्यक्तीकडून ती वाहने जप्त करण्यात आली असतील त्या व्यक्तीकडे परत देता येईल.

(ख) जेथे अशा प्रकारे जप्त करण्यात आलेली अशी लेखापुस्तके, दस्तऐवज, जिनसा, नोंदवह्या किंवा वस्तू किंवा वाहने आणि कृषि उत्पन्न या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या किंवा उपविधींच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याच्या अपराधाबद्दल दाखल करण्यात आलेल्या खटल्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असतील त्या बाबतीत अशा अपराधाची न्यायचौकशी करणाऱ्या न्यायालयाने त्या मुक्त करण्याचा आदेश देईपर्यंत त्या ठेवून घेता येतील.

(ग) कृषि उत्पन्नाचा समावेश असलेल्या अशा जिनसा किंवा वस्तू या, जेव्हा नाशवंत स्वरूपाच्या असतील व बाजार फीच्या आणि देखरेखीच्या खर्चाच्या रकमेच्या तीन पटींएवढ्या शास्तीच्या रकमेसह अशी फी व खर्च आणि अशा जप्तीचा प्रत्यक्ष खर्च यांची रक्कम भरण्यात आलेली नसेल त्याबाबतीत, अशा जिनसा किंवा वस्तू जिच्याकडून जप्त करण्यात आल्या तिच्याकडे त्या परत करण्याऐवजी त्यांच्या संबंधातील बाजार फी, आकार, शास्ती आणि खर्च अशा कृषि उत्पन्नाची लिलावाद्वारे विक्री करून वसूल करण्यात येतील व त्यामधून कोणतीही रक्कम शिल्लक उरल्यास ती अशा व्यक्तीला परत करण्यात येईल.

(१०) प्राधिकृत अधिकारी, ती इमारत, जागा किंवा वाहन यामध्ये असणाऱ्या कोणत्याही व्यक्तींचा आदर व प्रतिष्ठा ठेवून या कलमान्वये झडती घेण्याचे किंवा जप्त करण्याचे काम करील व त्या इमारतीत, जागेत किंवा वाहनात सहज प्रवेश उपलब्ध नसेल तेथे प्रवेश मिळविताना किमान बळाचा वापर करील व जप्त करण्यात आलेल्या कोणत्याही लेखापुस्तकांच्या, दस्तऐवजांच्या, जिनसांच्या, नोंदवह्यांच्या किंवा वस्तूंच्या किंवा वाहनांच्या सुरक्षित अभिरक्षेची खात्री करून घेईल.

(११) पूर्वगामी तरतुदींस बाधा न आणता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील झडती व जप्ती यांच्या संबंधातील तरतुदी या कलमाखालील झडती व जप्ती यांना शक्य असेल तेथवर लागू होतील.] १९७४ चा २.

**वसूल न होण्याजोगा तोटा, तूट किंवा फी इत्यादी निर्लेखित करण्याचा अधिकार.**

**३२-ख.** बाजार समितीस तिला येणे असलेली कोणतीही फी किंवा अन्य रक्कम निर्लेखित करता येईल किंवा ज्यावेळी कोणत्याही व्यक्तीच्या कोणत्याही लबाडीमुळे किंवा निष्काळजीपणामुळे किंवा कोणत्याही अन्य कारणामुळे समितीच्या पैशामध्ये, भांडारामध्ये किंवा संपत्तीमध्ये कोणताही तोटा आढळून येईल आणि बाजार समितीच्या मते फी, रक्कम, संपत्ती किंवा पैसा वसूल होण्याजोगा नसल्याचे आढळून येईल किंवा त्याबाबतीत सूट द्यायला हवी असेल तर, बाजार समिती अशी फी, रक्कम, मालमत्ता किंवा पैसा यथास्थिति, गमावलेला किंवा वसूल न होण्याजोगा म्हणून निर्लेखित करण्याबाबत किंवा त्यात सूट देण्याबाबत आदेश देऊ शकेल:

परंतु, ज्याबाबतीत येणे असलेली रक्कम किंवा भांडाराचे अथवा अन्य संपत्तीचे मूल्य पाचशे रुपयांपेक्षा अधिक होत असेल त्याबाबतीत बाजार समिती, पूर्वी म्हटल्याप्रमाणे रक्कम निर्लेखित करण्याचा किंवा सूट देण्याचा कोणताही आदेश काढण्यापूर्वी संचालकाची मंजुरी मिळवील.

**३२-ग.** कोणत्याही कृषि उत्पन्नाचा,—मग तो नाशवंत असो किंवा नसो,—व्यवहार करीत असलेला कोणताही लायसनधारक किंवा लायसनधारकांचा वर्ग जर संपावर गेला किंवा कोणत्याही संपामध्ये सहभागी झाला आणि बाजाराचे कार्य विस्कळीत झाले तर बाजार समिती बाजार चालू ठेवण्यासाठी तिच्या मते आवश्यक असेल अशी व्यवस्था करण्यास सक्षम असेल. अशा व्यवस्थांमध्ये, स्वत: बाजार समितीने संचालकाच्या मान्यतेने कृषि उत्पन्नाची खरेदी, त्याचा साठा किंवा त्याची वाहतूक करणे यांचा समावेश असेल. संपामध्ये पर्यायी व्यवस्था करण्याचे अधिकार.

**३२-घ.** शासनाने निश्चित केलेल्या आधार किंमतीपेक्षा कमी किंमतीला बाजार क्षेत्रामध्ये कृषि उत्पन्न खरेदी करण्यास प्रतिबंध करण्यासाठी विहित करण्यात येईल अशी व्यवस्था करणे आणि उपाययोजना करणे हे बाजार समितीचे कर्तव्य असेल.] आधार किंमतीच्या खाली कृषि उत्पन्नाच्या खरेदीस प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याचा अधिकार.

[1][३२ ङ. कृषि उत्पन्नाच्या खरेदी आणि विक्रीच्या प्रयोजनार्थ किंवा कृषि उत्पन्नाच्या खरेदीशी आणि विक्रीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असेल अशा इतर प्रयोजनार्थ, वाटप केलेले किंवा भाड्याने दिलेले कोणतेही दुकान/गाळा/छपरी/भूखंड किंवा इतर कोणतीही परिवास्तू यांचा वापर, ज्या प्रयोजनासाठी तिचे वाटप केले होते. त्या प्रयोजनाकरिता करण्यात येत नाही किंवा तिचा गैरवापर आहे अशी बाजार समितीची खात्री पटल्यास, किंवा बाजार समितीच्या जागेवर अतिक्रमण केले असेल त्या बाबतीत, बाजार समिती संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याचे वाजवी संधी दिल्यानंतर ते दुकान, गाळा, छपरी, भूखंड किंवा इतर कोणतीही परिवास्तू यातून निष्कासित करण्याकरिता किंवा अतिक्रमण दूर करण्याकरिता आदेश देईल आणि संबंधित स्थानिक प्राधिकरण बाजार समितीला असे निष्कासन करण्याकरिता आणि अतिक्रमण दूर करण्याकरिता, शक्य ती सर्व मदत पुरवील.] दुकान, गाळा, छपरी, भूखंड किंवा इतर कोणतीही परिवास्तू यांमधून निष्कासित करण्याचा आणि अतिक्रमण दूर करण्याचा बाजार समितीचा अधिकार.

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १३ अन्वये कलम ३२-घ नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले.

संविदा निष्पादित करणे.

**३३.** (१) बाजार समितीने निष्पादित केलेली प्रत्येक संविदा लेखी असेल आणि त्यावर बाजार समितीच्या वतीने तिच्या सभापतीने किंवा सभापतीच्या अनुपस्थितीत उपसभापतीने आणि समितीच्या अन्य दोन सदस्यांनी सही केलेली असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निष्पादित केलेल्या संविदेहून अन्य कोणतीही संविधा बाजार समितीवर बंधनकारक असणार नाही.

बाजार समितीने वजने व मापे या संबंधीचा नियम वगैरेचा अन्वय लावण्या-बाबतच्या विवक्षित विवादांचा निर्णय करणे.

**३४.** (१) मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम, १९५८ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी त्या अधिनियमान्वये नेमलेला निरीक्षक व कोणतीही हितसंबंधित व्यक्ती यांच्यादरम्यान त्या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या अर्थाबाबत किंवा अन्वयाबाबत किंवा कोणत्याही बाजार क्षेत्रातील कोणतेही वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे उपकरण यांची पडताळणी करण्याच्या, पुन्हा पडताळणी करण्याच्या, ते नीट करण्याच्या किंवा मुद्रांकित करण्याच्या पद्धतीसंबंधी कोणतेही विवाद उत्पन्न झाल्यास, असा विवाद हितसंबंधित व्यक्तीच्या विनंतीवरून किंवा निरीक्षकास आपण होऊन, बाजार समितीकडे निर्देशित करता येईल; आणि पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने, बाजार समितीचा त्यावरील निर्णय, अंतिम असेल व तो, मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम, १९५८ याच्या कलम २० अन्वये देण्यात आला आहे, असे मानले जाईल. १९५८ चा मुंबई ६९.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या निर्णयाविरुद्ध करावयाचे अपील विहित अवधीत राज्य शासनाकडे किंवा राज्य शासन याबाबत नेमील अशा अधिकाऱ्याकडे करता येईल. राज्य शासनाचा किंवा अशा अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल. १९५८ चा मुंबई ६९.

## [१][प्रकरण चार-क

### पर्यवेक्षणाचा परिव्यय

कोणत्याही बाजारातील किंवा बाजार क्षेत्रातील कृषि उत्पन्नाच्या खरेदीवरील पर्यवेक्षण व पर्यवेक्षणाचा परिव्यय खरेदीदारांनी देणे.

**३४-क.** (१) राज्य शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, असा निदेश देता येईल की, कोणत्याही बाजारातील किंवा बाजारक्षेत्रांतील ज्या कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन या अधिनियमान्वये होत असेल अशा कृषि उत्पन्नाची खरेदी राज्य शासनास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, ते नेमील अशा कर्मचारीवर्गाच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात यावे; आणि या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीनतेने, अशा पर्यवेक्षणाचा परिव्यय, अशा बाजारात किंवा बाजार क्षेत्रात असे उत्पन्न खरेदी करणाऱ्या व्यक्तीने राज्य शासनास द्यावे.

(२) खरेदीदाराने द्यावयाचा परिव्यय, वेळोवेळी, राज्य शासन निर्धारित करील आणि बाजारात किंवा बाजार क्षेत्रात (राज्य शासनास योग्य वाटेल अशा रीतीने) अधिसूचित करील हा परिव्यय अशा रीतीने ठरविण्यात येईल की, परिव्ययाची रक्कम, खरेदीदाराने खरेदी केलेल्या कृषि उत्पन्नाच्या खरेदी किंमतीच्या दर शंभर रुपयांस पाच पैसे यापेक्षा अधिक असता कामा नये.

---

१ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ अन्वये प्रकरण चार-क समाविष्ट करण्यात आले.

३४-ख. (१) बाजार समिती, तिने कलम ३१ अन्वये बसविलेली फी ज्या रीतीने गोळा करण्यात येते त्याच रीतीने पर्यवेक्षणाचा परिव्यय गोळा करील. पर्यवेक्षण:

(२) बाजार समितीने गोळा केलेला पर्यवेक्षणाचा परिव्यय, तो ज्या महिन्यात गोळा केला असेल तो महिना संपल्यापासून पंधरा दिवसांच्या कालावधीत, विहित रीतीने, राज्य शासनास देण्यात येईल.

३४-ग. बाजार समितीने पर्यवेक्षणाच्या परिव्ययासंबंधात देय असलेली कोणतीही रक्कम किंवा तिचा कोणताही भाग गोळा करण्यात किंवा राज्य शासनास देण्यात कसूर केली तर, संचालकास अशा निदेश देता येईल की, यथास्थिति, उक्त रक्कम किंवा तिचा भाग, हा अशा रकमेच्या किंवा तिच्या भागाच्या एक टक्क्याइतक्या शास्तीदाखलच्या रकमेसह बाजार समितीकडून, कलम ५७ अन्वये, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात यावा.]

बाजार समितीने पर्यवेक्षणाचा परिव्यय गोळा करण्यात किंवा देण्यात कसूर करणे.

## प्रकरण पाच

## बाजार समित्यांचे अधिकारी व कर्मचारी

३५. [1][(१) बाजार समितीला, बाजाराच्या व्यवस्थापनासाठी, पिकांविषयीची आकडेवारी व बाजार-वृत्त या संबंधीची माहिती गोळा करण्यासाठी, ती यथावत ठेवण्यासाठी, तिचा प्रसार करण्यासाठी व ती पुरवण्यासाठी आणि या अधिनियमान्वये आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, सचिव व आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी नोकरीस ठेवता येतील, आणि अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना असे वेतन आणि भत्ते, निवृत्तिवेतन किंवा उपदान देता येईल. आणि अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या लाभासाठी स्थापन करण्यात येईल त्या भविष्य निर्वाह निधीमध्ये किंवा निवृत्तिवेतन निधीमध्ये अंशदान देता येईल:

कर्मचारी वर्ग नोकरीला ठेवण्याचा बाजार समितीचा अधिकार.

परंतु, सचिवाच्या अधिकारपदाहून अन्य सर्व अधिकारपदे, याबाबत संचालक काढतील, अशा सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीनतेने केवळ संचालकांच्या पूर्वमान्यतेने निर्माण करता येतील.

[2][परंतु आणखी असे की, राज्य पणन मंडळ, अर्हता आणि अनुभव यानुसार, बाजार समित्यांवर सचिव म्हणून नियुक्त करण्यात यावयाच्या व्यक्तींची यादी तयार करील आणि नाव नोंदणी केलेल्या व्यक्तींच्या यादीतून एका व्यक्तीची सचिव म्हणून नियुक्ती करणे हे बाजार समित्यांवर बंधनकारक असेल.]

(२) बाजार समितीचा सचिव हा, मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि बाजार समितीच्या अभिलेखांचा आणि मालमत्तेचा परिरक्षक असेल आणि या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाखाली त्यास प्रदान करण्यात आलेले असतील अशा अधिकारांचा वापर करील, आणि त्याच्यावर लादलेली असतील अशी कर्तव्ये पार पाडील.]

---

[1] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९ अन्वये कलम ३५ मधील पोट-कलमे (१) व (२) ऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम १० अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(३) या कलमान्वये बाजार समितीला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर, राज्य शासन याबाबत जे कोणतेही नियम करील त्या नियमांच्या अधीनतेने करता येईल.

## प्रकरण सहा

## बाजार निधि

बाजार निधी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक.

**३६.** (१) बाजार समितीला या अधिनियमाअन्वये [१][* * *] मिळालेला सर्व पैसा, [२][(कलम १४-क, अन्वये निवडणूक निधीमध्ये जमा केलेल्या अशा फीच्या रकमांखेरीज करून)] शास्ती म्हणून वसूल झालेला सर्व पैसा, (फौजदारी प्रकरणांतील दंड म्हणून मिळालेल्या रकमांखेरीज करून) समितीने उभारलेली सर्व कर्जे, राज्य शासनाने समितीला दिलेली सर्व अनुदाने, कर्जे किंवा अंशदान ही बाजार निधी या नावाने संबोधण्यात येणाऱ्या निधीचा भाग होतील.

(२) बाजार निधीच्या खाती जमा असलेली रक्कम विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवली किंवा गुंतवली जाईल.

ज्या प्रयोजनासाठी बाजार निधी खर्च करता येईल ती प्रयोजने.

**३७.** [३][(१)] बाजार निधीतून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी खर्च करता येईल:—

(क) बाजारासाठी ठिकाण किंवा ठिकाणे संपादन करणे;

(ख) बाजार सुस्थितीत ठेवणे, त्याचा विकास करणे व त्यात सुधारणा करणे;

(ग) अशा बाजारासाठी आणि त्याचा उपयोग करणाऱ्या व्यक्तींचे आरोग्य, सोय व सुरक्षितता यासाठी आवश्यक असतील अशा इमारती बांधणे व त्यांची दुरुस्ती करणे;

(घ) प्रमाण वजने व मापे यांची तरतूद करणे व ती सुस्थितीत ठेवणे;

(ङ) बाजार समितीने नोकरीला ठेवलेले अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, निवृत्तिवेतन, रजा, भत्ते, उपदाने, अपघातामुळे झालेल्या दुखापतीबद्दल नुकसानभरपाई, अनुकंपा भत्ते तसेच रजा भत्ते, निवृत्तिवेतने किंवा भविष्यनिर्वाह निधी यापोटी अंशदान देणे;

[४][* * * * * * * *]

(छ) बाजार समितीने एखादे कर्ज उभारले असल्यास त्यावरील व्याज देणे आणि अशा कर्जाच्या संबंधात कर्ज निवारण निधीची तरतूद करणे;

---

१ सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ९ अन्वये "फीच्या रूपात" हा मजकूर वगळण्यात आला.

२ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ८ अन्वये कलम ३७ याला पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला आणि पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

४ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ७ (१) अन्वये खंड (च) हा वगळण्यात आला.

(ज) कलम ४ अन्वये अधिसूचित केलेल्या कृषि उत्पन्नाच्या बाबतीतील पिकांची आकडेवारी व पणन याबाबत माहिती गोळा करणे व ती प्रसृत करणे;

(झ) कृषि सुधारणेसाठी आणि सुव्यवस्थित पणनासाठी प्रचार करणे;

(ञ) बाजार समितीच्या व उपसमित्यांच्या सदस्यांना आणि कलम १० अन्वये कोणत्याही मंडळाची रचना करण्यात आली असेल तर त्याच्या सदस्यांना भत्ते व प्रवास खर्च देणे;

[१][(ञ-१) कलम २१-क अन्वये, सभापतीस व उपसभापतीस मानधन देणे;

(ञ-२) बाजार क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या लाभार्थ, कोणतेही शैक्षणिक किंवा कल्याण कार्य चालविणाऱ्या कोणत्याही परिसंस्थेस किंवा संस्थेस अनुदान किंवा देणगी देणे; अशा अनुदानाची किंवा देणगीची रक्कम ही, असे अनुदान किंवा देणगी देण्यात आल्याच्या वर्षाच्या लगतपूर्ववर्ती वर्षाच्या महसुलातून खर्च वजा केल्यानंतर, उरणाऱ्या निव्वळ रकमेच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक होता कामा नये या शर्तीस अधीन असेल;]

(ट) कलम ५७ अन्वये रचना करण्यात आलेल्या कोणत्याही न्यायाधिकरणाचा खर्च;

[२][(ठ) बाजार समितीच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यावर केलेला खर्च देणे;

(ड) पोट-कलम (२) अन्वये अधिसूचित करण्यात येईल असे अंशदान राज्य पणन मंडळाला देणे;

(ढ) कृषिविषयक पणनाच्या विकासासाठी असलेल्या कोणत्याही परियोजनेला कोणतेही अंशदान देणे;

(ण) बाजार क्षेत्रातील शेतकऱ्यांना प्रतवारी सेवा आणि बाजारविषयक माहिती कळविणे यासारख्या सुविधा पुरविणे;

(त) या अधिनियमाखालील निवडणुकींवरील खर्च देणे;

(थ) कृषि उत्पन्नाच्या पणनसंबंधातील संशोधन, विस्तार आणि प्रशिक्षण यासाठी खर्च करणे;

(द) राज्य शासन आणि केंद्र सरकार व अन्य एजन्सी यांच्याशी युती करून, कृषि उत्पन्नाच्या अटकावणीद्वारे विक्रीस प्रतिबंध करणे;

(ध) कृषि उत्पन्नाच्या सहकारी पणनास चालना देणे;

(न) लहान व सीमांतिक शेतकऱ्यांच्या लाभासाठी, वखारीकरिता वित्तव्यवस्था करण्यास चालना देणे;

---

१ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ७ (२) अन्वये खंड (ञ-१) व खंड (ञ-२) हे समाविष्ट करण्यात आले.

२ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २० अन्वये कलम ३७ मधील पोट-कलम (१) मध्ये खंड (ठ) व (ड) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

(प) कलम ५७ अन्वये स्थापन केलेल्या कोणत्याही न्याधिकरणाच्या संबंधातील खर्च करणे;

[१][(प-१) कृषी उत्पन्नाच्या, विक्रीच्या अटकावणीस प्रतिबंध करण्यासाठी त्याचप्रमाणे, बाजार क्षेत्रात शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमतीच्याखाली कृषि उत्पन्नाची खरेदी करण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा बाजार कार्याधिकाऱ्यांच्या संपाच्या काळात कृषि उत्पन्नाची खरेदी आणि विक्री करण्यासाठी किंवा अन्यथा बाजार क्षेत्रात गेल्या तीन वर्षामध्ये मिळालेल्या सरासरी अतिरिक्त रकमेच्या पन्नास टक्के एवढ्या मर्यादेपर्यंत खर्च करणे;

(प-२) किरकोळ खरेदी-विक्रीसाठी तात्पुरती दुकाने आणि किरकोळ विक्री केंद्रे उघडण्यासाठी खर्च करणे;

(प-३) कृषि उत्पन्नाच्या निर्यातीसाठी मूलभूत सुविधांच्या निर्मितीकरिता आणि कृषि उत्पादनातील सुधारित तंत्रज्ञानाच्या विस्तारांचे काम पार पाडण्याकरिता खंड (प-१) मध्ये नमूद केलेल्या मर्यादेत खर्च करणे;

(प-४) प्रतवारी, स्वच्छता, आवेष्टन, संस्करण, साठवण, वखार साठवण (शीतगृह साठवणीसह) यासाठी आणि शेतापासून बाजार क्षेत्रापर्यंत आणि बाजार क्षेत्रापासून रेल्वे स्थानक, सागरी बंदर किंवा विमानतळ यापर्यंत वाहतूक करण्यासाठी बाजार क्षेत्रामध्ये सुविधा निर्माण करण्याकरिता खर्च करणे;]

(फ) राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने कोणत्याही इतर प्रयोजनाकरिता खर्च करणे.]

[२][(२)] प्रत्येक बाजार समिती आधीचे बाजार वर्ष संपल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत राज्य कृषि उत्पन्न पणन मंडळास बाजार निधीमधून, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा परंतु आधीच्या बाजार वर्षातील बाजार समितीच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यांहून अधिक नसेल इतक्या दराने आणि अशा रीतीने वार्षिक अंशदान देईल, आणि बाजार समितीची किंवा बाजार समितीच्या वर्गाची किंवा वर्गांची आर्थिक बाजू लक्षात घेऊन, वेगवेगळ्या बाजार समित्यांसाठी किंवा बाजार समित्यांच्या वर्गासाठी किंवा वर्गांसाठी वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील.]

अर्थसंकल्प वगैरे तयार करण्याची रीत.

**३८.** [३][(१)] ज्यारीतीने बाजार निधीतून कोणतीही रक्कम देण्यात येईल, तिचे लेखे ठेवण्यात येतील व त्यांची लेखापरीक्षा किंवा फेरलेखापरीक्षा (त्या बाबतीत लेखापरीक्षकाने वापर करावयाचे अधिकार धरून) करण्यात येईल, जमा व खर्च यांचे वार्षिक, सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज (अशा अर्थसंकल्पात फेरबदल करण्याची, त्याचे विलोपन करण्याची, विखंडन करण्याची तरतूद धरून) तयार करण्यात येतील आणि तिचा वार्षिक प्रशासन अहवाल तयार करण्यात येईल ती रीत, त्याबाबत केलेल्या नियमान्वये विहित करण्यात येईल.

---

१ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १४ अन्वये खंड (प) नंतर, हे खंड समाविष्ट करण्यात आले.

२ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ८ अन्वये पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले;

३ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २१ अन्वये कलम ३८ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व असा फेरक्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

(२) प्रत्येक बाजार समिती, प्रत्येक वर्षी विहित तारखेपूर्वी, राज्य पणन मंडळाकडे मंजुरीसाठी अर्थसंकल्पात सादर करील. राज्य पणन मंडळ, तो मिळाल्यापासून दोन महिन्यांच्या आत, यथास्थिति, फेरबदल करून किंवा फेरबदल न करता, अर्थसंकल्प मंजूर करील. जर तो मिळाल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्याबद्दल मंडळाने अर्थसंकल्पात मान्यता दिल्याचे किंवा अन्यथा काहीही कळविले नाही तर, अर्थसंकल्प कोणताही फेरबदल न होता मंजूर झाल्याचे मानले जाईल.

(३) बाजार समितीला, एखाद्या बाबीवर खर्च करण्यासाठी मंजूर अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद, नसेल तर तो खर्च करता येणार नाही. मात्र इतर अर्थसंकल्पीय शीर्षाखालील बचतींच्या पुनर्विनियोजनाद्वारे तो भागविणे शक्य असेल तर ती बाब वेगळी पुनर्विनियोजनासाठी राज्य पणन मंडळाकडून मंजुरी मिळवता येईल:

परंतु, एका प्रधान अर्थसंकल्प शीर्षाखालील एखाद्या गौण अर्थसंकल्प शीर्षामधून इतर गौण अर्थसंकल्पीय शीर्षाकडे पुनर्विनियोजन करण्यासाठी अशी मंजुरी आवश्यक असणार नाही.

(४) बाजार समितीला, ज्या वर्षासाठी कोणताही अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला असेल त्या वर्षभरात कोणत्याही वेळी सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्प जणू काही तो मूळ अर्थसंकल्प असल्याप्रमाणे त्याच पद्धतीप्रमाणे संमत व मंजूर करवून घेता येईल.]

अधिकाऱ्यांनी किंवा अधिकाऱ्यां-विरुद्ध व्यक्तिगत नात्याने दाखल केलेल्या किंवा केलेल्या विवक्षित कार्यवाह्यां-करिता निधीचा वापर करता येणार नाही.

[१][३८-क. (१) बाजार समितीच्या कोणत्याही सदस्याने किंवा सभापतीने किंवा उपसभापतीने किंवा त्याच्याविरुद्ध व्यक्तिगत नात्याने दाखल केलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा खर्च भागविण्याच्या प्रयोजनाकरिता, बाजार समितीच्या निधीमधून खर्च करता येणार नाही. असा कोणताही खर्च करता येणे शक्य आहे किंवा नाही असा प्रश्न उद्‌भवला तर, असा प्रश्न संचालकाकडे निर्देशित करण्यात येईल आणि संचालक त्याचा निर्णय करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(२) जर कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (१) चे उल्लंघन करून खर्च केला असेल तर, संचालक, त्या व्यक्तीस एका महिन्याच्या आत बाजार समितीकडे त्या रकमेची परतफेड करण्याबाबत निदेश देईल आणि वरील निदेशानुसार अशा व्यक्तीने रकमेची परतफेड करण्यात कसूर केल्यास अशी रक्कम, संचालकाने प्रमाणपत्र दिल्यावर जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये ज्या व्यक्तीविरुद्ध संचालकाने कार्यवाही केली असेल अशी व्यक्ती, तिच्या अधिकारपदाच्या उरलेल्या कालावधीकरिता बाजार समितीचा सदस्य म्हणून चालू राहण्यास निरर्ह होईल आणि त्याचप्रमाणे पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम त्या व्यक्तीने ज्या महिन्यात दिलेली नसेल तो एक महिन्याचा कालावधी समाप्त झाल्यानंतर तात्काळ घेतली जाणारी बाजार समितीची कोणतीही पुढील निवडणूक तसेच पोट-निवडणुकही लढविण्यास अशी व्यक्ती निरर्ह असेल.]

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २२ अन्वये कलम ३८ नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण सात

### व्यापारी कसर देण्यास मनाई

व्यापारी कसर देण्यास किंवा वसूल करण्यास मनाई.

**३९.** कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या संबंधातील कोणत्याही संव्यवहारात, कोणत्याही बाजारात किंवा बाजार क्षेत्रात कोणतीही व्यापारी कसर देता कामा नये किंवा वसूल करता कामा नये.

[1][**स्पष्टीकरण** :—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, व्यापारी कसर म्हणजे प्रत, वजन, दर्जा, पात्र, नमुना यामध्ये झालेल्या कोणत्याही बदलामुळे किंवा अवमिश्रणामुळे कृषि उत्पन्नाच्या किंमतीत किंवा दरात रोख किंवा वस्तुच्या स्वरूपात केलेली कोणतीही वजात.]

## [2][प्रकरण सात-क]

### राज्य कृषि पणन मंडळ

राज्य कृषि पणन मंडळाची स्थापना.

**३९-क.** (१) राज्य शासनास, बाजार समित्यांच्या कार्याचे समन्वयन करण्यासाठी आणि या अधिनियमान्वये प्रदान करण्यात येतील किंवा सोपविण्यात येतील अशा अन्य अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि अशी कार्ये पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून "महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न पणन मंडळ" [3][* * *] या नावाचे एक राज्य कृषि उत्पन्न पणन मंडळ स्थापन करता येईल.

(२) राज्य पणन मंडळ हा उपरोक्त नावाचा एक निगम निकाय असेल आणि त्याची अखंड अधिकार—परंपरा असेल, त्याची एक सामान्य मुद्रा असेल, आपल्या निगमाच्या नावाने त्यास व त्यावर दावा लावता येईल; आणि ते स्थावर व जंगम अशा दोन्ही मालमत्तेसंबंधी संविदा करण्यास, ती संपादन करण्यास आणि धारण करण्यास आणि ज्या प्रयोजनांसाठी त्याची स्थापना झाली असेल त्या प्रयोजनासाठी आवश्यक अशा इतर सर्व गोष्टी करण्यास सक्षम असेल.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य पणन मंडळ हे सर्व प्रयोजनांसाठी, स्थानिक प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल.

---

१ वरील अधिनियमाच्या कलम २३ अन्वये कलम ३९ च्या मूळ स्पष्टीकरणाऐवजी हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

२ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ९ अन्वये प्रकरण ७-क समाविष्ट करण्यात आले.

३ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनयम क्रमांक २७, कलम २४ अन्वये कलम ३९-क मध्ये पोट-कलम (१) मधील "(ज्याचा या प्रकरणात यापुढे 'राज्य पणन मंडळ' असा उल्लेख करण्यात आला आहे)" हा मजकूर वगळण्यात आला.

**३९-ख.** राज्य पणन मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल:— राज्य पणन मंडळाची रचना.

(एक) [१][प्रभारी पणन मंत्री].. पदसिद्ध सभापती;

(दोन) [२][प्रभारी पणन राज्यमंत्री].. पदसिद्ध उपसभापती;

[३][ * * * ]

(तीन) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.. पदसिद्ध सदस्य;

(चार) [४][कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे].. पदसिद्ध सदस्य;

(पाच) राष्ट्रीय कृषि व ग्रामविकास बँकेचा (नाबार्ड), राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक प्रतिनिधी.. पदसिद्ध सदस्य;

(सहा) भारत सरकारचा कृषि उत्पन्न पणन सल्लागार किंवा त्याचा प्रतिनिधी.. पदसिद्ध सदस्य;

(सात) [५][महसुली विभागांतून प्रत्येकी एक याप्रमाणे त्या त्या महसुली विभागातील बाजार समित्यांच्या सभापतींमधून [६][राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे] सहा सदस्य].. सदस्य;

(आठ) सभापती, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी महासंघ मर्यादित, पुणे.. सदस्य;

(नऊ) संचालक, कृषि उत्पन्न पणन, महाराष्ट्र राज्य पुणे.. सदस्य व व्यवस्थापन संचालक.

**स्पष्टीकरण.**—प्रकरण ७-अ च्या प्रयोजनार्थ, "सदस्य" म्हणजे, राज्य पणन मंडळाचा सदस्य.

**३९-ग.** (१) राज्य पणन मंडळाच्या अधीक्षणाच्या अधीनतेने राज्य पणन मंडळाचा व्यवस्थापन संचालक हा, त्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करील. राज्य पणन मंडळाचे अधिकारी व कर्मचारी.

(२) या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे सक्षमतेने पार पाडण्याकरिता, राज्य पणन मंडळ, व्यवस्थापन संचालकाच्या अधीक्षणाखाली व नियंत्रणाखाली त्यास आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी व कर्मचारी नेमील.

---

१ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ च्या कलम ३ (१) अन्वये "सहकार मंत्री" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) अन्वये "सहकार राज्यमंत्री" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ११ (क) अन्वये खंड (दोन-क) वगळण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम १५ (ख) अन्वये "कृषि संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम १५ (ग) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ११ (ख) अन्वये "निवडून द्यावयाचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**सदस्य हा निवडणुका लढविण्यास किंवा राज्य विधान-मंडळाचा किंवा स्थानिक प्राधिकरणांचा सदस्य होण्यास निरर्ह नसणे.**

**३९-घ.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३९-ख चा खंड (सात) किंवा (आठ) मध्ये विनिर्दिष्ट केलेला राज्य पणन मंडळाचा सदस्य हा, तो राज्य पणन मंडळाचा सभासद आहे; याच केवळ कारणावरून राज्य विधानमंडळाचा सदस्य किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास आणि राहण्यास निरर्ह ठरणार नाही.

**सदस्यांचा पदावधी.**

**३९-ङ** (१) कलम ३९-ख च्या खंड (सात) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सदस्यांचा पदावधी हा, असा सदस्य म्हणून त्याचे नामनिर्देशन ज्या तारखेला झाले असेल त्या तारखेपासून सर्वसाधारणपणे तीन वर्षांइतका असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य पणन मंडळाच्या सदस्याचा पदावधी हा, राज्य शासनाने त्याचे सदस्यत्व अगोदर समाप्त केले नसेल किंवा त्याने आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला नसेल तर, ज्या अधिकारपदाच्या सामर्थ्याने असा सदस्य कलम ३९-ख अन्वये राज्य पणन मंडळाचे सदस्यत्व धारण करीत असेल ते कोणतेही अधिकारपद, किंवा शासन, बाजार समिती, राष्ट्रीय कृषि व ग्रामविकास बँक (नाबार्ड) किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी महासंघ यांच्या अधीन असलेले पद त्याने धारण करण्याचे बंद होताच लगेच समाप्त होईल:

परंतु, भारत सरकारच्या कृषि पणन सल्लागाराचे किंवा त्याच्या प्रतिनिधींचे सदस्यत्व, त्या शासनाच्या सहमतीशिवाय या कलमान्वये समाप्त करता येणार नाही.

**नैमित्तिक रिकाम्या जागा.**

**३९-च.** राजीनामा, मृत्यू किंवा अन्यथा राज्य पणन मंडळाच्या सदस्याचे अधिकारपद रिकामे होईल त्याबाबतीत, पूर्वीच्या सदस्यास ज्या प्रवर्गातून नामनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्याच प्रवर्गातील दुसरी एखादी व्यक्ती राज्य शासनाने नामनिर्दिष्ट करून ते रिकामे अधिकारपद भरण्यात येईल आणि याप्रमाणे नामनिर्दिष्ट करण्यात आलेला सदस्य हा, असे रिकामे अधिकारपद निर्माण झाले नसते तर ज्या सदस्याच्या जागी त्यास नामनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्या सदस्याने जोवर ते अधिकार पद धारण केले असते तोवरच धारण करील.

**३९-छ.** (१) राज्य पणन मंडळात कोणतीही जागा रिकामी असताना त्या जागेवर चालू असणारे इतर सदस्य हे जणू काही जागा रिकामी झालेली नसावी त्याप्रमाणे काम करतील. जागा रिकामी असेल तेव्हा सदस्यांनी काम करणे, राज्य पणन मंडळ इत्यादींच्या कृती वगैरे उपचार बाह्यतेमुळे विधिअग्राह्य न ठरणे.

(२) राज्य पणन मंडळातील सदस्याची कोणतीही जागा रिकामी असली किंवा मंडळाच्या रचनेत कोणताही दोष असला तरीही राज्य पणन मंडळास कृती करण्याचा अधिकार असेल; आणि असे करण्याचा हक्क नसलेली एखादी व्यक्ती सभेत उपस्थित राहिली होती व तिने मतदान केले होते किंवा तिने कामात अन्यथा भाग घेतला होता असे नंतर उघडकीस आले तरीही ती कार्यवाही विधिग्राह्य असेल.

**३९-ज.** राज्य पणन मंडळाच्या सदस्यास, व्यवस्थापन संचालकास उद्देशून स्वतःच्या सहीनिशी लिहिलेल्या पत्राद्वारे आपल्या अधिकापदाचा राजीनामा देता येईल; आणि ज्या तारखेला राजीनामा स्वीकारण्यात आला असेल त्या तारखेपासून तो अंमलात येईल. सदस्यांचा राजीनामा.

**३९-झ.** कलम ३९-क चा खंड (पाच) ते (आठ) अन्वये राज्य पणन मंडळाचे सदस्यत्व धारण करणाऱ्या सदस्यांना राज्य पणन मंडळाच्या सभांना उपस्थित राहण्याबद्दल आणि राज्य पणन मंडळाने त्यांच्याकडे सोपविलेले कोणतेही इतर काम करण्याबद्दल, राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशी फी व भत्ते हे, कृषि उत्पन्न पणन विकास निधीतून देण्यात येतील. सदस्यांचे भत्ते.

**३९-ञ.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, मंडळ पुढील कार्य पार पाडील आणि अशी कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक अथवा इष्ट असतील अशा गोष्टी करण्याचा अधिकार मंडळास असेल:— राज्य पणन मंडळाची कार्ये व अधिकार.

(एक) बाजार व बाजारक्षेत्रे यांच्या विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम धरून अशा बाजार समित्यांच्या कामामध्ये समन्वय राखणे;

(दोन) कृषि उत्पन्न बाजाराच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम हाती घेणे;

(तीन) कृषि उत्पन्न पणन विकास निधीची व्यवस्था ठेवणे व त्याचे प्रशासन करणे;

(चार) बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्याने बाजार समित्यांना सरसकटपणे सल्ला देणे किंवा एखाद्या विशिष्ट बाजार समितीला सल्ला देणे;

(पाच) बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाज तयार करण्याच्या तिच्या कामावर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला मार्गदर्शन करणे;

(सहा) कृषि उत्पन्नाच्या पणनाशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबत प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे;

(सात) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी मंडळ निश्चित करील अशा अटींवर व शर्तींवर बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज देणे;

(आठ) कृषिविषयक पणनाच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे;

[1][(आठ-क) बाजार समितीच्या सदस्यांना तसेच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.]

(नऊ) कृषि उत्पन्नाच्या पणनाच्या संबंधात सर्वसाधारण हिताच्या असतील अशा इतर गोष्टी करणे;

(दहा) या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेष रीत्या सोपविण्यात आले असेल असे इतर कोणतेही कार्य पार पाडणे;

(अकरा) राज्य शासन त्याच्याकडे सोपवील अशी तत्सम स्वरूपाची इतर कार्ये पार पाडणे.

विनियम. **३९-ट.** (१) राज्य पणन मंडळास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने आपले कामकाज पार पाडता यावे म्हणून, या अधिनियमाशी व तद्‌अन्वये करण्यात आलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील.

(२) विशेषकरून, आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाधा येऊ न देता, अशा विनियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल:—

(क) राज्य पणन मंडळाच्या सभा बोलाविणे व त्या घेणे, अशा सभा घेण्यात येतील ती वेळ व तारीख, अशा सभांमध्ये चालविण्यात येणारे कामकाज व त्या सभेच्या गणपूर्तीसाठी आवश्यक असलेल्या व्यक्तींची संख्या; १९३४

(ख) राज्य पणन मंडळाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये, वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती;

(ग) राज्य पणन मंडळाच्या मालमत्तांचे व्यवस्थापन;

(घ) लेखे ठेवणे आणि ताळेबंद व इतर वित्तविषयक विवरणे तयार करणे;

(ङ) राज्य पणन मंडळाची या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी विनियमात ज्या गोष्टींसाठी तरतूद करावयाची आहे किंवा तरतूद करणे आवश्यक आहे अशी इतर कोणतीही गोष्ट.

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १६ अन्वये, खंड (आठ) नंतर हा खंड दाखल करण्यात आला.

**३९-ठ.** (१) "कृषि उत्पन्न पणन विकास निधी" या नावाचा एक निधी याद्वारे स्थापन करण्यात येत असून राज्य पणन मंडळाकडून तो चालविण्यात येईल व त्याचे प्रशासन करण्यात येईल. कृषि उत्पन्न पणन विकास निधीची स्थापना व त्याचे प्रशासन.

(२) पुढील रकमा कृषि उत्पन्न पणन विकास निधींचा (ज्यास यात यानंतर "विकास निधी" असे संबोधण्यात आले आहे) भाग होतील किंवा त्यांचा त्यात भरणा करण्यात येईल:—

(क) कलम ३७ च्या पोट-कलम (२) अन्वये बाजार समित्यांकडून राज्य पणन मंडळाला मिळालेली सर्व अंशदाने;

(ख) राज्य शासन राज्य पणन मंडळाला देईल किंवा मंजूर करील अशी सर्व अंशदाने, अनुदाने अथवा कर्जे;

(ग) राज्य शासनाच्या परवानगीने, राज्य पणन मंडळाने कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा;

(घ) राज्य पणन मंडळाने बसविलेली फी किंवा आकार यापासून मिळालेली प्राप्ती किंवा कोणतीही स्थानिक प्राधिकरणे, बाजार समित्या अथवा इतर परिसंस्था व व्यक्ती यांच्याकडून मिळालेल्या देणग्या अथवा अनुदाने धरून त्याला इतर कोणत्याही मार्गाने मिळालेली सर्व प्राप्ती किंवा पैसा;

(ङ) राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा इतर रकमा.

(३) राज्य पणन मंडळाकडून केला जाणारा सर्व खर्च वेळोवेळी विकास निधीतून भागविण्यात येईल आणि कोणताही अधिशेष, असल्यास, तो राज्य पणन मंडळ सरकारी रोख्यांमध्ये गुंतवील
१९३४ चा अथवा भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ मध्ये व्याख्या केलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेत
२. अथवा या प्रयोजनासाठी राज्य शासन मान्यता देईल अशा एखाद्या सहकारी बँकेत ठेव म्हणून ठेवील.

**३९-ड.** विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने राज्य पणन मंडळास स्वत:साठी पुरेशा साधन संपत्तीची तरतूद करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, हमी दिलेले किंवा हमी न दिलेले रोखे, ऋणपत्रे, पुंजरोखे, खुल्या बाजारात विक्रीला काढून किंवा अन्य प्रकारे कर्ज घेता येईल, अथवा कोणत्याही अनुसूचित बँकांकडून अथवा राज्य शासन वेळोवेळी मान्यता देईल अशा अन्य बँकांकडून किंवा वित्तीय परिसंस्थांकडून कर्ज घेता येईल. राज्य पणन मंडळाचा कर्ज घेण्याचा अधिकार.

**३९-ढ.** (१) राज्य पणन मंडळास, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी विकास निधीचा वापर करता येईल. विकास निधीचा वापर.

(२) पूर्वगामी तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता राज्य पणन मंडळास, पुढील प्रयोजनांसाठी विकास निधीचा वापर करता येईल:—

(एक) राज्य पणन मंडळाच्या प्रशासकीय खर्चाची रक्कम देणे;

(दोन) आपल्या सदस्यांना प्रवास भत्ता व अन्य भत्ते देणे;

(तीन) कायदेविषयक बाबी संबंधात केलेल्या खर्चाची रक्कम देणे;

(चार) बाजार तळासाठी जमीन संपादन करण्यासाठी किंवा बाजार क्षेत्रात पायाभूत सोयींची तरतूद करण्यासाठी बाजार समित्यांना कर्जाच्या किंवा अनुदानाच्या स्वरूपात, वित्तीय सहाय्य देणे;

(पाच) कृषि उत्पन्नाच्या पणनाच्या संबंधातील बाबींचा प्रचार व प्रसिद्धी करणे;

(सहा) बाजारात समिती आणि राज्य पणन मंडळ यांच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे;

(सात) कृषि उत्पन्नाच्या पणनासंबंधी शिक्षण देणे;

(आठ) कृषि उत्पन्नाच्या पणनाच्या विकासाच्या बाबतीत कार्यसत्रे, चर्चासत्रे किंवा प्रदर्शने यांचे आयोजन करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे;

(नऊ) राज्यातील पणनाच्या विनियमनासंबंधात सर्वसाधारण सुधारणा करणे;

(दहा) बाजार समित्यांना तांत्रिक व कायदेविषयक सहाय्य पुरवणे;

(अकरा) राज्य पणन मंडळाकडे या अधिनियमाअन्वये सोपविण्यात आली असतील अशी किंवा राज्य शासन निदेश देईल त्याप्रमाणे कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही अन्य प्रयोजने.

लेखापरीक्षा. **३९-ण.** (१) निबंधक, सहकारी संस्था हा, वेळोवेळी निश्चित करील अशी लेखापरीक्षा फी देऊन राज्य शासनाच्या सहकार विभागाच्या लेखापरीक्षकांकरवी राज्य पणन मंडळाच्या लेख्यांची दरवर्षी लेखापरीक्षा करून घेण्यात येईल.

(२) राज्य पणन मंडळास, त्यास योग्य वाटेल अशा प्रकारे, त्याच्या लेख्यांच्या अंतर्गत लेखापरीक्षेची व्यवस्था करता येईल. १९०.

## प्रकरण आठ

## नियंत्रण

निरीक्षण, चौकशी, विवरणे सादर करणे इत्यादी. **४०.** संचालकास किंवा त्याने सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास—

(क) बाजार समितीच्या लेख्यांचे व कार्यालयांचे निरीक्षण करता येईल किंवा करण्याची तजवीज करता येईल;

(ख) बाजार समितीच्या कारभाराची चौकशी करता येईल;

(ग) जे कोणतेही विवरणपत्र, विवरण, लेखे किंवा अहवाल पुरविण्याविषयी अशा समितीला सांगणे त्याला योग्य वाटेल ते मागविता येईल;

(घ) पुढील गोष्टी विचारात घेण्यास समितीला सांगता येईल:—

(एक) अशा समितीकडून किंवा तिच्या वतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा करण्यात येत असेल ती करण्याबाबत काही आक्षेप आहे असे त्याला वाटत असेल असा कोणताही आक्षेप, किंवा

(दोन) तो पुरवू शकेल अशा ज्या कोणत्याही माहितीमुळे अशा समितीने एखादी गोष्ट करणे आवश्यक ठरेल असे त्याला वाटत असेल अशी कोणतीही माहिती;

आणि अशी गोष्ट करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल आपली कारणे नमूद करून त्यास एक लेखी उत्तर वाजवी अवधीत देण्याविषयी समितीला सांगणे;

(ङ) उत्तराचा विचार चालू असताना, जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा करण्यात येत असेल अशी कोणतीही गोष्ट केली जाऊ नये आणि जी कोणतीही गोष्ट, तो निदेश देईल अशा अवधीच्या आत केली पाहिजे परंतु ती केली जात नसेल अशी कोणतीही गोष्ट करण्यात यावी, असा निदेश देता येईल.

**संचालकाला, प्राधिकृत अधिकाऱ्यांना आणि राज्य शासनाला माहिती पुरविणे हे अधिकाऱ्यांचे व सदस्यांचे कर्तव्य असणे.**

**४१.** (१) कलम ४० अन्वये बाजार समितीच्या कारभाराचे अन्वेषण करण्यात येईल किंवा कलम ४३ अन्वये अशा समितीच्या कामकाजाची तपासणी करण्यात येईल तेव्हा अशा समितीच्या सर्व अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी व सदस्यांनी समितीच्या कारभारासंबंधी किंवा कामकाजासंबंधी त्यांच्या कब्जात असलेली व संचालक, प्राधिकृत अधिकारी यांना किंवा यथास्थिति, राज्य शासनाला जरूर असेल अशी माहिती पुरविली पाहिजे.

(२) कलम ४० अन्वये बाजार समितीच्या कारभाराचे अन्वेषण करणाऱ्या अधिकाऱ्याला किंवा कलम ४३ अन्वये अशा समितीच्या कामकाजाची तपासणी करणाऱ्या राज्य शासनाला, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाच्या बाबतीत ज्या उपायांची व रीतीची तरतूद केली आहे त्याच उपायांनी व शक्य असेल तेथवर त्याच रीतीने बाजार समितीच्या अधिकाऱ्यांना व सदस्यांना समन्स काढून हजर राहणास फर्मावण्याचा व तसेच त्यांना पुरावा देण्यास व दस्तऐवज दाखल करण्यास फर्मावण्याचा अधिकार असेल.

१९०८ चा ५.

**समिती इत्यादीने संमत केलेला ठराव किंवा काढलेला आदेश यांच्या अंमलबजावणीस मनाई करण्याचे संचालकाचे अधिकार.**

[१][**४१-क.** (१) संचालकास, समितीने किंवा तिच्या सभापतीने किंवा उपसभापतीने किंवा बाजार समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने संमत केलेला ठराव किंवा काढलेला आदेश हा लोकहिताला बाधक आहे किंवा त्यामुळे कोणत्याही बाजार क्षेत्रातील प्रमुख बाजारतळाचे किंवा दुय्यम बाजारतळाचे कामकाज कार्यक्षमरीत्या चालण्यास अडथळा होण्याची शक्यता आहे किंवा असा ठराव किंवा आदेश या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा उपविधी यांच्या तरतुदीच्या विरुद्ध आहे असे त्याचे मत झाल्यास, स्वत:च्या प्रस्तावाद्वारे किंवा त्याच्याकडे प्रतिवेदन किंवा तक्रार आल्यावरून संमत केलेल्या ठरावाच्या किंवा काढण्यात आलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस मनाई करता येईल.

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २५ अन्वये कलम ४१ नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे एखाद्या ठरावाच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीस किंवा पुढील अंमलबजावणीस मनाई करण्यात आली असेल व ती अंमलात राहिली असेल त्याबाबतीत, संचालकाने तशी मागणी केल्यास, असा ठराव किंवा आदेश कधीही करण्यात आला नसता तर त्याबाबतीत बाजार समितीस जी कोणतीही कार्यवाही करण्याचा हक्क प्राप्त झाला असता आणि सभापती किंवा उपसभापती किंवा तिचे कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी यांना असा ठराव किंवा आदेश याखालील कोणतीही गोष्ट करण्यास किंवा करण्याचे चालू ठेवण्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने जी आवश्यक असेल अशी कोणतीही कार्यवाही करणे हे समितीचे कर्तव्य असेल.]

लेखापुस्तके आणि इतर दस्तऐवज यांचे अभिग्रहण करणे.

**४२.** जेव्हा एखाद्या बाजार समितीच्या नोंदवह्यात व अभिलेखात ढवळाढवळ केली जाण्याचा किंवा ते नष्ट केले जाण्याचा संभव आहे अथवा एखाद्या बाजार समितीच्या पैशाचा किंवा मालमत्तेचा अपहार केला जाण्याचा किंवा दुरुपयोग केला जाण्याचा संभव आहे असे मानण्यास सयुक्तिक कारण आहे असे संचालकांना वाटेल तेव्हा, संचालकाला, आदेश काढून त्याने रीतसर लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला अशा बाजार समितीच्या अशा नोंदवह्या व अभिलेख, निधी व मालमत्ता यांचे अभिग्रहण करून ती कब्जात घेण्याविषयी निदेश देता येईल आणि बाजार समितीचा जो अधिकारी किंवा जे अधिकारी अशा नोंदवह्यांच्या अभिलेख्यांच्या, निधीच्या व मालमत्तेच्या अभिरक्षणास जबाबदार असतील त्यांनी त्या गोष्टी याप्रमाणे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला सुपूर्द केल्या पाहिजेत.

बाजार समिती इत्यादीचे कामकाज अभिलेख मागविण्याचा व त्यावर आदेश देण्याचा राज्य शासनाचा किंवा संचालकाचा अधिकार.

[१][**४३.** या अधिनियमाअन्वये कोणत्याही बाजार समितीने किंवा संचालकाने किंवा यथास्थिति, अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाच्या किंवा आदेशाच्या कायदेशीरपणाविषयी किंवा औचित्याविषयी स्वत:ची खात्री करून घेण्याकरिता राज्य शासनाला अशा बाजार समितीच्या किंवा संचालकाच्या कामकाज अभिलेख, तसेच संचालकास, कोणत्याही बाजार समितीच्या किंवा बाजार समितीच्या अधिकारांचा वापर करण्याकरिता अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे कामकाज अभिलेख कोणत्याही वेळी मागविता येतील व त्यांची तपासणी करता येईल. याप्रमाणे मागविलेल्या अभिलेखातील कोणत्याही निर्णयात किंवा आदेशात किंवा अभिलेखात फेरबदल करण्यात यावा, त्यांचे विलोपन करण्यात यावे किंवा ते फिरविण्यात यावेत असे कोणत्याही प्रकरणी राज्य शासनास किंवा संचालकास दिसून येईल तर याबाबतीत राज्य शासनास किंवा संचालकास त्यावर त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.]

---

१ वरील अधिनियमाच्या कलम २६ अन्वये, कलम ४३ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

**४४.** (१) कोणत्याही बाजार क्षेत्रात कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या पणनाचे सक्षम विनियमन होण्याची निश्चिती करण्यासाठी [१][आणि बाजार समितीच्या आर्थिक कार्यक्षमतेची सुनिश्चिती होण्यासाठी] त्यामधील दोन किंवा अधिक बाजार समित्यांचे एकत्रीकरण करणे किंवा त्यामधील कोणत्याही बाजार समितीची दोन किंवा अधिक बाजार समित्यांमध्ये विभागणी करणे आवश्यक आहे अशी राज्य शासनाची खात्री झाली असेल त्याबाबतीत, राज्य शासनाला यथास्थिति, बाजार समित्यांशी किंवा समितीशी [१][ आणि [२][राज्य पणन मंडळाशी] ] विचारविनिमय केल्यानंतर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या संबंधात, अशा बाजारक्षेत्रासाठी अशा बाजार समित्यांचे एका बाजार समितीत एकत्रीकरण करण्यासाठी किंवा दोन किंवा अधिक बाजार समित्यांमध्ये त्यांची विभागणी करण्यासाठी व अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रचना, मालमत्ता, हक्क, हितसंबंध व प्राधिकार आणि दायित्वे, कर्तव्ये व आबंधणे याच्या संबंधात तरतूद करता येईल. (यात संविदा, भत्ता, कर्मचारी, कामकाज आणि यथास्थिति असे एकत्रीकरण किंवा अशी विभागणी करण्यासाठी आवश्यक असतील अशा आनुषंगिक, परिणामरूप व अनुपूरक बाबी यांच्या संबंधातील तरतुदींचा समावेश होतो).

बाजार समित्यांचे एकत्रीकरण किंवा विभागणी.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही बाजार क्षेत्रात एकापेक्षा अधिक बाजार समित्या स्थापन केलेल्या असतील तेव्हा या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला अशा बाजार समित्यांचे ज्यात संयुक्तपणे हितसंबंध असतील किंवा जे समान स्वरूपाचे असतील असे, या अधिनियमाखाली बाजार समितीने वापरावयाचे अधिकार, पार पाडावयाची कर्तव्ये व करावयाची कामे त्यांच्यापैकी कोणत्या बाजार समितीने वापरले पाहिजेत, पार पाडली पाहिजेत, केली पाहिजेत यासंबंधी, सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देता येतील.

(३) जेव्हा पोट-कलम (२) अन्वये कोणतेही निदेश देण्यात आले असतील तेव्हा अशा निदेशांस अनुसरून, एखाद्या बाजार समितीने केलेला परिव्यय, त्याबाबत एकमत होईल अशा प्रमाणात किंवा असे एकमत न झाल्यास, राज्य शासन किंवा त्याबाबतीत राज्य शासन निदेश देईल असा अधिकारी ठरवील अशा प्रमाणात, इतर संबंधित बाजार समित्या विभागून घेतील. राज्य शासनाचा किंवा अशा अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.

---

१ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १७ (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २७ अन्वये "बाजार समित्यांचा महासंघ असल्यास" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "मान्यता दिलेला संघ असणारा" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**बाजार समिती इत्यादींचे अधिक्रमण.**

**४५.** (१) या अधिनियमाअन्वये किंवा तद्नुसार बाजार समितीकडे किंवा तिच्या कोणत्याही सदस्यांकडे सोपविलेली कर्तव्ये पार पाडण्यास अशी बाजार समिती किंवा तिचा कोणताही सदस्य सक्षम नाही किंवा ती बजावण्यात दुराग्रहाने कसूर करीत आहे किंवा ती बाजार समिती किंवा तो सदस्य, आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहे किंवा बाजार समितीच्या लेखापरीक्षेबाबत किंवा तिच्या कार्यालयाच्या निरीक्षणाबाबत राज्य शासनाने किंवा याबाबतीत राज्य शासनाने रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही अनुदेशांकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करीत आहे, असे राज्य शासनाचे मत झाले तर, राज्य शासनाला, यथास्थिति, त्या समितीला किंवा सदस्याला स्पष्टीकरण करण्याची संधी दिल्यानंतर, शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याबाबतची कारणे देऊन, यथास्थिति, अशा बाजार समितीचे अधिक्रमण करता येईल किंवा त्या सदस्याला काढून टाकता येईल; आणि सदस्याला काढून टाकण्यात आले असेल त्या बाबतीत राज्य शासन त्याच्या जागी त्याच्या उरलेल्या पदावधीसाठी, अशा समितीचा सदस्य म्हणून कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करील:

[1][परंतु कलम ४४ मध्ये निर्देश केलेल्या [2][राज्य पणन मंडळाशी] आगाऊ विचारविनिमय केल्याशिवाय, कोणत्याही बाजार समितीचे अधिक्रमण करण्यात येणार नाही.]

(२) पोट-कलम (१) अन्वये बाजार समितीचे अधिक्रमण करण्याविषयी अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर पुढील परिणाम घडून येतील—

(क) बाजार समितीच्या सर्व सदस्यांनी अशा प्रसिद्धीच्या तारखेपासून आपली अधिकारपदे रिकामी केली आहेत असे मानले जाईल;

(ख) बाजार समितीमध्ये विहित असलेली सर्व मालमत्ता तिच्या सर्व दायित्वांच्या अधीनतेने राज्य शासनामध्ये विहित होईल;

(ग) राज्य शासनाला, आदेशान्वये एकतर प्रकरण तीनच्या तरतुदींनुसार, नवीन बाजार समितीची रचना करता येईल किंवा बाजार समितीची कार्ये पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी व्यवस्था करता येईल.

[3][परंतु बाजार समितीची कार्ये पार पाडण्यासाठी खंड (क) अन्वये प्रशासक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, कार्यभार ग्रहण केल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, बाजार समितीच्या निवडणुका त्या कालावधीत घेतल्या जातील याची सुनिश्चिती करील. उक्त कालावधीत निवडणुका घेण्यात अशा व्यक्तीने कसूर केल्यास, संचालकास, निवडणुका न घेण्याबद्दलच्या उचित समर्थनाविषयी त्याची खात्री पटल्यास, अशा निवडणुका घेणे त्या प्रशासकास शक्य व्हावे यासाठी, सहा महिन्यांहून अधिक नसेल इतकी मुदत वाढवून देता येईल.]

---

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ९ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २८ अन्वये "बाजार समिती महासंघाशी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १८ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(३) राज्य शासनाने पोट-कलम (२), खंड (ग) अन्वये आदेश दिला तर, राज्य शासन, हस्तांतरणाच्या तारखेला बाजार समितीची जी मालमत्ता व दायित्वे असतील ती यथास्थिति, पूर्वी सांगितल्याप्रमाणे रचना करण्यात आलेल्या नवीन बाजार समितीकडे किंवा त्या बाजार समितीची कार्ये पार पाडण्यासाठी ज्या कोणत्याही एक किंवा अधिक व्यक्ती नेमण्यात आल्या असतील त्यांच्याकडे हस्तांतरित करील.

(४) राज्य शासनाने असा आदेश दिला नाही तर राज्य शासन बाजार समितीच्या सर्व दायित्वांची फेड करून तिची जी मत्ता उरेल ती सर्व मत्ता ज्या स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेमध्ये ती बाजार समिती असेल त्या स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करील आणि अशी स्थानिक प्राधिकरणे एकाहून अधिक असतील तर, राज्य शासन ठरवील असा त्या मालमत्तेचा भागांश अशा प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करील.

(५) पोट-कलम (४) अन्वये ज्या स्थानिक प्राधिकरणाकडे बाजार समितीच्या मत्तेचे हस्तांतरण करण्यात आले असेल ते स्थानिक प्राधिकरण आपल्या अधिकारितेमधील क्षेत्रातील जी उद्दिष्टे त्या क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या लाभार्थ आहेत असे राज्य शासनाला वाटेल त्या उद्दिष्टांसाठी, अशा मत्तेचा उपयोग करील.

## प्रकरण नऊ

### शास्ती

*कलम ६ च्या उल्लंघनाबद्दल शास्ती.*

४६. जी कोणतीही व्यक्ती कलम ६, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून बाजार क्षेत्रातील कोणत्याही जागेचा कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी उपयोग करील किंवा विधिग्राह्य लायसनशिवाय व्यापारी, अडत्या, दलाल, प्रक्रियाकार, तोलारी, मातारी, सर्वेक्षक, वखारवाला या नात्याने किंवा इतर कोणत्याही नात्याने काम करील तिला, अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतकी कैदेची शिक्षा किंवा [1][पाच हजार रुपयांपर्यंत] असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील; आणि उल्लंघन चालू राहील त्या बाबतीत, पहिल्या अपराधसिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल, कलम ६, पोट-कलम (१), खंड (क) च्या उल्लंघनाच्या बाबतीत, शंभर रुपयांपर्यंत आणि इतर कोणत्याही बाबतीत पन्नास रुपयांपर्यंत आणखी दंडाची शिक्षा होईल.

*कलम २६ (२) अन्वये दिलेल्या निदेशांचे अनुपालन न केल्याबद्दल शास्ती.*

४७. ज्यास कलम २६, पोट-कलम (२) अन्वये निदेश देण्यात आला असेल अशा मावळत्या सभापतीने किंवा उपसभापतीने आपल्या आटोक्याबाहेरील कारणांखेरीज अशा निदेशाचे अनुपालन केले नाही तर, अपराधसिद्धीनंतर त्याला, एक महिन्यापर्यंत वाढविता येईल इतक्या साध्या कैदेची किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

---

१ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १९ अन्वये, "पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

व्यापारी कसर दिल्याबद्दल किंवा घेतल्याबद्दल शास्ती.

**४८.** जी कोणतीही व्यक्ती कलम ३९ च्या तरतुदींचे उल्लंघन करून, कोणतीही व्यापारी कसर देईल किंवा वसूल करील तिला अपराधसिद्धीनंतर तीन महिन्यांपर्यंत कैदेची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कलम ४० अन्वये दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

**४९.** जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही अधिकाऱ्यास एखाद्या समितीच्या लेख्यांचे निरीक्षण करताना किंवा तिच्या कार्यालयाची चौकशी करताना अडथळा करील किंवा कलम ४० चे खंड (क), (ग), (घ) किंवा (ङ) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशांचे पालन करण्यात कसूर करील तिला अपराधसिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी असा अपराध चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल दोनशे रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

कलम ४० किंवा ४३ यांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**५०.** बाजार समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कर्मचाऱ्यास किंवा सदस्यास कलम ४० किंवा कलम ४३ अन्वये बाजार समितीच्या कारभारासंबंधी किंवा कामकाजासंबंधी माहिती पुरविण्यास सांगितले असता जर असा अधिकारी, कर्मचारी किंवा सदस्य—

(क) कोणतीही माहिती पुरविण्यात बुद्धिपुरस्सर हयगय करील किंवा ती पुरविण्याचे बुद्धिपुरस्सर नाकारील, अथवा

(ख) बुद्धिपुरस्सर खोटी माहिती पुरवील,

तर त्याला अपराधसिद्धीनंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल.

कलम ४२ चे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**५१.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ४२ च्या तरतुदींचे उल्लंघन करून, बाजार समितीच्या कोणत्याही नोंदवह्या, अभिलेख, निधी व मालमत्ता यांचे अभिग्रहण करताना किंवा कब्जात घेताना कोणत्याही व्यक्तीला अडथळा करील किंवा त्या अशा व्यक्तीकडे सुपूर्द करण्यात कसूर करील, तर तिला अपराधसिद्धीनंतर, दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल.

अपराधाबद्दल शिक्षा देण्यासंबंधी सर्वसाधारण तरतुदी.

**५२.** जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील आणि जर त्या अपराधाबद्दल कोणत्याही इतर शास्तीची तरतूद करण्यात आली नसेल तर, तिला [1][पाच हजार रुपयांपर्यंत] असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल.

---

१ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २० अन्वये, "दोनशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1]५२-क. (१) ज्या कोणत्याही व्यक्तीने हा अधिनियम (कलम ६ व ७ च्या उल्लंघनाहून अन्य) किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा उपविधी यांविरुद्ध कोणताही अपराध केलेला असेल किंवा केला असल्याचा वाजवी संशय असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून बाजार समितीला असा अपराध आपसात मिटवून पुढीलप्रमाणे रक्कम स्वीकारता येईल:— अपराध आपसात मिटविणे.

(क) हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा उपविधी यांअन्वये वसुलीयोग्य असेल अशी कोणतीही फी किंवा इतर रक्कम देण्यात कसूर करणे किंवा अशी रक्कम देण्याचे टाळणे यांचा जर अपराधात अंतर्भाव असेल तर याप्रमाणे वसुलीयोग्य असलेली फी व इतर रक्कम यांच्या जोडीला, अशा फीपेक्षा किंवा इतर रकमेपेक्षा कमी नसेल आणि अशा फीच्या किंवा इतर रकमेच्या पाचपटीहून अधिक नसेल एवढी रक्कम, आणि अशी रक्कम किमान दोनशे पन्नास रुपये एवढी असेल; आणि

(ख) इतर कोणत्याही बाबतीत एक हजार रुपयांहून अधिक होणार नाही एवढी रक्कम.

[2][(१-क) संचालकास, ज्या व्यक्तीने कलम ६ चे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे वा उपविधींचे उल्लंघन करून अपराध केला आहे किंवा असा अपराध केला असल्याचा वाजवी संशय आहे. अशा कोणत्याही व्यक्तीकडून असा उपराध आपसात मिटवण्यासाठी दहा हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढ्या रकमेचा स्वीकार करता येईल. अशी स्वीकारलेली रक्कम शासकीय कोषागारात जमा केली जाईल. जेव्हा अपराध आपसात मिटवण्यात आला असेल, त्या बाबतीत, अपराधी, जर अभिरक्षेत असेल तर, त्याला मुक्त करण्यात येईल आणि आपसात मिटवलेल्या अपराधाच्या संबंधात त्याच्याविरुद्ध पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.]

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणताही अपराध आपसात मिटविण्यात आल्यावर, अशा अपराधाशी संबंधित व्यक्तीविरुद्ध कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही किंवा ती चालू ठेवण्यात येणार नाही, व त्या अपराधाच्या संबंधात तिच्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात कोणतीही कार्यवाही आधीच दाखल करण्यात आली असेल त्या बाबतीत, अपराध आपसात मिटविल्यामुळे तिला दोषमुक्त ठरविण्यात येईल.

**५२-ख.** (१) या अधिनियमात अन्यत्र अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते सोडून एरव्ही या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींअन्वये घेण्यात आलेला निर्णय किंवा संमत झालेला आदेश यांमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला— अपील.

(क) बाजार समितीने, तिच्या सभापतीने, उपसभापतीने, सचिवाने किंवा संचालकाच्या अधिकाराचा वापर करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने असा निर्णय घेतलेला असेल किंवा असा आदेश दिलेला असेल त्या बाबतीत, संचालकाकडे;

---

1. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २९ अन्वये कलम ५२ नंतर ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

2. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २१ अन्वये कलम ५२-क पोट-कलम (१), हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

(ख) संचालकाने असा निर्णय घेतला असेल किंवा असा आदेश काढला असेल त्य बाबतीत राज्य शासनाकडे;

अपील दाखल करता येईल.

(२) ज्याविरुद्ध अपील करावयाचे असेल अशा निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत पोट-कलम (१) खाली अपील करता येईल—

(३) यथास्थिति, संचालकाने किंवा राज्य शासनाने अपीलावर दिलेला निर्णय हा अंतिम असेल]

## प्रकरण दहा

## संकीर्ण

नेधीच्या प्रोजना- बद्दल दस्यांना बाबदार धरणे.

५३. बाजार समितीचा प्रत्येक सदस्य, कोणत्याही निधीच्या बुद्धिपुरस्सर दुरुपयोजनाच्या ज्या प्रकरणी त्याचे अंग असेल किंवा सदस्य या नात्याने असलेल्या आपल्या कर्तव्याची गंभीर उपेक्षा केल्यामुळे जे दुरुपयोजन घडून आले असेल किंवा घडून येणे सुलभ झाले असेल अशा दुरुपयोजनाबद्दल व्यक्तिश: उत्तरदायी असेल आणि याप्रमाणे दुरुपयोजन केलेला पैसा वसूल करण्याबद्दल, जणू काही असा पैसा ही राज्य शासनाची मालमत्ता असावी त्याप्रमाणे अशा सदस्यावर दावा लावता येईल:

परंतु, बाजार समितीने केलेली कोणतीही संविदा किंवा करार किंवा बाजार समितीने किंवा तिच्यावतीने केलेला कोणताही खर्च हे जर सद्भावपूर्वक आणि आपली कर्तव्ये रीतसर पार पाडता यावीत म्हणून केले असतील तर त्या संविदेच्या किंवा कराराच्या संबंधात किंवा त्या खर्चाबद्दल कोणताही सदस्य व्यक्तिश: उत्तरदायी असणार नाही; आणि अशा कोणत्याही संविदेच्या किंवा करारांच्या संबंधात झालेला सर्व परिव्यय, तसेच असा सर्व खर्च बाजार निधीतून देता येईल व त्यावर आकारला जाईल.

बाजार मितीचा भापती, भापती, सदस्य, चिव व नारी हे कसेवक असणे.

५४. बाजार समितीचा सभापती, उपसभापती, सदस्य, सचिव आणि इतर अधिकारी व कर्मचारी हे भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असे मानले जाईल. १८६० चा १४.

ट्शीच्या अभावी दावा वण्यास रोध.

५५. (१) या अधिनियमाअन्वये कोणत्याही बाजार समितीचा सदस्य, अधिकारी किंवा कर्मचारी या नात्याने सद्भावपूर्वक केलेल्या किंवा केल्याचे दिसून येणाऱ्या कोणत्याही कृत्याबद्दल अशा बाजार समितीविरुद्ध किंवा तिचा कोणताही सदस्य, अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध किंवा अशी बाजार समिती, सदस्य अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या निदेशाअनुसार काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध लेखी नोटीस, तीत दाव्याचे कारण, संकल्पित वादीचे नाव व राहण्याचे ठिकाण व

मागत असलेला अनुतोष या गोष्टी नमूद करून बाजार समितीच्या बाबतीत तिच्या कार्यालयात सुपूर्द केल्यानंतर किंवा ठेवल्यानंतर आणि उपयुक्त अशा कोणत्याही सदस्याच्या, अधिकाऱ्यांच्या, कर्मचाऱ्यांच्या किंवा व्यक्तीच्या बाबतीत त्याच्याकडे सुपूर्द केल्यानंतर किंवा त्याच्या कार्यालयात किंवा नेहमीच्या राहण्याच्या जागी ठेवल्यानंतर दोन महिन्यांचा अवधी संपेपर्यंत कोणताही दावा दाखल करता येणार नाही आणि वादपत्रात अशी नोटीस, अशा रीतीने देण्यात, स्वाधीन करण्यात किंवा ठेवण्यात आली आहे या अर्थाचे निवेदन करावे लागेल.

(२) असा प्रत्येक दावा, वादाचे अभिकथित कारण ज्या तारखेस घडले असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत दाखल करण्यात आला नाही तर फेटाळण्यात येईल.

१८७७ चा १. (३) या कलमातील कोणतीही गोष्ट विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम, १८७७, कलम ५४ अन्वये दाखल केलेल्या कोणत्याही दाव्याला लागू होते असे मानले जाणार नाही.

**अपराधांची न्याय चौकशी.**

**५६.** (१) या अधिनियमाखालील किंवा तद्अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाखालील किंवा उपविधीखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा, इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी किंवा याबाबत विशेष रीत्या अधिकार प्रदान केलेला द्वितीय वर्ग दंडाधिकारी यांच्या न्यायालयाहून अन्य कोणत्याही न्यायालयात करता येणार नाही;

(२) संचालक किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी किंवा दिलेल्या बाजार समितीने त्याबाबतीत रीतसर प्राधिकृत केलेला सचिव किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याखेरीज इतर कोणालाही या अधिनियमान्वये कोणताही खटला दाखल करता येणार नाही.

(३) या अधिनियमाखाली किंवा तद्अनुसार केलेल्या नियमाखाली किंवा आदेशाखाली एखादा अभिकथित अपराध घडल्याचे पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेल्या अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला ज्या तारखेला कळले असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत अशा अपराधाबद्दल तक्रार करण्यात आली असल्याखेरीज कोणत्याही न्यायालयात अशा कोणत्याही अपराधाची दखल घेतली जाणार नाही.

**शासनाला किंवा बाजार समितीला येणे असलेल्या रकमांची वसुली.**

**५७.** (१) बाजार समितीकडून राज्य शासनाला येणे असलेली प्रत्येक रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, वसूल केली जाईल.

(२) या अधिनियमाच्या किंवा तद्न्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या तरतुदीअन्वये, बाजार समितीला, कोणताही आकार, परिव्यये, खर्च, फी, भाडे याबद्दल किंवा कोणत्याही इतर बाबीच्या संबंधात येणे असलेली कोणतीही रक्कम [1][किंवा त्या बाजार क्षेत्रात शेतकऱ्याने विकलेल्या

---

[1] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ११ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

त्याही कृषि उत्पन्नाबद्दल] त्याला येणे असलेली जी कोणतीही रक्कम, त्याला [२][या अधिनियमाद्वारे त्याखाली तरतूद केल्याप्रमाणे] देण्यात आलेली नसेल अशी रक्कम], ज्या व्यक्तीकडून अशी येणे असेल त्या व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी ज्या रीतीने वसूल केली जाते रीतीने वसूल केली जाईल.

पोट-कलम (२) च्या अर्थानुसार बाजार समितीस [३][किंवा कोणत्याही शेतकऱ्यास] एखादी येणे आहे किंवा काय यासंबंधी कोणताही प्रश्न उद्‌भवला तर तो प्रश्न त्या प्रयोजनासाठी केलेल्या न्यायाधिकरणाकडे निर्देशित करण्यात येईल आणि असे न्यायाधिकरण, त्या योग्य अशी चौकशी केल्यानंतर आणि ज्या व्यक्तीकडून अशी अभिकथित रक्कम येणे असेल त्या ना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या प्रश्नाचा निर्णय करील; आणि न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयामध्ये किंवा इतर प्राधिकरणापुढे हरकत घेता येणार नाही.

राज्य शासनास, त्या बाजार क्षेत्रावर ज्याची अधिकारिता असेल अशी जिल्हाधिकाऱ्यांनिशी त्या एका किंवा अधिक न्यायाधिकरणांची रचना करता येईल:

राज्य शासनास कोणत्याही प्रकरणी तसे करणे आवश्यक आहे असे त्याचे मत असल्यास, ती बाजार समितीशी किंवा ज्या व्यक्तीकडून ती रक्कम येणे असल्याचे अभिकथित असेल व्यक्तीशी संबंधित नसेल अशा, जिल्हाधिकाऱ्यांहून अन्य अशा (विहित अर्हता धारण करणाऱ्या) व्यक्तीनिशी बनलेल्या न्यायाधिकरणाची रचना करता येईल.]

कोणत्याही प्रकरणाच्या परिस्थितीअनुसार न्यायाधिकरणाने अन्यथा निदेश दिला असेल ते रून, न्यायाधिकरणाचा खर्च साधारणपणे, ज्या पक्षकारांच्या विरुद्ध निर्णय देण्यात आला त्या पक्षकाराला सोसावा लागेल.]

---

१९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १० (१) (अ) अन्वये "घोषित कृषि उत्पन्नाबद्दल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

उक्त अधिनियमाच्या कलम १० (१) (ब) अन्वये "त्या बाबतीत विहित करण्यात आलेल्या मुदतीत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ११ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ११ (ग) अन्वये मूळ पोट-कलम (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

१९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १० (२) (अ) अन्वये मूळ पोट-कलम (५) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

५८. राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि ज्या अटी लादणे त्यास योग्य वाटेल अशा अटींच्या अधीनतेने [1][त्यास प्रदान करण्यात आलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार संचालकास किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस प्रत्यायोजित करू शकेल व संचालकाचे कोणतेही अधिकार, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही इतर अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस प्रत्यायोजित करू शकेल.] अधिकार प्रत्यायोजित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

५९. राज्य शासनाला **राजपत्रातील** सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही बाजार समितीला किंवा व्यक्तींच्या कोणत्याही वर्गाला, या अधिनियमाच्या किंवा तद्अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीतून, माफी देता येईल; किंवा अशा तरतुदींच्या आशयाला बाध येणार नाही असा फेरबदलासह अशा तरतुदी, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा बाजार समितीला किंवा अशा व्यक्तींच्या वर्गाला लागू होतील असा निदेश देता येईल: अधिनियमाच्या तरतुदींतून बाजार समित्या वगैरेंना माफी देण्याचा अधिकार.

परंतु, अशा बाजार समितीला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय तिला बाधक ठरणारा कोणताही आदेश देता येणार नाही.

[2][५९-क प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाने, त्याच्या क्षेत्रात आयात होणाऱ्या व तेथून निर्यात होणाऱ्या कृषि उत्पन्नाच्या संबंधात आपल्या किंवा आपल्या अधिकाऱ्यांच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेली सर्व आवश्यक ती माहिती बाजार समितीला किंवा याबाबतीत बाजार समितीने प्राधिकृत केलेल्या तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांना विनामूल्य पुरविणे हे त्याचे कर्तव्य असेल. बाजार समितीला माहिती देणे व सहाय्य करणे हे स्थानिक प्राधिकरणाचे कर्तव्य असणे.

तसेच, बाजार समितीचा कोणताही अधिकारी, या अधिनियमान्वये आपल्या अधिकारांचा वापर करीत असताना व आपली कर्तव्ये पार पाडीत असताना त्याला शक्य ते सर्व सहाय्य देणे हे जकात गोळा करण्याशी संबंधित असलेल्या प्रत्येक प्राधिकरणाचे व त्याच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे कर्तव्य असेल.

**५९-ख** प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याने, हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही **नियम** किंवा उपविधी यांविरुद्ध कोणताही अपराध करण्याच्या प्रयत्नासंबंधी किंवा असा अपराध झाल्या असल्यासंबंधी त्यास मिळालेली कोणतीही माहिती शक्य तितक्या लवकर बाजार समितीला कळविणे व बाजार समितीच्या सचिवाने किंवा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने आपल्या कायदेशीर प्राधिकाराचा वापर करताना त्याची मदत मागितली असता ती देणे, हे त्याचे कर्तव्य असेल.] पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य.

६०. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम

---

[1] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३० अन्वये कलम ५९ नंतर ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

(२) राज्य शासनाला विशेषत:, पण पूर्वगामी तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, पुढील गोष्टींसंबंधी नियम करता येतील:—

(क) कलम ४ खाली चौकशी करण्यासाठी रीत विहित करणे;

[१][(क-१) कलम ५-घ अन्वये स्थापन केलेल्या बाजारांशी संबंधित, लायसन देणे, व्यवस्थापन, पणन, व्यापार व अन्य कोणत्याही बाबी या संबंधातील अटी व शर्ती आणि रीत विहित करणे;]

[२][(क-२) कलम ५-इ अन्वये कंत्राटी शेती पुरस्कर्त्याला ज्याच्याकडे आणि ज्या रीतीने स्वत:ची नोंदणी करता येईल असा अधिकारी आणि अशी रीत विहित करणे, कंत्राटी शेती कराराचा नमुना, तसेच कंत्राटी शेती पुरस्कर्त्यास ज्याच्याकडे कंत्राटी शेती करार अभिलिखित करून घेता येईल असा अधिकारी, विहित करणे, कोणत्याही कंत्राटी शेती करारातून उद्भवलेला विवाद ज्याच्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल असा समेट प्राधिकारी विहित करणे, आणि समेट प्राधिकऱ्याच्या निर्णयाविरुद्ध ज्याच्याकडे अपील दाखल करता येईल असा अपील प्राधिकारी विहित करणे.

(ख) कलम ७ खाली ज्या नियमांच्या अधीनतेने लायसन देण्यात येईल, त्याचे नवीकरण करण्यात येईल किंवा ते नाकारण्यात येईल, ते नियम करणे; आणि लायसनचा नमुना, कालावधी त्यांच्या अटी, शर्ती व निर्बंध (कृषि उत्पन्नाचा खरेदीदार किंवा विक्रेता म्हणून किंवा खरेदीदार व विक्रेता या दोहोंच्या वृतीने, दलाल व अडते यांना, कोणत्याही संव्यवहारात काम करण्यास मनाई करण्यासंबंधीच्या आणि कोणत्याही बाजारात किंवा बाजार क्षेत्रात ज्या रीतीने व ज्या जागी कृषि उत्पन्नाचा लिलाव करण्यात येईल व बोली बोलण्यात व स्वीकारण्यात येईल ती रीत व त्या जागा ज्या जागी कृषि उत्पन्न तोलण्यात व सुपूर्द करण्यात येईल त्या जागा विहित करण्यासंबंधीच्या तरतुदी धरून) आणि त्यासाठी कमाल फी विहित करणे;

(ग) कलम १० खाली मंडळाच्या [३][ सदस्यांची संख्या, आणि त्यांच्या अर्हता विहित करणे] व ज्या रीतीने त्याची रचना करण्यात येईल आणि ते विवादाच्या मिटवणुकीसंबंधीचे कामकाज चालवितील ती रीत विहित करणे (यात त्या कलमअन्वये, तरतूद केल्याप्रमाणे लवादाच्या नेमणुकीसंबंधीच्या आणि फी देण्यासंबंधीच्या व अपील करण्याच्या [४][तंत्रज्ञ व्यक्तीशी विचारविनियम करण्याच्या आणि प्रयोग शाळेत विश्लेषण करण्याच्या] तरतुदींचा समावेश होतो);

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम १२ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

२. सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ४ अन्वये खंड (क-१) नंतर समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ३ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[1][(ग-१) कलम १२ खाली बाजार समितीच्या वर्गीकरणासाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित करणे;]

(घ) कलम १४ खाली त्या कलमात उल्लेखिलेल्या सर्व बाबी धरून ज्या रीतीने सदस्यांची निवड करण्यात येईल ती रीत विहित करणे;

(ङ) कलम २० खाली ज्या कालावधीसाठी सभापती किंवा उपसभापती अधिकारपद धारण करील तो कालावधी विहित करणे;

[2][(ङ-१) कलम २१-क खाली बाजार समितीचे सभापती व उपसभापती यांना द्यावयाच्या मानधनाच्या एकूण रकमेची मर्यादा विहित करणे.]

[3][(ङ-२) कलम २७-क खाली बाजार समितीच्या सर्वसाधारण सभेत पार पाडता येतील असे इतर व्यवहार विहित करणे;]

(च) कलम २९, पोट-कलम (२), खंड (ज) खाली कृषि उत्पन्नाची प्रतवारी आणि प्रमाणीकरण विहित करणे आणि खंड (ल) खाली बाजार समितीने पार पाडावयाची इतर कर्तव्ये विहित करणे;

(छ) कलम ३४ खाली ज्या अवधीत अपील केले पाहिजे तो अवधी विहित करणे;

(ज) कलम ३५, पोट-कलम (३) खाली ज्या नियमांच्या अधीनतेने, त्या कलमान्वये बाजार समितीला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर केला जाईल ते नियम करणे;

(झ) कलम ३६ खाली जमा असलेली रक्कम ज्या रीतीने बाजार निधीत ठेवण्यात येईल किंवा गुंतविण्यात येईल, ती रीत विहित करणे;

[(ञ)] कलम ३७ खाली बाजार समितीची इतर कार्ये विहित करणे;

(ट) कलम ३८ खाली त्या कलमात उल्लेखिलेल्या बाबी;

[4][ट-१) कलम ३९-ड खाली राज्य पणन मंडळास ज्या शर्तींच्या अधीनतेने कर्ज घेण्याचा अधिकार असेल, त्या शर्ती विहित करणे;]

(ठ) कलम ५७, पोट-कलम (४) खाली त्या कलमान्वये, ज्या व्यक्तीचे मिळून न्यायाधिकरण होईल त्या व्यक्तीच्या अर्हता विहित करणे;

(ड) बाजार क्षेत्रात वापरात असलेली सर्व वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने, यांचे नियमकालिक निरीक्षण करणे;

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २२ (क) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[2] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १० (क) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[3] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २२ (ख) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[4] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १० (ख) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(ढ) मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम, १९५८ अन्वये नेमलेल्या निरीक्षकांवर बाजार समितीने ज्या रीतीने नियंत्रण व देखरेख ठेवली पाहिजे ती रीत विहित करणे; १९५८ चा मुंबई ६९.

(ण) बाजार क्षेत्रात आणलेले कोणतेही कृषि उत्पन्न साठविणे;

(त) अंशतः किंवा पूर्णतः बाजार समितीच्या खर्चाने बांधण्याचे योजिलेल्या बांधकामासंबंधीचे आराखडे व अंदाज तयार करणे व अशा आराखड्यांना व अंदाजांना मंजुरी देणे;

(थ) ज्या रीतीने बाजार समितीची चौकशी व निरीक्षण करण्यात येईल ती रीत;

(द) दस्तऐवजाच्या प्रती किंवा बाजार समितीच्या नोंदवह्यांतील नोंदी ज्या व्यक्तीकडून व ज्या नमुन्यात प्रमाणित करता येतील त्या व्यक्ती व तो नमुना आणि अशा प्रती पुरवण्यासाठी आकारावयाची फी विहित करणे;

(ध) ज्या कृषि उत्पन्नाच्या संबंधात बाजार समिती स्थापन करण्यात आली असेल त्या कृषि उत्पन्नाच्या किंमतीची यादी ठेवणे;

(न) ज्या बाबींच्या संबंधात बाजार समितीला उपविधी करता येतील किंवा असे उपविधी करण्यासाठी संचालक त्या बाजार समितीला निदेश देऊ शकेल त्या बाबी आणि उपविधी करण्याच्या, त्यात फेरफार करण्याच्या आणि त्याचे निराकरण करण्याच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती आणि असे उपविधी करण्यापूर्वी, त्या फेरफार करण्यापूर्वी किंवा त्यांचे निराकरण करण्यापूर्वी ज्या शर्तींची पूर्तता केली पाहिजे त्या शर्ती विहित करणे;

[१][(प) विहित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.]

(३) या कलमान्वये करावयाचे नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

[२][(३-क) या कलमानुसार केलेल्या कोणत्याही नियमाद्वारे, कोणताही खरेदीदार कलम ३०-क च्या पोट-कलम (६) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे ताबडतोब रक्कम देण्यात कसूर करील तर तो मुंबई सावकार अधिनियम, १९४६ अन्वये तारणावर न घेतलेल्या कर्जासाठी निश्चित केलेल्या व्याजाच्या कमाल दरापेक्षा अधिक असणार नाही अशा, या नियमांत तरतूद करता येईल त्या दराने, विक्रीच्या तारखेपासून रक्कम दिल्याच्या तारखेपर्यंत, व्याज देण्यास दायी असेल, अशी तरतूद करता येईल. कृषि उत्पन्न विकण्यात आल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, कोणतीही रक्कम देण्यात न आल्यास ही रक्कम कलम ५७ अन्वये बाजार समितीस खरेदीदाराकडून वसूल करता येईल.] १९४७ चा मुंबई ३१.

(४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे

---

१ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ११ (१) अन्वये खंड (प) हा जादा दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमांच्या कलम ११ (२) अन्वये पोट-कलम (३-अ) समाविष्ट करण्यात आले.

अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यासंबंधी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करण्यात येऊ नये, या विषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल तर अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तो नियम केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो नियम अंमलात येणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

उपविधी

**६१.** (१) राज्य शासनाने कलम ६० अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने व संचालकांच्या किंवा राज्य शासनाने याबाबत विशेषरीत्या अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने बाजार समितीला आपल्या व्यवस्थापनाखाली असलेल्या बाजार क्षेत्राच्या बाबतीत अशा बाजार क्षेत्रात कृषि उत्पन्नाची फुटकळ विक्री करण्याच्या प्रयोजनासाठी, अशा उत्पन्नाचे परिमाण निर्धारित करण्यासाठी, धंद्याचे व व्यापाराच्या शर्तीचे विनियमन करण्यासाठी (बाजार समितीच्या सभा, गणपूर्ती आणि कार्यपद्धती यांसह) उपविधी करता येतील; अशा उपविधीत या अधिनियमाअन्वये बसविण्यात आलेल्या कोणत्याही फीची रक्कम परत करण्याविषयी तरतूद करता येईल.

(२) या कलमाअन्वये केलेल्या कोणत्याही उपविधीत अशी तरतूद करता येईल की, अशा उपविधीचे उल्लंघन केल्याबद्दल अपराधसिद्धीनंतर, शंभर रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

उपविधी करणे किंवा त्यांमध्ये सुधारणा करणे याबाबत निदेश देण्याचे संचालकाचे अधिकार.

[1][**६१-क.** (१) एखाद्या बाजाराच्या किंवा बाजार समितीच्या हिताच्या दृष्टीने कोणतेही उपविधी करणे किंवा त्यांमध्ये सुधारणा करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे संचालकास दिसून आल्यास, तो आदेशाद्वारे, संबंधित बाजार समितीला आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अवधीत उपविधी करण्यास किंवा या उपविधीमध्ये सुधारणा करण्यास फर्मावू शकेल.

(२) विनिर्दिष्ट अवधित असे उपविधी करण्यात किंवा उपविधींमध्ये सुधारणा करण्यात बाजार समितीने कसूर केल्यास, संचालक, बाजार समितीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आदेशांद्वारे, असे उपविधी तयार करील किंवा उपविधींमध्ये सुधारणा करील, व त्यानंतर पोट-कलम (३) खालील कोणत्याही आदेशाच्या अधीनतेने, बाजार समितीने हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदींअनुसार असे उपविधी तयार असल्याचे किंवा उपविधींमध्ये अशी सुधारणा केली असल्याचे मानण्यात येईल व त्यानंतर असे उपविधी किंवा उपविधींमधील सुधारणा बाजार समितीवर व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.

(३) संचालकांच्या पोट-कलम (२) खालील कोणत्याही आदेशाविरुद्ध, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल व अशा अपिलावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.]

---

[1] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३१ अन्वये कलम ६१ नंतर कलम ६१-क हे कलम समाविष्ट करण्यात आले.

*अनुसूचीत सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.*

६२ राज्य शासनास संबंधित बाजार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कृषी उत्पन्नाच्या बाबतीत भर घालता येईल किंवा सुधारणा करता येईल किंवा ती रद्द करता येईल.

*व्यावृत्ती.*

६३. बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ यात किंवा बाजारांची स्थापना, तो चालू ठेवणे व त्याचे विनियमन यासंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट बाजार क्षेत्राला किंवा त्यात असलेल्या कोणत्याही बाजाराला लागू असणार नाही किंवा त्यामुळे बाजार समितीच्या अधिकारांना किंवा या अधिनियमान्वये देण्यात आलेले लायसन धारण करणाऱ्यांच्या हक्कांना कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही.

*१८६२ चा मुंबई ४.*

*निरसन व व्यावृत्ती.*

६४. (१) हा अधिनियम अंमलात आल्यावर मुंबई कृषि उत्पन्न बाजार अधिनियम, १९३९, मध्य प्रांत व वऱ्हाड कापूस बाजार अधिनियम, १९३२, मध्य प्रांत व वऱ्हाड कृषी उत्पन्न बाजार अधिनियम, १९३५ आणि १३३९ फसलीचा हैद्राबाद कृषी उत्पन्न बाजार अधिनियम, हा निरसित होईल :—

*१९३९ चा मुंबई २२.*

परंतु, अशा निरसनामुळे, अशा रीतीने निरसन केलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या पूर्वीच्या प्रवर्तनास बाध येणार नाही आणि अशा कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींअन्वये किंवा तद्अनुसार केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (केलेली कोणतीही नेमणूक, प्रत्यायोजन किंवा घोषणा, काढलेली अधिसूचना, आदेश किंवा नियम, दिलेले कोणतेही निदेश किंवा नोटीस, केलेले उपविधी, स्थापन केलेल्या बाजार समित्या, दिलेले कोणतेही लायसन, बसविण्यात आलेली व गोळा करण्यात आलेली कोणतीही फी, करून दिलेले कोणतेही संलेख, स्थापन करण्यात आलेला किंवा रचना करण्यात आलेला कोणताही निधी धरून) या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, ती या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात आलेली आहे असे मानले जाईल व ती या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टींअन्वये किंवा कार्यवाही अन्वये अधिक्रांत केली नसेल तर, आणि अधिक्रमण करण्यात येईतोपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील.

*१९३२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ९.*

(२) तद्अनुसार, याप्रमाणे निरसन केलेल्या कोणत्याही अधिनियमितीअन्वये बाजार क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले कोणतेही क्षेत्र किंवा जागा किंवा बाजार म्हणून घोषित केलेली कोणतीही जागा किंवा या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यावर, त्या अन्वये जाहीर केलेले बाजार क्षेत्र किंवा घोषित केलेला बाजार आहे असे मानले जाईल, आणि या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त बाजार क्षेत्रासाठी किंवा बाजारासाठी स्थापन करण्यात किंवा रचना करण्यात आलेली आणि हा अधिनियम अंमलात येण्याच्या निकटपूर्वी कार्य करीत असलेली बाजार समिती ही अशा बाजार क्षेत्रासाठी या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेली बाजार समिती आहे असे मानले जाईल आणि तसे घोषित करण्यात किंवा अधिसूचीत करण्यात आले असेल तर अशी बाजार समिती ही, अशा

*१९३५ चा मध्यप्रांत व वऱ्हाड २९.*

*१३३९ फसलीचा हैद्राबाद २.*

घोषणेत किंवा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कृषी उत्पन्नासाठीसुद्धा असलेली बाजार समिती आहे असे मानले जाईल, आणि अशा समित्यांचे सर्व सदस्य हे राज्य शासनाने कलम १३, पोट-कलम (२) अन्वये नामनिर्देशित केलेले सदस्य आहेत असे मानले जाईल.

(३) पूर्वी म्हटल्याप्रमाणे निरसन करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमितीसंबंधी किंवा त्यांच्या कोणत्याही तरतुदीसंबंधी किंवा त्याअन्वये कोणतीही कामे ज्याच्याकडे सोपविण्यात आली असतील अशा कोणत्याही अधिकाऱ्यासंबंधी, प्राधिकाऱ्यासंबंधी किंवा व्यक्तीसंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संलेखात किंवा दस्तऐवजात केलेला कोणताही निर्देश हा, आवश्यक असेल तेथे या अधिनियमासंबंधी किंवा त्याच्या संबद्ध तरतुदीसंबंधी किंवा या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तीसंबंधी केलेला निर्देश आहे असा त्याचा अन्वय लावला जाईल आणि यथास्थिति, तत्सम अधिकारी, प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्याकडे अशा कायद्यान्वये, संलेखान्वये किंवा दस्तऐवजाअन्वये असलेली कामे असतील व ते ती पार पाडतील.

१९०४ चा मुंबई १. (४) या कलमात विशिष्ट बाबी नमूद करण्यात आल्यामुळे मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४, कलम ७ (हे कलम निरसनांच्या परिणामासंबंधीचे आहे) हे, या अधिनियमाला सर्वसाधारणपणे लागू होण्यास बाध येणार नाही.

१९३९ चा मुंबई २२. **६५.** या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही बाजार क्षेत्रात समाविष्ट असलेले कोणतेही क्षेत्र मुंबई कृषि उत्पन्न बाजार अधिनियम, १९३९ च्या कलम ४ अन्वये अशा बाजार क्षेत्रातून वगळण्यात आले असेल आणि याप्रमाणे वगळण्यात आलेले क्षेत्र हे, उक्त कलम ४ अन्वये वेगळे बाजार क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असेल आणि त्यासाठी वेगळ्या बाजार समितीची रचना करण्यात आली असेल, आणि दोन्ही बाजार समित्यांचे कार्य अशा प्रारंभानंतर लगेच सुरू झाले असेल आणि अशा वेगळ्या बाजार समित्यांची मत्ता, हक्क व दायित्वे अजून निश्चित करण्यात आली नसतील तर, राज्य शासनाला संबंधित बाजार समित्यांशी विचारविनमय केल्यानंतर **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, याप्रमाणे वगळण्यात आलेल्या क्षेत्राच्या संबंधातील बाजार समितीची मत्ता, हक्क व दायित्वे ही (तिने केलेल्या कोणत्याही संविदेअन्वये असलेले हक्क व दायित्वे धरून) अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटींवर व शर्तींवर वेगळ्या बाजार समितीकडे हस्तांतरित करण्याची तरतूद करता येईल.

सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ अन्वये वगळण्यात आलेल्या क्षेत्रांसाठी रचना करण्यात आलेल्या बाजार समित्यांच्या बाबतीत मत्ता वगैरे हस्तांतरित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

अडचणी दूर करणे. ६६. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनाला प्रसंगानुसार आदेशाद्वारे अशी अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

## अनुसूची

[कलम २ (१) (अ) व कलम ६२ पहा.]

(एक) तंतू :—

(१) कापूस (सरकी काढलेला व सरकी न काढलेला), (२) ताग.

(दोन) तृणधान्ये:—

(१) गहू (तूस काढलेला व तूस न काढलेला), (२) भात (सडिक व असडिक), (३) ज्वारी (४) बाजरी, (५) नागली, (६) वरी, (७) कोंद्रा, (८) मका, (९) सरसव, (१०) बावटो, (११) जव, (१२) बंटी, (१३) चिणो, (१४) नाचनी, (१५) सावी.

(तीन) कडधान्ये:—

(१) तूर, (२) हरभरा, (३) उडीद, (४) मूग, (५) वाल, (६) चवळी, (७) लांग, (८) मटकी, (९) वाटाणा, (१०) कुळीथ, (११) द्विदल धान्यापासून केलेली डाळ, (१२) मसूर, (१३) घेवड्याच्या बिया.

(चार) गळीत धान्ये:—

(१) भूईमूग (फोडलेला व न फोडलेला), (२) जवस, (३) तीळ, (४) करडई, (५) अंबाडी, (६) नारळ, (७) सरकी, (८) एरंडी, (९) सुरसणी, (१०) कारळे तीळ, (११) ओवा, (१२) शेपा.

(पाच) गुंगीकारक द्रव्ये:—

(१) तंबाखू.

(सहा) गूळ, साखर, ऊस.

(सात) फळे:—

(१) आंबा, (२) मोसंबी, (३) संत्री, (४) लिंबू, (५) केळी, (६) द्राक्षे, (७) डाळिंबे, (८) अंजीर, (९) चिकू, (१०) स्ट्रॉबेरी, (११) खरबुजे, (१२) कलिंगडे, (१३) पपई, (१४) पेरू, (१५) बोरे, (१६) फालसा, (१७) सीताफळ.

(आठ) भाजीपाला:—

(१) बटाटे, (२) कांदे, (३) टोमॅटो, (४) सुरण, (५) पालेभाज्या व ताज्या भाज्या, (६) कोनफळ, (७) रताळी, (८) कोचरा.

(नऊ) पशु-पक्ष्यांपासून मिळणारे उत्पन्न:—

(१) अंडी, (२) कुक्कुट, (३) गुरेढोरे, (४) मेंढी, (५) बकरी, (६) लोकर, (७) लोणी, (८) तूप, (९) दूध, (१०) चामडी व कातडी.

(दहा) व्यंजने, मसाल्याचे व इतर पदार्थ:—

(१) हळद, (२) आले, (३) लसूण, (४) धने, (५) मिरची, (६) वेलची व मिरी, (७) बडीशेप (८) सुपारी, (९) विड्याची पाने, (१०) काजू, (११) जिरे, (१२) राई (मोहरी), (१३) मेथी, (१४) इसबगोल, (१५) असारिओ, (१६) मुसळी, (१७) डिंक, (१८) चिंच.

(अकरा) गवत व वैरण.

(बारा) पशुखाद्य:—

(१) गवार, (२) पुनवाड.

(तेरा) मधुमक्षिकापालन:—

(१) मध.

(चौदा) मत्स्यसंवर्धन:—

(१) मासळी.

(पंधरा) वनउत्पन्न:—

(१) हिरडा, (२) डिंक, (३) विडीची पाने, (४) लाख, (५) बांबू, [१][(६) इमारती लाकूड व जळाऊ लाकूड].

[१] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १३ अन्वये, नोंद क्रमांक (६) ही जादा दाखल करण्यात आली.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.